सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# ओडिशात ६० ते ७० माओवादी सक्रिय

## • बीएसएफच्या अधिकाऱ्याची माहिती • बहुतांश आंध्रप्रदेश-छत्तीसगडमधील

**◆ भुवनेश्वर, १ डिसेंबर**

मागील काही वर्षांत ओडिशातील माओवादी कारवायांमध्ये लक्षणीय घट झाली आहे. प्रतिबंधित संघटनेचे केवळ ६० ते ७० माओवादी राज्यात सक्रिय आहेत, अशी माहिती बीएसएफच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

ओडिशातील सक्रिय माओवाद्यांपैकी बहुतांश आंध्रप्रदेश आणि छत्तीसगडमधील आहेत, असे बीएसएफचे महानिरीक्षक (विशेष कारवाया मुख्यालय) सी. डी. अग्रवाल यांनी सांगितले. केवळ सात माओवादी ओडिशातील असून, त्यांच्याकडे कोणतेही नेतृत्व नाही, असे ते म्हणाले.

केंद्रीय गृह मंत्रालयाच्या मते, कालाहंडी, कंधमाल, बोलनगिर, मलकानगिरी, नबारंगपूर, नौपाडा आणि रायगड हे सात जिल्ह माओवादी प्रभावीच्या श्रेणीत आहेत. मात्र, माओवाद्यांच्या कारवाया कालाहंडी-कंधमाल-बौध-नयागड या परिसरात मर्यादित झाल्या असल्याचे अग्रवाल यांनी सांगितले.

माओवाद्यांच्या उच्चाटनात महत्त्वपूर्ण प्रगती झाली असली, तरी कालाहंडी, कंधमाल आणि बौध येथील घनदाट जंगलात आव्हान कायम आहे. येथे आयईडीचा धोका मोठ्या प्रमाणात आहे.

नक्षल-संबंधित मादकपदार्थांच्या तस्करीचा सामाजिक-आर्थिक परिणाम विशेषतः गांजाची लागवड हा नवीन अडथळा असल्याचे अग्रवाल यांनी सांगितले.

ओडिशात बीएसएफला सर्वप्रथम २०१० मध्ये तैनात करण्यात आले. त्यावेळी येथे हिंसाचाराने टोक गाठले होते. बीएसएफने या अत्यंत आव्हानात्मक भूप्रदेशात माओवादीविरोधी कारवाया करीत २५० ते ३०० नक्षलवाद्यांना ठार केले तसेच कट्टर नक्षलवाद्यांच्या आत्मसमर्पणालाही मदत केली, असे अग्रवाल म्हणाले.

२०२४ मध्ये तीन खतरनाक माओवाद्यांचा खात्मा करण्यात आला आणि २४ कट्टर नक्षलवादी शरण आले. त्या व्यतिरिक्त ३४ आयईडी, ११७ ग्रेनेड्स आणि मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्र व दारुगोळा जप्त केला, असे अग्रवाल यांनी सांगितले. ◂(वृत्तसंस्था)



हे आहे जर्मनीतील ऐतिहासिक श्लिट्झ शहर. येथील मध्ययुगातील टॉवरवर शनिवारी ४२ मीटर उंचीची मेणबत्ती प्रज्वलित करण्यात आली

## झोमॅटोकडून मोफत डिलिव्हरीची ऑफर

**◆ नवी दिल्ली, १ डिसेंबर**

फूड डिलिव्हरी कंपन्यांद्वारे लोक बाहेरून खाद्यपदार्थ मागवून घरी किंवा कार्यालयात खातात. आता फूड डिलिव्हरी कंपनी झोमॅटोने आपल्या ग्राहकांसाठी खास ऑफर आणली आहे.

ग्राहक झोमॅटो गोल्ड मेंबरशिप फक्त ३० रुपयांमध्ये घेऊ शकतात. या अंतर्गत ग्राहकांना सहा महिन्यांसाठी अनेक फायदे मिळतील. ज्यात मोफत डिलिव्हरी, आकर्षक डिस्काऊंट आणि विशेष ऑफर्सचा समावेश आहे. ग्राहक सात किलोमीटरच्या परिसरात २०० रुपयांपेक्षा जास्त ऑर्डरवर मोफत डिलिव्हरीचा लाभ घेऊ शकतात. झोमॅटोच्या डिलिव्हरी नेटवर्कमध्ये समाविष्ट असणाऱ्या रेस्टॉरंट्सना ही सुविधा लागू होईल. ◂(वृत्तसंस्था)

# अगोदर सरकार होऊ द्या मग उपोषण जाहीर करू

## अंतरवालीत राज्यातील मराठे एकत्र येणार : जरांगे-पाटील



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ डिसेंबर-**

अगोदर राज्यात सरकार स्थापन होऊ द्या, त्यानंतरच आपण आरक्षणप्रश्नी करण्यात येणाऱ्या उपोषणाची तारीख जाहीर करू. सरकार स्थापन होण्यापूर्वीच आम्ही उपोषणाची तारीख जाहीर केली तर राज्यात सरकार स्थापन करण्याऐवजी राष्ट्रपती राजवट लागू करतील आणि आमची गोची करतील, अशी भीती मराठा आरक्षण लढ्याचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी व्यक्त केली.

जरांगे-पाटील हे रविवारी तुळजापूर येथील देवीचे दर्शन घेऊन पंढरपूर येथील श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी निघाले असता त्यांचे जुना पुणे नाका येथील छत्रपती संभाजी महाराज पुतळ्याजवळ सकल मराठा समाजाच्यावतीने समन्वयक माउली पवार यांनी स्वागत केले. यावेळी राजन जाधव, प्रा.गणेश देशमुख, शिवाजीराव चापले, सचिन तिकटे, संदीप काशीद, अरविंद गवळी, दादा गांगर्डे, विष्णू जगताप उपस्थित होते. तत्पूर्वी जरांगे-पाटील यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला

जरांगे-पाटील म्हणाले, सरकार कोणाचेही आले तरी आम्ही आरक्षण घेणारच. त्यासाठी आता अंतरवाली सराटीत सामुदायिक आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे. याची तारीख नंतर जाहीर करणार आहोत. अंतरवाली सराटी येथे करण्यात येणाऱ्या सामुदायिक उपोषणासाठी राज्यभरातील मराठा बांधव एकत्र येणार आहेत. मुंबईत उपोषण करण्याचा समाजाचा आग्रह आहे. त्यामुळे पुढील उपोषण कदाचित मुंबई येथेही होईल. आता आरक्षणाची ही चळवळ थांबवणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्रात मराठा समाजाशिवाय कोणाचीही सत्ता स्थापन होऊ शकत नाही. यावेळी मराठा समाजाने मराठा आमदारांबरोबरच मोठ्या संख्येने ओबीसी आमदारही निवडून आणले आहेत.

# राज कुंद्राला ईडीचा समन्स

**◆ मुंबई, १ डिसेंबर**

अभिनेत्री शिल्पा शेट्टीचा पती आणि उद्योजक राज कुंद्राला अंमलबजावणी संचालनालय अर्थात् ईडीने चौकशीसाठी बोलावले आहे. त्याच्याविरुद्ध पोर्नोग्राफी प्रकरणाशी संबंधित 'मनी लॉंड्रिंग' तपासासंदर्भात त्याच्या निवासस्थानावर आणि कार्यालयांवर छापे टाकल्यानंतर दोन दिवसांनी त्याला समन्स बजावत ॅसोमवारी सकाळी ११ वाजता मुंबईतील कार्यालयात हजर राहण्यास सांगितले.

मोबाईल ॲपद्वारे पोर्नोग्राफिक कंटेंटची निर्मिती आणि वितरणाशी संबंधित 'मनी लॉंड्रिंग'च्या चौकशी संदर्भात ईडीने राज कुंद्रा आणि इतर अनेकांच्या ठिकाणांवर छापे टाकले. मुंबई आणि उत्तरप्रदेशमधील सुमारे १५ ठिकाणांवर ही छापेमारी करण्यात आली.

कथित पोर्नोग्राफिक कंटेंट प्रॉडक्शनच्या संदर्भातील २०२१ मध्ये मुंबई पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यांत राज कुंद्राची ईडीकडून चौकशी सुरू आहे. राज कुंद्राला जुलै २०२१ मध्ये मुंबई गुन्हे शाखेने भादंवि आणि माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या विविध कलमांतर्गत अटक केली होती. ◂(वृत्तसंस्था)

# बांगलादेशात महिला पत्रकारावर कट्टरवाद्यांचा हल्ला

### भारतीय एजंट असल्याचा आरोप

**◆ ढाका, १ डिसेंबर**

बांगलादेशात कट्टरवादी जमावाने राजधानी ढाका येथे एका महिला पत्रकारावर हल्ला केला. तिला काही काळ ओलीस ठेवले. अखेर पोलिसांनी तिला जमावापासून वाचवले. हा प्रकार शनिवारी कवारन बाजार परिसरात घडला.

दूरदर्शनवरील प्रतिष्ठित हस्ती मुन्नी साहा माध्यम कंपनीच्या कार्यालयातून बाहेर पडत असताना कट्टरवाद्यांच्या जमावाने त्यांच्यावर भारतीय एजंट आणि माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या समर्थक असल्याचा आरोप केला.

मुन्नी साहा यांची कार जमावाने रोखली आणि त्यांच्यासोबत दुर्व्यवहार केला, असे वृत्त स्थानिक माध्यमांनी दिले. त्यानंतर ढाका महानगर पोलिसांना या प्रकरणात हस्तक्षेप करावा लागला. पोलिस साहा यांच्या वाहनात सोबत गेले. जमाव त्यांच्याविरोधात प्रचंड घोषणाबाजी करीत होता. साहा यांना सर्वप्रथम तेजगाव पोलिस ठाण्यात नेले. त्यानंतर त्यांना ढाका मेट्रोपॉलिटन डिटेक्टिव्ह ब्रँच कार्यालयात नेण्यात आले. त्यांना अटक करण्यात आल्याच्या शक्यता समाज माध्यमांवर व्यक्त केल्या जात होत्या. मुन्नी साहा यांना अटक करण्यात आलेली नाही, असे नंतर पोलिसांनी स्पष्ट केले. रविवारी सकाळी त्यांना सोडण्यात आले. ◂(वृत्तसंस्था)

# मॅडम सध्या व्यस्त आहेत!

## सोनिया गांधींनी नजमा हेपतुल्लांना एक तास ठेवले होते ताटकळत

**◆ नवी दिल्ली, १ डिसेंबर**

१९९९ मध्ये सोनिया गांधी यांनी दूरध्वनीवर एक तास ताटकळत ठेवले होते, असा गौप्यस्फोट वरिष्ठ नेत्या नजमा हेपतुल्ला यांनी केला. बर्लिन येथे असताना इंटर-पार्लियामेंट्री युनियनच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली होती. त्यानंतर त्यांनी दूरध्वनीवर काँग्रेसच्या अध्यक्षांसोबत चर्चा करण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी मॅडम व्यस्त असल्याचे सोनिया गांधी यांच्या अधिकाऱ्याने त्यांना सांगितले.

ही धक्कादायक माहिती नजमा हेपतुल्ला यांनी 'इन परश्युट ऑफ डेमोक्रसी: बियॉण्ड पार्टी लाईन्स' या नवीन आत्मचरित्रात दिली. इंटर-पार्लियामेंट्री युनियनचे मिळालेले अध्यक्षपद हा भारताला मिळालेला ऐतिहासिक सन्मान असल्याचे हेपतुल्ला यांनी आत्मचरित्रात म्हटले आहे.

अध्यक्षपदावर निवड झाल्याची माहिती देण्यासाठी त्यांनी सर्वप्रथम





तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांना दूरध्वनी केला. ते लगेच फोनवर आले आणि भारतीय मुस्लिम महिलेला हा सन्मान मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. नंतर त्यांनी सोनिया गांधींसोबत संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, पण पदरी निराशा पडली. मॅडम व्यस्त आहेत, असे सांगण्यात आले. एक तास प्रतीक्षा करावी लागली. मात्र, सोनिया गांधी फोनवर आल्या नाहीत. ही घटना हेपतुल्ला यांच्यासाठी निराशाजनक नव्हती. कारण, या पदावर नाव समोर करण्यासाठी त्यांनी सोनिया गांधी यांची परवानगी घेतली होती.

माझ्या आयुष्यातील हा असा क्षण होता, ज्याने माझे मन कायम नकाराच्या भावनेने भरले, असे नजमा हेपतुल्ला यांनी पुस्तकात म्हटले आहे. सोनिया गांधी यांच्या नेतृत्वाची शैली जुन्या काँग्रेस शैलीपेक्षा वेगळी होती. त्यांच्या अंतर ठेवून वागण्याच्या पद्धतीमुळे पक्षाचे नेते आणि कार्यकर्त्यांमधील संवाद आणि सहकार्य प्रभावित झाले, असे नजमा हेपतुल्ला यांनी म्हटले. ◂(वृत्तसंस्था)

## ९ मे रोजीच्या हिंसाचारात इम्रान खान दोषी

**◆ इस्लामाबाद, १ डिसेंबर**

पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांना ९ मे २०२३ रोजी झालेल्या हिंसाचाराच्या आरोपाखाली शनिवारी लाहोरच्या दहशतवादविरोधी न्यायालयाने दोषी ठरवले आहे.

न्यायालयाने आठ प्रकरणांमध्ये इम्रान खान यांचा जामीनही रद्द केला आहे. न्यायाधीश मंजर अली गिल यांनी आपल्या लेखी निर्णयात म्हटले आहे.

इम्रान खानविरोधातील हिंसाचाराशी संबंधित ऑडिओ आणि व्हिडीओ पुरावे सादर करण्यात आले आहेत. ते त्यांना दोषी सिद्ध करण्यासाठी पुरेसे आहे. ◂(वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### 'पुष्पा २'ची दहा तासांत ५५ हजार तिकिटांची विक्री

**हैदराबाद :** ३० नोव्हेंबरपासून 'पुष्पा २'ची ॲडव्हान्स बुकिंग सुरू झाले असून, यानंतर लोकांची क्रेझ वेगळ्याच पातळीवर आहे. अग्रीम बुकिंगच्या पहिल्याच दिवशी या चित्रपटाने आघाडीच्या तीन राष्ट्रीय साखळी सिनेमागृह पीव्हीआर, इनबॉक्स आणि सिनेपोलिसमध्ये प्रचंड विक्री केली आहे. पहिल्या दिवशी काही तासांतच चित्रपटाची ५० हजार तिकिटे विकली गेली. 'पुष्पा: द रुल'चे ॲडव्हान्स बुकिंग सुरू झाल्यापासून या चित्रपटाचे नाव हिंदी चित्रपटसृष्टीत सर्वाधिक विकल्या जाणाऱ्या चित्रपटांच्या यादीत आले आहे. हा चित्रपट सात वर्षांपूर्वी रिलीज झालेल्या 'बाहुबली २' या चित्रपटाचा विक्रम मोडण्याची शक्यता आहे. २०१७ मध्ये 'बाहुबली २' ने ६.५ लाख तिकिटे विकली होती. 'पुष्पा २' (हिंदी) ची थेट विक्री सुरू झाल्यानंतर अवघ्या १० तासांत ५५ हजार तिकिटांची विक्री झाली. ■

### माधुरीलाही करावा लागला होता बॉडी शेमिंगचा सामना



**मुंबई :** माधुरी दीक्षित ही एक प्रख्यात अभिनेत्री आणि अप्रतिम सौंदर्यवती आहे. आज ती सिनेसृष्टीतील एक यशस्वी अभिनेत्री असली, तरी तिचा आजवरचा प्रवास सोपा नव्हता. तिच्या कारकीर्दीच्या सुरुवातीच्या काळात तिला तिच्या शरीरावरून टीका सहन करावी लागली होती, असे तिने स्वतः एका मुलाखतीत सांगितले. माधुरी दीक्षितला सुरुवातीच्या काळात चित्रपटसृष्टीतील अन्यायकारक सौंदर्य निकषांचा सामना करावा लागला. 'तेजाब' चित्रपटाच्या आधी ती बारीक असल्यामुळे टीकेला सामोरे जावे लागले होते. माधुरी म्हणाली होती, माझ्या काळात त्यांना मी खूपच बारीक वाटायचे. 'ही हिरोईन आहे, हिला जरा जाड करा,' असे ते म्हणायचे. कुणीही कधीच माझ्या समोर असे काही बोलले नाही. फारतर ते म्हणायचे, 'तू खूपच बारीक आहे,' मग 'तेजाब' आला. त्यानंतर मी बारीक आहे की जाड, याचे काहीच महत्त्व राहिले नाही. ■

### अमृता खानविलकरच्या हाताला दुखापत



**मुंबई :** अभिनेत्री अमृता खानविलकरने हाताला पट्टी बांधलेला फोटो शेअर करताच चाहत्यानी चिंता व्यक्त केली. यासंदर्भात तिने सांगितले की, सुदैवाने कोणतेही फ्रॅक्चर नाही. फक्त सॉफ्ट टिश्यूंचे नुकसान झाले आहे. यातून रिकव्हर होत आहे. फक्त पुढे चालत राहायचे आहे, असे म्हणत अमृताने कामात कोणताही खंड पडू दिला नसल्याचे लिहिले आहे. असे असले तरी, तिने ही दुखापत नेमकी कशी आणि कुठे झाली, हे सांगितले नाही. ■

### स्वप्निल, सोनालीसोबत पहिल्यांदाच प्रसाद ओक



**मुंबई :** मराठी सिनेसृष्टीत स्वप्निल जोशी, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी आणि प्रसाद ओक पहिल्यांदाच 'सुशीला-सुजीत' या चित्रपटातून एकत्र स्क्रीनवर झळकणार आहेत. पुढील वर्षी हा चित्रपट प्रदर्शित होणार असून, त्याच्या चित्रीकरणाला सुरुवात झाली आहे. हे तीन कलाकार यापूर्वी एकत्र कधीच झळकले नव्हते. या चित्रपटाच्यानिमित्ताने तिघांची केमिस्ट्री प्रेक्षकांसाठी पर्वणी ठरणार आहे. यापूर्वी स्वप्निलने ज्युनियर सोनाली कुलकर्णीसोबत काम केले आहे. मात्र, सीनियर सोनालीसोबत काम करण्याची संधी मिळाल्याने आपण आनंदित असल्याचे तो म्हणाला. ■

### अमेरिकन भारतात पैसा गुंतवतात

# मुकेश अंबानींनी अमेरिकेत केली मोठी डील



रिलायन्सच्या शेअरसाठी खरेदी कराचे रेटिंग आलेले असताना त्याला बुस्ट देणारी आणखी एक मोठी डील मुकेश अंबानींनी केली आहे. अंबानींच्या रिलायन्सने अमेरिकेत मोठा व्यवहार केला. रिलायन्सची सहकारी कंपनी आरएफआययुएलने वेव्हटेक हिलिअममध्ये (डब्ल्यूएचआय) तब्बल १.२ कोटी डॉलर्सची गुंतवणूक केली आहे.

एकीकडे सगळे अमेरिकन भारतात पैसा ओतत असताना मुकेश अंबानींनी थेट अमेरिकेतच पैसा ओतल्याने रिलायन्सच्या शेअर्सला मोठी हवा मिळणार आहे. डब्ल्यूएचआयमध्ये अंबानींनी २१ टक्के हिस्सा मिळविला आहे. शेअर खरेदी करीत अंबानींनी एवढा पैसा त्या कंपनीला दिला आहे. कमी कार्बन उत्सर्जनाच्या योजनेचा हा प्रयत्न आहे. हेलिअमची वाढती मागणी पाहता रिलायन्सने या क्षेत्रात पाऊल टाकले. रिलायंस फाइनेंस ॲण्ड इन्वेस्टमेंट्स यूएसए एलएलसी असे या अंबानींच्या कंपनीचे नाव आहे.

डब्ल्यूएचआय ही अमेरिकन कंपनी आहे. या कंपनीची स्थापना २ जुलै २०२१ रोजी झाली होती. ही कंपनी हेलिअमचा शोध घेणे आणि त्याचे उत्पादन करण्यात तज्ञ आहे. २०२४ मध्येच या कंपनीने व्यवसाय सुरू केला आहे.

हेलियम हे औषध, वैज्ञानिक संशोधन, एअरोस्पेस, इलेक्ट्रॉनिक्स आणि सेमीकंडक्टर उत्पादन यासारख्या अनेक क्षेत्रांमध्ये एक महत्त्वाचा घटक आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) आणि डेटा सेंटर्सच्या वाढत्या प्रस्थामुळे या हेलियमची मागणी वाढण्याची शक्यता आहे. ■



# ओलाने आणली नवी इलेक्ट्रिक दुचाकी

देशातील आघाडीची ईव्ही टू-व्हिलर उत्पादक कंपनी ओला इलेक्ट्रिकने आपल्या पोर्टफोलिओचा विस्तार केला आहे. कंपनीने नवीन गिग आणि एस१झेड स्कूटर रेंज बाजारात आणण्याची घोषणा केली आहे. सर्वसामान्यांसाठी अतिशय कमी किमतीत ही स्कूटर उपलब्ध होणार आहे. या स्कूटर रेंजची सुरुवातीची किंमत ३९,९९९ रुपये आहे. याचे अधिकृत बुकिंगदेखील सुरू झाले असून, फक्त ४९९ रुपयांमध्ये ही स्कूटर बुक करता येणार आहे.

स्कूटरच्या नवीन श्रेणीत ओला गिग, ओला गिग प्लस, ओला एस१झेड आणि ओला एस१ झेड प्लस यांचा समावेश आहे. यांच्या किमती अनुक्रमे २९,९९९, ४९,९९९, ५९,९९९ आणि ६४,९९९ रुपये अशा आहेत. या स्कूटरची बॅटरी काढता येईल, ज्यामुळे कुठेही याचे सहजपणे चार्जिंग करता येईल. ओला गिग शॉर्ट राईडसाठी डिझाईन केली आहे. ■



# सात महिन्यांत ५० टक्के वाढले गोल्ड लोन

### ऑक्टोबरपर्यंत १.५४ लाख कोटींचे कर्जवाटप

चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सात महिन्यांत म्हणजेच २०२४-२५ मध्ये गोल्ड लोनमध्ये ५६ टक्के वाढ झाली आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने जारी केलेल्या बँक क्रेडिटच्या क्षेत्रीय उपयोजन डेटावरून असे दिसून आले की, १८ ऑक्टोबर २०२४ पर्यंत १.५४ कोटी रुपयांचे सुवर्ण कर्ज वितरित केले आहे.

२०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या ७ महिन्यांत एकूण ९८.८ हजार कोटी रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले. गेल्या आर्थिक वर्षात बँका आणि एनबीएफसीद्वारे एकूण १,०२,५६२ कोटी रुपयांचे सुवर्ण कर्ज वितरित केले गेले. या आर्थिक वर्षाच्या पहिल्या ७ महिन्यांत वितरित केलेल्या कर्जापेक्षा ५० टक्के कमी आहे.

वैयक्तिक कर्जात वार्षिक आधारावर ५.६ टक्के वाढ झाली आहे. त्याच वेळी बँकांच्या कर्ज दरात १२.१ टक्के वार्षिक वाढ दिसून आली. या आर्थिक वर्षाच्या पहिल्या ७ महिन्यांत क्रेडिट कार्ड कर्जामध्ये ९.२ टक्के वाढ होईल. ■

### किमतीतील वाढ हे सुवर्ण कर्ज वाढण्याचे कारण

तज्ज्ञांच्या मते, सोन्याच्या कर्जात ही वाढ होण्यामागचे कारण सोन्याच्या किमतीत झालेली वाढ असू शकते. याशिवाय सुवर्ण कर्ज सहज आणि कमी व्याजावर उपलब्ध आहे. त्याच वेळी काही विश्लेषक देखील सोन्याच्या कर्जाची वाढती मागणी आर्थिक संकटाचे लक्षण मानतात. ■

# स्वयंपाकघरानंतर बाथरूमपर्यंत पोहोचली महागाई

### कंपन्यांनी वाढवल्या साबणाच्या किमती

स्वयंपाकघर म्हणजेच खाद्यतेल, मैदा, डाळी, भाज्या, फळे. आता महागाईने बाथरूमकडे प्रवेश केला आहे. चालू तिमाहीत आंघोळीच्या साबणाच्या किमतीत ८ टक्क्यांनी वाढ झाली आहे. वास्तविक पाम तेल, ज्यापासून साबण तयार केला जातो, त्याच्या दरात वाढ झाली. त्यामुळे साबण बनवण्याच्या खर्चात वाढ झाली आहे. त्यामुळे देशातील एफएमसीजी कंपन्यांनी आंघोळीच्या साबणाच्या किमतीत वाढ केली आहे.

विप्रो कंझ्युमर केअरचे सीईओ नीरज खत्री यांनी सांगितले की, साबण बनवण्यासाठी प्रमुख कच्च्या मालाच्या किमतीत लक्षणीय वाढ झाली आहे. या वर्षाच्या सुरुवातीपासून ते ३० टक्क्यांपेक्षा जास्त वाढले आहे. परिणामी सर्व प्रमुख व्यापाऱ्यांनी या वाढीची अंशतः भरपाई करण्यासाठी सुमारे सात-आठ टक्क्यांनी भाव वाढवले आहेत. अझीम प्रेमजी यांच्या नेतृत्वाखालील विप्रो एंटरप्रायझेसचे युनिट विप्रो, संतूर सारख्या ब्रॅण्डचे मालक आहेत.

देशातील सर्वांत मोठी कंपनी हिंदुस्थान युनिलिव्हर लिमिटेडने देखील चहा आणि साबणाच्या किमती वाढवल्या आहेत. यात डव्ह, लक्स, लाईफबॉय, लिरिल, पीयर्स, रेक्सोना इत्यादी ब्रॅण्ड अंतर्गत साबण व्यवसायाचा समावेश आहे. ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# हिंदूंच्या सुरक्षेसाठी जगभरातील इस्कॉन मंदिरांमध्ये विशेष प्रार्थना

## परिस्थिती पूर्वपदावर आणण्यासाठी भारताचे उच्चायुक्त प्रयत्नशील

◆ **नवी दिल्ली, १ डिसेंबर**

बांगलादेशातील अल्पसंख्यक हिंदू, बौद्ध आणि जैन समाजावरील हल्ले सुरूच आहेत. या हल्ल्यांविरोधात आवाज उठवणाऱ्यांनाही लक्ष्य केले जात आहे. चिन्मय प्रभू यांच्यासह इस्कॉनशी संबंधित चार पुजाऱ्यांना बांगलादेश सरकारने अटक केली. हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराच्या निषेधार्थ आणि त्यांच्या सुरक्षेसाठी रविवारी जगभरातील इस्कॉन मंदिरांमध्ये विशेष प्रार्थनांचे आयोजन करण्यात आले.

बांगलादेशच्या मुद्यावर इस्कॉनच्या प्रशासकीय समितीचे आयुक्त गौरांग दास म्हणाले, आम्ही दर रविवारी कीर्तन आयोजित करतो. आज कीर्तनाचे आयोजन बांगलादेशातील सर्व भाविक आणि हिंदू अल्पसंख्यकांच्या सुरक्षेसाठी केले गेले. इस्कॉन आणि इस्कॉनचे प्रशासकीय मंडळ एकमेकांच्या संपर्कात आहेत. बांगलादेशमधील भारताचे उच्चायुक्तही सर्वांच्या संपर्कात आहेत आणि परिस्थिती सुधारण्यासाठी एकत्र काम करीत आहेत.



बांगलादेशात हिंदूंवर सुरू असलेल्या अत्याचाराचा निषेध करून त्यांच्या सुरक्षेसाठी महाराष्ट्रातील मुंबई येथेही इस्कॉनच्या सदस्यांनी भक्तिमय गाणी गात विशेष प्रार्थना केली

इस्कॉन कोलकाता उपाध्यक्ष राधा रमण यांनी सांगितले की, बांगलादेशात आतापर्यंत इस्कॉनच्या चार पुजाऱ्यांना अटक करण्यात आली. यापैकी दोघे चिन्मय प्रभू यांना औषध देण्यासाठी गेले होते. मात्र, पोलिसांनी त्यांनाही अटक केली. चिन्मय प्रभूंच्या सचिवालाही अटक करण्यात आली. इस्कॉनची १५० देशांमध्ये ८५० मोठी मंदिरे आहेत, हजारांहून अधिक केंद्रे आहेत. बांगलादेशातील हिंदू आणि इतर अल्पसंख्यकांच्या सुरक्षेसाठी प्रार्थना करणारे इस्कॉनचे कोट्यवधी भक्त आहेत.

**चिन्मय कृष्ण दासच्या अटकेचा निषेध**

२६ नोव्हेंबर रोजी बांगलादेशच्या सनातनी जागरण जोत संघटनेचे प्रवक्ते आणि पुंडरिक धामचे प्रमुख चिन्मय दास यांना देशद्रोहाच्या आरोपाखाली अटक करण्यात आली. बांगलादेशमध्ये इस्कॉनवर बंदी घालण्याची मागणीही करण्यात आली होती; परंतु बांगलादेशच्या उच्च न्यायालयाने त्यास नकार दिला आहे. (वृत्तसंस्था)

# बांगलादेशात भारतीय बसवर हल्ला

## त्रिपुराच्या परिवहन मंत्र्यांनी केला आरोप

◆ **आगरतळा, १ डिसेंबर**

आगरतळाहून कोलकाता येथे जाणाऱ्या बसवर बांगलादेशात हल्ला करण्यात आला आहे, असा आरोप त्रिपुराचे परिवहन मंत्री सुशांत चौधरी यांनी केला आहे. बांगलादेशातील ब्राह्मणबारिया जिल्ह्यातील बिश्व मार्गावर ही घटना घडली, असे त्यांनी सांगितले.

आगरतळाहून कोलकाताकडे जात असलेल्या श्यामोली परिवहन बसवर बांगलादेशच्या ब्राह्मणबारिया बिश्व मार्गावर हल्ला झाला. या घटनेने बसमधील भारतीय प्रवासी घाबरले. बस आपली लेन सांभाळत असताना एका ट्रकने जाणूनबुजून धडक दिली. त्याचवेळी बसच्या समोर एक ऑटोरिक्षा आली, त्यामुळे बस व ऑटो-रिक्षा यांच्यात जोरदार टक्कर झाली, असे चौधरी यांनी बसच्या छायाचित्रासह फेसबुकवर पोस्ट शेअर करत म्हटले.

घटनेनंतर, स्थानिकांनी बसमधील भारतीय प्रवाशांना धमक्या देण्यास सुरुवात केली. त्यांनी भारतविरोधी घोषणाही दिल्या व भारतीय प्रवाशांवर तुरळक दगडफेक केली. मी या घटनेचा तीव्र शब्दात निषेध करतो. शेजारील देशाच्या प्रशासनाने भारतीय प्रवाशांची सुरक्षा निश्चित करावी, अशी विनंती करतो, असेही ते म्हणाले.

कोलकाता आणि आगरतळा दरम्यान व्हाया ढाका मार्गे बस प्रवासाचे अंतर अर्ध्याहून कमी करते. हा रस्ता विमानाने प्रवास करण्यापेक्षा स्वस्त आहे आणि आसाम मार्गे रेल्वे गाडीने प्रवास करण्यापेक्षा कमी आहे. रेल्वेने साधारणपणे ३० तास लागतात. आम्हाला बसवरील हल्ल्याची माहिती मिळाली असून त्याबाबत अधिक माहिती गोळा करण्याचा प्रयत्न करत आहोत, असे मुख्यमंत्री माणिक साहा म्हणाले. (वृत्तसंस्था)

# ईव्हीएममधील मायक्रोकंट्रोलरच्या पडताळणीसाठी युगेंद्र पवारांचा अर्ज

## निवडणूक आयोगाकडे जमा केले नऊ लाख रुपये

◆ **पुणे, १ डिसेंबर**

राज्यातील विधानसभा निवडणुकीचा निकाल समोर आल्यानंतर अनेक उमेदवारांनी ईव्हीएममधील मायक्रोकंट्रोलरच्या पडताळणीसाठी अर्ज दाखल केले. पुण्यातील २१ विधानसभा मतदारसंघांपैकी ११ मधील उमेदवारांनी अधिकृतपणे मायक्रोकंट्रोलरच्या चाचणीसाठी निवडणूक आयोगाकडे विनंती केली आहे. यात बारामतीतील शरद पवार गटाचे उमेदवार युगेंद्र पवारांचाही समावेश असून, या प्रक्रियेसाठी त्यांनी ८.९६ लाख रुपये जमा केले आहेत.

पडताळणीची मागणी करणाऱ्या इतर उमेदवारांमध्ये राकाँचे हडपसरमधील प्रशांत जगताप आणि पुणे केंटमधील काँग्रेसचे उमेदवार रमेश बागवे यांचा समावेश आहे. विधानसभा निवडणुकीचा निकाल २३ नोव्हेंबर रोजी लागला. त्यानंतर सात दिवसांत पडताळणीसाठी अर्ज दाखल करणे अत्यावश्यक असते. पुणे जिल्ह्यातील उमेदवारांनी १३७ ईव्हीएम संचांमधील मायक्रोकंट्रोलरच्या पडताळणीची मागणी केली असून, यासाठी सामूहिक पातळीवर ६६.६४ लाख रुपयांचे शुल्क निवडणूक आयोगाला दिले आहे.


सर्वोच्च न्यायालयाच्या दिशानिर्देशांनुसार, आपल्या मतदारसंघात जे उमेदवार दुसऱ्या किंवा तिसऱ्या क्रमांकावर राहतात, ते विधानसभा मतदारसंघात वापरलेल्या ईव्हीएममधील पाच टक्के मायक्रोकंट्रोलरच्या पडताळणीची विनंती करू शकतात. उमेदवारांना या प्रक्रियेसाठी लिखित अर्ज आणि पडताळणीसाठी येणारा खर्च द्यावा लागतो. मायक्रोकंट्रोलरची तपासणी कडक पाळतीखाली केली जाईल. यावेळी उमेदवार, व्हीव्हीपॅट निर्मिती करणाऱ्या कंपन्यांचे अभियंते सहभागी असतील. (वृत्तसंस्था)

# महत्त्वाचे

## तिरुपती परिसरात राजकीय, द्वेषपूर्ण भाषणांना बंदी

**तिरुपती :** आंध्रप्रदेशातील तिरुमला मंदिर परिसरात खास इशारा देण्यात आला आहे. भगवान स्वामी मंदिराचे संरक्षक तिरुमला तिरुपती देवस्थानम्ने (टीटीडी) तिरुमलात राजकीय आणि द्वेषपूर्ण भाषणांवर बंदी घातली. अलिकडील घटना लक्षात घेता राजकीय आणि द्वेषपूर्ण भाषणांवर बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे देवस्थानम्ने सांगितले. यासंदर्भात टीटीडीने सोशल मीडियावर एक पोस्ट केली. राजकारण्यांसह काही लोकांनी दर्शनानंतर मंदिर परिसराजवळ राजकीय किंवा द्वेषपूर्ण विधाने केली होती. त्यामुळे येथील आध्यात्मिक शांतता भंग पावली. मंदिराचे पावित्र्य आणि आध्यात्मिक शांततेचे रक्षण करण्यासाठी द्वेषपूर्ण भाषणांवर बंदी घालण्याचा निर्णय घेतल्याचे टीटीडीने म्हटले आहे. सर्वांना या निर्णयाचा आदर करण्याचे आवाहन टीटीडीने केले असून, उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा दिला. दरम्यान, हा नियम बऱ्याच काळांपासून लागू आहे.

## धर्मवीर चंद्रशेखर गाडगीळ यांचे निधन



**अकोला :** विदर्भातील ज्वलंत हिंदुत्व धगधगत ठेवणारे, कट्टर सावरकर भक्त, अखिल भारतीय हिंदू सेनेचे प्रधान सेनानी, हिंदू युथ जिमको अकोला व नागपूरचे संस्थापक, येथील हिंदू ज्ञानपीठ कॉन्व्हेंटचे संस्थापक धर्मवीर चंद्रशेखर गाडगीळ यांचे रविवार, १ डिसेंबरला वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्युसमयी ते ८८ वर्षांचे होते. त्यांची अंत्ययात्रा सोमवार, २ डिसेंबरला सकाळी १० वाजता त्यांचे राहते घर 'धर्म ध्वजा' आदर्श वसाहत, गौरक्षण रोड येथून निघेल. त्यांच्या पश्चात पत्नी गिरिजा, मुलगा ॲड. संग्राम व मोठा आप्तपरिवार आहे.

## निर्माणाधीन बोगद्याचा भाग कोसळून मजुराचा मृत्यू

**कोटा :** निर्माणाधीन असलेल्या दिल्ली-मुंबई एक्सप्रेस-वेवर बोगद्याचा काही भाग कोसळला. यात एका मजुराचा मृत्यू झाला असून, तीन जखमी झाले. राजस्थानच्या कोटामधील एक्सप्रेस-वेच्या भागात ही घटना घडली. जखमींना कोटा शहरातील रुग्णालयात हलवण्यात आले आहे. रामगंज मंडीच्या मोडक भागात साऊंडप्रुफ बोगद्याचे काम सुरू आहे. या बोगद्याचा काही भाग कोसळला. मुकुंदरा टायगर रिझर्व्ह भागातून ४.९ किमी लांबीचा हा बोगदा बांधला जात आहे. आठ लेन असल्याने हा खूप मोठा बोगदा आहे. यावरून वन्यजीव ये-जा करू शकणार आहेत.

## मुंबईत २६ वर्षीय महिलेला डिजिटल अटक

**मुंबई :** सायबर गुन्हेगार आजकाल डिजिटल अरेस्टच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात नागरिकांना लक्ष्य करून त्यांची फसवणूक करीत आहे. मुंबईत अशा अनेक घटना रोज उघडकीस येत आहेत. यात आणखी एका घटनेची भर पडली असून, एका फार्मास्युटिकल कंपनीत काम करणाऱ्या महिलेला सायबर चोरट्यांनी डिजिटल अरेस्ट करीत तिची १.७ लाख रुपयांनी फसवणूक केली. शिवाय तिला व्हिडीओ कॉल करीत नग्न होण्यास भाग पाडले. मिळालेल्या माहितीनुसार, बॉडी व्हेरिफिकेशनच्या नावाखाली आरोपींनी व्हिडीओ कॉलवर महिलेचे कपडे काढण्यात आले. महिलेच्या तक्रारीवरून दहिसर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर हा गुन्हा अंधेरी पोलिसांकडे वर्ग करण्यात आला. या प्रकरणी अद्याप कुणालाही अटक करण्यात आली नाही. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सायबर चोरट्यांनी दिल्ली पोलिस अधिकारी असल्याचे सांगून १९ ते २० नोव्हेंबर दरम्यान या महिलेची फसवणूक केली. सायबर गुंडांनी महिलेला फोन करून सांगितले की, तुमच्याविरोधात मनी लॉन्ड्रिंगचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी तपास सुरू आहे. आरोपीने महिलेला हॉटेलची खोली बुक करण्यास सांगितले. नंतर त्याने एका लिंकवर क्लिक करून तिच्या खात्यातून १ लाख ७० हजार रुपये लंपास केले. यानंतर चोरट्यांनी बॉडी व्हेरिफीकेशनच्या नावाखाली व्हिडीओ कॉल करीत या महिलेला कपडे काढण्यास सांगितले.

## तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३०.६ | २०.६ |
| अमरावती | ३०.४ | १७.२ |
| भंडारा | २७.४ | १७.० |
| बुलडाणा | २७.२ | १६.० |
| चंद्रपूर | २९.४ | १३.५ |
| गडचिरोली | २८.८ | १३.४ |
| गोंदिया | २९.९ | १६.२ |
| नागपूर | २९.४ | १८.५ |
| वर्धा | २८.० | १९.० |
| वाशीम | २८.४ | १४.० |
| यवतमाळ | २७.५ | -.- |

# मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांची वसतिगृहांकडे पाठ

## नागपूर विभागात ६५० जागा रिक्त

◆ **गोंदिया, १ डिसेंबर**

शासनाने ओबीसी, व्हीजेएनटी व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरू केली आहेत. नागपूर विभागातील ६ जिल्ह्यांत मुला-मुलींसाठी प्रत्येकी ६०० याप्रमाणे १२०० विद्यार्थिसंख्या असलेली वसतिगृहे सुरू केली आहेत. मात्र, मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी या वसतिगृहांकडे पाठ फिरवल्याचे निदर्शनास येते. नागपूर विभागात वसतिगृहांमध्ये मुलांच्या ३१० व मुलींच्या ३४० अशा ६५० जागा रिक्त आहेत.

राज्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील पदवी व व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी मुला-मुलींसाठी प्रत्येकी १०० विद्यार्थी क्षमतेचे वसतिगृह शासनाने कार्यान्वित केलेत. गोंदिया येथे मुलांसाठी शहराजवळील कुडवा येथे तर मुलींसाठी शहरातील गणेशनगर येथे इमारत भाड्याने घेऊन वसतिगृह थाटले. मात्र, सोयीसुविधांअभावी शैक्षणिक सत्र सुरू होऊन तीन महिने विलंबाने हे वसतिगृह सुरू झाले.


संग्रहित छायाचित्र

आज ३३ मुली व २७ मुलेच प्रवेशित आहेत. मुलांच्या ७३ व मुलींच्या ६७ अशा १४० जागा रिक्त आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभाग महाराष्ट्र शासनांतर्गत ही वसतिगृहे सुरू आहेत. परंतु, या वसतिगृहांसाठी सरकारने निधीच उपलब्ध करून दिला नसल्याची बाब समोर आली आहे. निधीअभावी वसतिगृहांत सोयीसुविधांचा अभाव आहे. नागपूर विभागात गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर व वर्धा या जिल्हास्थळी असलेल्या वसतिगृहांत प्रत्येकी १०० विद्यार्थी याप्रमाणे १२०० विद्यार्थी प्रवेशित होणे अपेक्षित असताना २९० मुले व २६० मुली अशा ५५० विद्यार्थ्यांनीच प्रवेश घेतला आहे.

गोंदियात मुलांच्या ७३ व मुलींच्या वसतिगृहांत ६७, भंडाऱ्यात मुले ४७ व मुली ४४, चंद्रपुरात मुले ५७ व मुली ८१, गडचिरोलीत मुले ५४ व मुली २३, नागपुरात मुले ३७ व मुली ६७ व वर्धेत मुले ४२ व मुली ५८ याप्रमाणे जागा रिक्त आहेत. रिक्त जागांवर इच्छुक विद्यार्थ्यांनी अर्ज करून प्रवेश घ्यावा, असे आवाहन नागपूर विभागाचे प्रादेशिक संचालक वाकुलकर, समाजकल्याण गोंदियाचे सहायक संचालक विनोद मोहतुरे यांनी केले आहे. (वृत्तसंस्था)

# इस्रायलचा गाझापट्टीवर हल्ला; २ मुलांसह ६ ठार

◆ **देर अल-बालाह, १ डिसेंबर**

इस्रायलने गाझापट्टीवर केलेल्या हल्ल्यात एका रात्रीत सहा जण ठार झाले. यात एका तंबूतील दोन लहान मुलांचा समावेश आहे. या तंबूत या मुलांचे कुटुंब आश्रय घेत होते, असे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी रविवारी सांगितले.

मुवासी भागात शेकडो तंबू ठोकून हजारो विस्थापित लोक आश्रय घेतात. मृत्यू पावलेल्या त्या दोन लहान मुलांची आई व त्यांचे इतर भावंडं जखमी झाले, असे जवळच्या नासेर रुग्णालयाने सांगितले.

इजिप्तच्या सीमेवरील दक्षिणेकडील रफाह शहरात एका हल्ल्यात चार जण ठार झाले, अशी माहिती रुग्णालयाच्या नोंदीवरून मिळाली.

इस्रायली लष्कराकडून याबाबत तत्काळ कोणतीही प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. आम्ही केवळ अतिरेक्यांना लक्ष्य करतो व नागरिकांना इजा होऊ नये म्हणून प्रयत्न करतो, असे इस्रायलचे म्हणणे आहे, परंतु गाझा ओलांडून त्यांच्या दैनंदिन हल्ल्यांमध्ये अनेकदा महिला व मुले ठार मारली जातात.


गाझापट्टीत तंबूत आश्रय घेत असलेले विस्थापित लोक

७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासच्या नेतृत्वाखालील अतिरेक्यांनी दक्षिण इस्रायलमध्ये घुसून हल्ला केला होता व यात सुमारे १२०० लोक मारले व २५० लोकांना ओलिस ठेवले होते, तेव्हा युद्ध झाले. गाझामध्ये सुमारे १०० बंदिवान अजूनही आहेत. त्यापैकी सुमारे दोन तृतीयांश जिवंत असल्याचे मानले जाते. इस्रायलच्या प्रतिशोधात्मक हल्ल्यात ४४ हजारांहून अधिक पॅलेस्टिनी ठार झाले आहेत, त्यात निम्म्याहून अधिक स्त्रिया आणि मुले आहेत. (वृत्तसंस्था)

# दिल्ली विधानसभा स्वबळावर लढवणार

## आपने केली घोषणा

◆ **नवी दिल्ली, १ डिसेंबर**

महाराष्ट्र आणि झारखंडमध्ये काँग्रेसची झालेली दुरवस्था पाहता माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी, आम आदमी पार्टी दिल्ली विधानसभा निवडणूक स्वबळावर लढणार असून, काँग्रेससोबत युती करणार नसल्याचे रविवारी जाहीर केले. दिल्ली विधानसभेचा कार्यकाळ २३ फेब्रुवारीला संपत आहे. जानेवारीत कधीही निवडणूक जाहीर होऊ शकते.

लोकसभा निवडणुकीपूर्वी आप आणि काँग्रेस दोघेही इंडिया आघाडीचा भाग होते. दोघांनी दिल्लीत एकत्र लोकसभा निवडणूक लढवली होती. मात्र, यात दोन्ही पक्षांना एकही जागा मिळाली नाही. हरयाणा विधानसभा निवडणुकीपूर्वी आप आणि काँग्रेसमध्ये जागावाटपाचा करार होऊ शकला नाही. त्यानंतर दोघांनी स्वतंत्रपणे निवडणूक लढवली. शनिवारी पदयात्रेत आपल्यावर ज्वलनशील पदार्थ फेकण्याच्या घटनेसाठी केजरीवाल यांनी भाजपा आणि गृहमंत्री अमित शाह यांना जबाबदार धरले. मला वाटले होते की, अमित शाह दिल्लीतील कायदा आणि सुव्यवस्था सुधारण्यासाठी ठोस पावले उचलण्याच्या सूचना देतील, पण त्यांनी माझ्यावर हल्ला केला, असा आरोप केजरीवाल यांनी केला होता. (वृत्तसंस्था)




## राहुल गांधी आणि माईक बंद

**लोकसभेतील** विरोधी पक्षनेते राहुल गांधी म्हणजे अजब वल्ली म्हणायला पाहिजे. प्रसिद्ध साहित्यिक पु. ल. देशपांडे यांच्या काळात राहुल गांधी असते, तर त्यांनी आपल्या 'व्यक्ती आणि वल्ली' या पुस्तकात या पात्राचा समावेश नक्कीच केला असता. आपण काय बोलतो, कुठे बोलतो, कसे बोलतो, याचे भान त्यांना राहात नाही. लोकसभेत अनेकवेळा माझ्या समोरचा माईक बंद केल्या जातो, असा आरोप ते करीत असतात. लोकसभेत कधीच कुण्या सदस्यासमोरचा माईक बंद केला जात नाही. तरी लोकसभेत त्यांनी असा आरोप करणे एकवेळ समजण्यासारखे आहे. पण, राहुल गांधींनी काँग्रेस पक्षातर्फे तालकटोरा स्टेडियमवर आयोजित संविधान संमेलनात असा आरोप करीत आपल्या अचाट बुद्धिमत्तेचे दर्शन घडवले.

या संमेलनात राहुल गांधी बोलत असताना अचानक त्यांच्या समोरचा माईक बंद पडला.□ त्यामुळे नेते आणि कार्यकर्ते गोंधळ करू लागले. साऊंड सिस्टिमवाल्यांनी लगेच धाव घेत माईकमधील बिघाड दूर केला. माईक सुरू झाल्यावर, असे कितीही माईक बंद पडले, तरी मी बोलतच राहणार, माझा आवाज कोणी दडपू शकत नाही, असे आरोपात्मक विधान करून राहुल गांधी यांनी खळबळ उडवली. जो दलित आणि ओबीसींबद्दल बोलतो, त्याचे माईक नेहमीच बंद केले जातात, असे म्हणायलाही त्यांनी कमी केले नाही. काँग्रेसच्या संमेलनात माईक बंद पडला, तो भाजपावाल्यांनी बंद पाडला, असे तर राहुल गांधींना म्हणायचे नसेल. आपण काय बोलतो, याचे भान राहुल गांधींना राहात नाही, याचे हे द्योतक म्हणावे लागेल. त्यामुळेच राहुल गांधींच्या विधानांतून देशवासीयांचे मनोरंजन तर होतेच, पण ते आपल्या कृतीने हास्यास्पदही ठरतात. काँग्रेसमधून कोणी तरी याची जाणिव त्यांना करून द्यायला पाहिजे.

## राहुल गांधी यांनी केला औचित्यभंग

**संविधान** सदनात म्हणजे जुन्या संसदभवनाच्या केंद्रीय कक्षात देशाने संविधानाचा स्वीकार करण्याला ७५ वर्षे झाल्यानिमित्त एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनकड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, राज्यसभेतील सत्तापक्षनेते जे. पी. नड्डा, यांच्यासोबत राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनाही व्यासपीठावर बसण्याची संधी मिळाली. राष्ट्रपती कार्यक्रमाला उपस्थित असताना राजशिष्टाचाराचे काटेकोर पालन करावे लागते.

मात्र, राहुल गांधी व्यासपीठावर असताना अस्वस्थ दिसत होते. एका प्रसंगी राष्ट्रपती आणि अन्य मान्यवर उभे असताना राहुल गांधी बसून होते, काही वेळाने ते उभे झाले. राष्ट्रगीत सुरू असतानाही ते आजूबाजूला पाहात असल्याचे दिसत होते. कार्यक्रम संपल्यानंतर राष्ट्रपती व्यासपीठावरून उतरण्याच्या आधीच त्यांनी व्यासपीठावरून उतरण्याचा प्रयत्न केला. यामुळे औचित्यभंग झाला.

भाजपाच्या आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनी याबाबतचा व्हिडीओ जारी करीत, राहुल गांधी यांच्यावर टीका केली. आपण फक्त काँग्रेसचे नेतेच नाही, तर आता विरोधी पक्षनेते या घटनात्मक पदावर असल्याचे भान राहुल गांधींनी ठेवले पाहिजे. त्यानुसार आपली वागणूक जबाबदारीची ठेवली पाहिजे. मात्र, यावेळी एक चांगली गोष्टही राहुल गांधींनी केली. मल्लिकार्जुन खडगे यांना व्यासपीठावरून उतरताना मदतीचा हात दिला.

## गजेंद्रसिंह शेखावत आणि स्कायडायव्हिंग

**प्रत्येक** मंत्री आपल्याला मिळालेल्या खात्यानुसार काम करीत असतो. आरोग्यमंत्री असेल तर तो रुग्णालयांना भेटी देत असतो, तर शिक्षणमंत्री शाळांना. प्रत्येक मंत्रालय जनतेला उपलब्ध करून देत असलेल्या सोयीसुविधांचे तसेच योजना आणि प्रकल्पांचे उद्घाटनही जोरात करीत असते. यासाठी काहीवेळा अभिनव पद्धतीचा अवलंब केला जातो. पर्यटनमंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनी देशात साहस पर्यटनाचा नुकताच अभिनव पद्धतीने शुभारंभ केला. यासाठी त्यांनी १३ हजार फुटांवरून स्कायडायव्हिंग केले.

स्कायडायव्हिंग हा तसा साहसी खेळाचा भाग असला, तरी यासाठी प्रशिक्षणाची गरज असते. हरयाणाच्या नारनौल येथे शेखावत यांनी देशातील पहिल्या स्कायडायव्हिंग ॲडव्हेंचर स्पोर्टसचा शुभारंभ केला. स्कायडायव्हिंगचे पहिले विमान व्हीटी एसबीएसला त्यांनी हिरवी झेंडी दाखवली. मात्र, एवढ्याने त्यांचे समाधान झाले नाही. त्यांनी विमानात बसून आकाशान झेप घेतली आणि १३ हजार फुटांवरून खाली उडी मारली. यासाठी त्यांना प्रशिक्षकाने आवश्यक ते मार्गदर्शन केले. आतापर्यंत स्कायडायव्हिंगसाठी आपल्या देशातील लोकांना सिंगापूर, थायलंड आणि न्यूझीलंडला जावे लागत होते. आता ही सुविधा भारतातच उपलब्ध झाली आहे, याबद्दल शेखावत यांचे अभिनंदन केले पाहिजे.

## शपथ प्रियांका वढेरांची

**काँग्रेस** महासचिव प्रियांका वढेरा यांनी लोकसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. प्रियांका केरळच्या वायनाड लोकसभा मतदारसंघातून विजयी झाल्या आहेत. राहुल गांधी यांनी राजीनामा दिल्यामुळे या मतदारसंघात पोटनिवडणूक घ्यावी लागली. आपण केरळच्या वायनाडचे खासदार आहे, हे दर्शवण्यासाठी प्रियांका केरळची पारंपरिक कासावू साडी परिधान करून संसदभवनात आल्या होत्या. कासावू म्हणजे जरीची साडी. प्रियांकांनी घातलेल्या पांढऱ्या रंगाच्या या साडीला सोनेरी काठ होते. हातात संविधनाची प्रत घेऊन प्रियांका यांनी शपथ घेतली. संविधानाची ही प्रत राहुल गांधींनी नागपुरातील कार्यक्रमात हातात घेतलेल्या संविधानासारखी कोरी नसावी, अशी अपेक्षा आहे.

आपल्या लेकीचा हा कौतुकसोहळा पाहायला काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी, राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे, रॉबर्ट वढेरा आणि त्यांची मुले लोकसभेच्या दीर्घेत उपस्थित होते. शपथविधीसाठी प्रियांका नवीन संसदभवनात येत असताना मकरद्वाराच्या प्रवेशद्वारावर केरळमधील खासदार विशेषत्वाने उपस्थित होते. त्यांच्या भावाने म्हणजे राहुल गांधी यांनी त्यांना थांबवून आपल्या लाडक्या बहिणीचे छायाचित्र मोबाईलमध्ये काढले. प्रियांकाच्या संसदेतील आगमनामुळे काँग्रेस खासदारांमध्ये कधी नव्हते, ते चैतन्य आले हे खरे.

● दिल्लीवाला

# पत्नी इंग्रजीत बोलून कुटुंबीयांचा करते अपमान!

## पीडित नवऱ्याने कोर्टापुढे मांडली व्यथा

◆ **आग्रा, १ डिसेंबर**

पती-पत्नीच्या नात्यात अनेक मुद्यांवरून वाद निर्माण होत असतो. वैचारिक मतभेद, हुंडा, आर्थिक वाद अशा अनेक मुद्यांवरून हे वाद होत असतात. मात्र, उत्तरप्रदेशातील आग्रा येथे पत्नीचे शिक्षण वादाचे कारण ठरले आहे. लग्न झाल्यानंतर वर्षभरातच दोघांचा संसार मोडण्याच्या मार्गावर आहे.

पत्नी पदवीधर आहे. तिचे इंग्रजी शाळेत शिक्षण झाले. पती आठवी पास असून, व्यवसायाने व्यापारी आहे. वाद झाला की पत्नी इंग्रजीत बोलते, असा आरोप तिच्या नवऱ्याने केला आहे. ती इंग्रजीत शिव्या शाप देत असल्याने नवरा अधिकच रागावला आहे. हे प्रकरण कौटुंबिक समुपदेशन केंद्रापर्यंत पोहोचले, जिथे दोघांमध्ये तडजोड करण्यात आली. पती कमी शिकलेला आहे, याचा अर्थ त्याचा अपमान करावा, असा होत नाही, असे त्या तरुणीला समजावून सांगण्यात आले. नोव्हेंबर २०२३ मध्ये तरुणीचे लग्न झाले होते. मुलीचे वडील व कुटुंबीयांनी तरुणाचा व्यवसाय पाहून मुलीचे लग्न त्याच्याशी लावून दिले. दोघेही सुखात राहतील, असे त्यांना वाटत होते. मात्र, पतीच्या शिक्षणावर पत्नी खूश नव्हती. यावरून घरात वाद सुरू झाले. त्यानंतर दोन महिन्यांनी मुलगी आई-वडिलांच्या घरी आली. समुपदेशनात पतीने आरोप केला की, पत्नी इंग्रजीत वाईट बोलून त्याचा व घरच्यांचा अपमान करते. पत्नी ही पतीला आणि त्याच्या घरच्यांना इंग्रजीत मूर्ख म्हणायची. वादाचे कारण जाणून घेतल्यानंतर मुलीची बाजू ऐकून घेण्यात आली व तिचे समुपदेशन करण्यात आले. ती शिकलेली असेल तर नवऱ्याला व्यवसायात मदत करावी, असे तिला पटवून देण्यात आले. तो कमी शिकलेला असला तरी, त्याचा अपमान करू नका, असे तिला पटवून देण्यात आले. अखेर दोघांमध्ये समझोता झाला व संसार वाचला. (वृत्तसंस्था)

## तोतया जवानाला गुजरातच्या पोरबंदरमध्ये अटक

**पोरबंदर :** स्वत:ला लष्कराचा जवान असल्याचे सांगून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी गुजरातमधील पोरबंदर शहरात अटक केली, असे एका अधिकाऱ्याने रविवारी सांगितले. राजकोट जिल्ह्यातील शापर वेरावळ येथील रहिवासी असलेल्या ३० वर्षीय संजय डोडिया या आरोपीला शनिवारी पोरबंदर शहरातील कमला बाग परिसरातून अटक करण्यात आली आणि नंतर जामिनावर सुटका करण्यात आली. लष्करात नसतानाही तो लष्करी जवान आहे हे भासवण्यासाठी त्याने शिपायाचा गणवेश घातलेला आढळून आला, असे कमला बाग पोलिस ठाण्यातील अधिकाऱ्याने सांगितले. भारतीय न्याय संहितेच्या कलम १६८ अन्वये त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. या कलमांतर्गत अदखलपात्र गुन्ह्यासाठी तीन महिन्यांपर्यंत तुरुंगवास किंवा २,००० रुपयांपर्यंतचा दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. (वृत्तसंस्था)

## अग्रलेख...

# सूक्ष्म नियोजन, व्यूहरचना विजयाची शिल्पकार!

विधानसभा निवडणुकीचे निकाल लागून आठ दिवस झाले आहेत. नव्या सरकारचा शपथविधी पुढच्या दोन-तीन दिवसांत होईल. असे असले, तरी निकालाचे कवित्व काही संपलेले नाही. काँग्रेससह उबाठा आणि शरद पवारांच्या पक्षाने ईव्हीएमवर प्रश्न उपस्थित करून गोंधळ माजविण्याचे प्रयत्न सुरू ठेवले आहेत. पराभव झाल्यावर तो स्वीकारून चिंतन करण्याऐवजी विरोधक ईव्हीएमला दोष देतानाच जनादेशाचाही अपमान करीत आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे. भाजपाच्या महाराष्ट्रातील विजयाचा अन्वयार्थ सध्या अनेक धुरीण शोधत आहेत. यासंदर्भात अनेक दाखले दिले जात आहेत. मात्र, यापैकी तीनहून अधिक महत्त्वाच्या मुद्यांचा मागोवा घेतला असता वास्तव तपशिलानिशी समोर येते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांनी पडद्यामागून केलेली मदत, हिंदुत्वाच्या पुरस्काराची प्रत्ययकारी मांडणी आणि 'लाडकी बहीण योजने'चा नेमका प्रभाव मतदारांवर पडला हे मुद्दे प्रामुख्याने बारकाईने तपासून पाहण्यासारखे आहेत. लोकसभेच्या निवडणूक निकालानंतर संघ आणि भाजपामधील समन्वयकांच्या अनेकदा बैठका झाल्या. अर्थात देवेंद्र फडणवीस यांची त्यात मुख्य भूमिका होती. संघ उघडपणे प्रचारात सहभागी होत नाही आणि स्वयंसेवकांना आदेशही देत नाही. राजकारण हा संघाचा प्रांत नाही. स्वयंसेवक स्वत:हून ठरवतात आणि ज्याला मदत करायची त्याला ती करतात. अर्थात, भाजपा हा राष्ट्रवादी विचारसरणीचा सांस्कृतिक राष्ट्रवाद जोपासणारा पक्ष असल्याने स्वयंसेवकांची पसंती भाजपाला असणे स्वाभाविक आहे. स्वयंसेवक ज्या पद्धतीने तळागाळात जाऊन काम करतात, ते कोणत्याही पक्षाला किंवा स्वयंसेवी संस्थांनाही जमत नाही. विधानसभा निवडणुकीत भाजपाच्या यशात संघाचे मोठे योगदान आहे, हे नाकारून चालणार नाही. मतदानाच्या टक्केवारीत झालेली वाढही महायुतीच्या पथ्यावर पडली. ही मतांची टक्केवारी वाढविण्यात संघाचे लक्षणीय योगदान होते.

भाजपाने १४९ मतदारसंघांमध्ये उमेदवार उतरविले होते. त्यापैकी १३२ उमेदवार विजयी झाले. म्हणजे, भाजपाच्या जवळपास ९० टक्के उमेदवारांनी विजय मिळविला. महिनाभरापूर्वी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा प्रचार टिपेला पोहोचला होता. भारतीय जनता पक्षाने त्यांच्या स्टार प्रचारकांपैकी एक असलेले उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना मैदानात उतरवले होते. त्यांनी 'बटेंगे तो कटेंगे' अशी एक घोषणा दिली. मुंबई आणि इतर काही शहरांमध्ये ही घोषणा असलेले पोस्टर्स अनेक ठिकाणी झळकले. राज्यात काँग्रेससह अनेक विरोधी पक्षांनी ही घोषणा धार्मिक आणि चिथावणीखोर असल्याचा आरोप केला होता. भाजपाला कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रात सत्तेतून बाहेर पडू द्यायचे नाही हे हिंदू मतदारांनी ठरविले होते, ही बाब निकालानंतर स्पष्टच झाली. काँग्रेस आणि अन्य विरोधक मुस्लिम मतांचे ध्रुवीकरण करू शकतात आणि तरीही स्वत:ला धर्मनिरपेक्ष ठरवितात, हे शुद्ध ढोंग आहे. त्यामुळे भाजपाने हिंदूंना जागृत करण्यात गैर काहीच नाही आणि स्वयंसेवकांनी भाजपाला पाठबळ देणेही चूक ठरत नाही. काही राजकीय शक्तींनी हिंदूंमध्ये जात आणि विचारसरणीच्या नावावर फूट पाडण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला आहे. आपल्याला त्यापासून सावध तर राहायचेच आहे; पण त्याच वेळी या आव्हानाचा सामनाही करायचा आहे; कोणत्याही परिस्थितीत फूट पडू द्यायची नाही, हे हिंदू मतदारांनीही ओळखले आणि भाजपाला साथ दिली. त्यामुळेच पक्षाच्या १३२ एवढ्या प्रचंड संख्येत जागा निवडून आल्या, हे वास्तव आहे.

प्रचारात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही 'एक है तो सेफ है' ही नवी घोषणा दिली. काही राजकीय विश्लेषकांनी याचा संबंध योगी आदित्यनाथ यांच्या घोषणेशी जोडतानाच, ही अधिक प्रभावी असल्याचे म्हटले. 'लोक जागरण मंच' आणि 'प्रबोधन मंच' या दोन संघटनांनी स्वत:हून जबाबदारी घेत घरोघरी जाऊन 'एक है तो सेफ है' या घोषणेचा अर्थ समजून सांगितला आणि सोबतच 'हिंदू संघटित राहिले नाहीत, तर त्यांचे अस्तित्व धोक्यात येईल' हे पटवून दिले. त्याचा व्हायचा तो परिणाम झाला. भावी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही व्होट जिहादविरुद्ध आवाज उठविला होता. निवडणूक धर्मयुद्ध असल्याचे सांगत फडणवीस यांनी आक्रमक हिंदुत्वाचा जो पुरस्कार केला, त्याचे सकारात्मक फळ त्यांना मिळाले आहे. लोकसभा निवडणुकीत राज्यात भाजपाच्या कामगिरीने निराश झालेल्या हिंदू मतदारांनी यावेळी आधीच 'गृहपाठ' केला होता. भाजपानेही अतिशय सूक्ष्म नियोजन करून काम केले. लोकसभा निवडणुकीतील सुमार कामगिरीनंतर राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात भाजपाने एक योजना तयार केली होती. त्याला स्वयंसेवकांनी आणि इतर हिंदुत्ववाद्यांनी सकारात्मक पाठबळ दिले, हेही लक्षात घेतले पाहिजे, असे सांगून लाडक्या बहिणींचे योगदान कमी लेखण्याचा आमचा अजिबात मानस नाही. लाडक्या बहिणींनीही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्रिद्वय देवाभाऊ आणि अजित पवार यांना मजबूत साथ दिली, हे वास्तव आहेच. राज्याच्या महायुती सरकारच्या बाबतीत आणखी काय सुधारणा करता येतील, याचा अंदाज धुरिणांनी आधीच घेतला होता. या कामासाठी देशातील अनेक राज्यांमधून अनेक लोक महाराष्ट्रात आले होते. त्यात पुरुष-महिला दोघांचाही समावेश होता. विशेष बाब म्हणजे उत्तरप्रदेश आणि मध्यप्रदेशसारख्या भाजपाशासित राज्यांबरोबरच भाजपाचे राज्य नसलेल्या तेलंगणा, आंध्रप्रदेश आणि हिमाचल प्रदेशसारख्या राज्यांमधूनही भाजपाचे पाठीराखे आले होते. या सर्वांनी लहान शहरे आणि ग्रामीण भागांमध्ये दौरे केले. काँग्रेस आणि इतर पक्षांचे सरकार असलेल्या इतर राज्यांमध्ये सरकारे निवडणुकीतील आश्वासने कशा प्रकारे विसरतात, हे सांगण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी महाराष्ट्र सरकार महिला सबलीकरणासाठी कशा प्रकारे प्रयत्नरत आहे, हेही पटवून दिले. त्याचा योग्य परिणाम झाला. लोकसभेच्या निवडणुकीत आलेल्या पराभवातून जागे होत महायुतीने अतिशय काटेकोर नियोजन केले. मतभेद त्यांच्यातही होते; परंतु त्याचा परिणाम कुठे विजयावर होणार नाही, याची दक्षता महायुतीने घेतली असताना महाविकास आघाडीत मोठ्या प्रमाणात बंडखोरी झाली. लोकसभेच्या निवडणुकीत मिळालेल्या यशाने अन्य पक्षीयांचा लोंढा सुरू झाला. त्यांना सामावून घेताना आपलेच कार्यकर्ते नाराज होतात, याचे भान महाविकास आघाडीच्या नेत्यांना राहिले नाही. पक्ष कार्यकर्त्यांच्या बळावर चालतात; नेत्यांच्या नव्हे. नेते सोयीसाठी इकडून तिकडे उड्या मारत असतात. त्यांच्यापेक्षा कार्यकर्त्यांना जपावे लागते. ते न केल्यास कार्यकर्ते लढायला तयार होत नाहीत. मैदानात कार्यकर्तेच नसतील तर लढाई कशी जिंकायची, हे महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या लक्षातच आले नाही. त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला. आता ते ईव्हीएमवर खापर फोडून आपले दोष झाकण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत आहेत, हे सगळ्यांच्या लक्षात आले आहे. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा अर्थातच 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा. या योजनेच्या पोर्टलवर उपलब्ध माहितीनुसार या योजनेसाठी एकूण १.१२ कोटी अर्ज आले होते. पोर्टलवर स्वीकारलेल्या अर्जांची एकूण संख्या १.०६ कोटी आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे उद्दिष्ट २.३४ कोटी पात्र महिलांना आर्थिक लाभ मिळवून देणे असे होते. या योजनेसाठी राज्याच्या तिजोरीतून वार्षिक ४६ हजार कोटी रुपयांची तरतूद केली. या योजनेंतर्गत महाराष्ट्र सरकारने निवडणुकीपूर्वी महिलांच्या खात्यात साडेसात हजार रुपये जमा केले. त्याअगोदर महिलांना एसटी प्रवासात ५० टक्के सवलत दिली. ज्येष्ठांना एसटी प्रवास मोफत केला. ज्येष्ठांसाठी तीर्थाटनाची योजना आखली. एसटीच्या परताव्याची सोय महायुती सरकारने केली. असंख्य लोकांना अशा लाभाच्या योजनांचा फायदा मिळत असेल आणि दुसरे सरकार येण्याने या योजना बंद होत असतील, तर हेच सरकार पुन्हा निवडून द्यावे लागेल, ही मानसिकता मतदारांमध्ये रुजवण्यात महायुती मोठ्या प्रमाणात यशस्वी झाली.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# २०२४ जागतिक निवडणुकांचे वर्ष!



२०२४ सरत आले आहे. २०२४ हे वर्ष केवळ भारतासाठी नाही तर साऱ्या जगात निवडणुकांचे वर्ष होते. सर्वांत मोठी लोकशाही भारत, सर्वांत जुनी लोकशाही ब्रिटन, अमेरिका त्याचप्रमाणे पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, मालदीव हे भारताचे शेजारी या देशांमध्ये निवडणुका झाल्या. जनतेने आपला कौल दिला.

**जनादेश आणि जनाक्रोश** : बांगलादेशात वर्षाच्या प्रारंभी म्हणजे जानेवारीत झालेल्या निवडणुकीत शेख हसीना यांच्या अवामी लीगला ३०० पैकी २२४ जागा मिळाल्या. शेख हसीना यांचा पंतप्रधान म्हणून शपथविधी झाला आणि काही महिन्यांत त्यांच्याविरोधात जनअसंतोष उफाळून येत त्यांना राजीनामा द्यावा लागला. एवढेच नव्हे, तर त्यांना भारतात आश्रय घ्यावा लागला. या आंदोलनाला केवळ हसीना विरोधाची नाही तर भारत विरोधाची झालर होती. अनेक हिंदू मंदिरांना लक्ष्य बनविण्यात आले. आता बांगलादेशात एक काळजीवाहू सरकार अस्तित्वात असून तेथे नव्याने केव्हा निवडणूक घेतली जाईल, याबाबत कोणतीही स्पष्टता आढळून येत नाही. बांगलादेशातील स्थिती वरवर शांत दिसून येत असली, तरी निवडणुका घेण्याच्या मागणीसाठी तेथे पुन्हा एक नवे आंदोलन होण्याची स्थिती तयार होत आहे. विशेष म्हणजे बांगलादेश आर्थिक विकासाच्या मार्गावर झपाट्याने प्रगती करीत असताना हा घटनाक्रम घडला.

**श्रीलंकेची दिवाळखोरी** : श्रीलंकेत आर्थिक दिवाळखोरीची स्थिती तयार झाल्याने राष्ट्रपती राजपक्षा यांनी राजीनामा देत देशाबाहेर पलायन केले होते. या देशात सप्टेंबर महिन्यात निवडणूक होत अनुरा डिसनायके हे देशाचे राष्ट्रपती झाले. त्यानंतर काही दिवसांपूर्वी झालेल्या संसदेच्या निवडणुकीत डिसनायके यांच्या पक्षाला २२५ सदस्यांच्या सभागृहात १५९ जागा मिळाल्या.

**पाकिस्तानात पुन्हा भडका** : २०२४ च्या फेब्रुवारीत पाकिस्तानमध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत मुख्य विरोधी पक्ष इम्रान खानच्या पाकिस्तान तहरिक-ए-इन्साफला निवडणुकीपासून दूर ठेवण्यात आले होते. तेथे पाकिस्तान मुस्लिम लीग व पीपल्स पार्टी यांनी एकत्र येऊन सरकार स्थापन केले असले, तरी या देशात राजकीय स्थिरता आलेली नाही.

**बुरखाधारी बुशरा** : मागील आठवड्यात पाकिस्तानात पुन्हा एकदा इम्रान खान समर्थकांनी आपले आंदोलन तीव्र केले. यावेळी झालेल्या हिंसाचारात चार सुरक्षा जवान ठार झाले. यावरून या आंदोलनाची तीव्रता लक्षात यावी. विशेष म्हणजे या आंदोलनाचे नेतृत्व इम्रान खानची बुरखाधारी पत्नी बुशराबिबीने केले. बुशराच्या भाषणात अंगार होता. एक धार्मिक प्रवृत्तीची महिला अशी ओळख असणाऱ्या बुशराला हाताळणे पाकिस्तान सरकारसाठी सोपे काम ठरणारे नाही. अडियाला कारागृहात बंदिस्त असलेल्या इम्रान खानच्या सुटकेसाठी हे आंदोलन करण्यात आले होते. पाकिस्तानचे जनमत आजही इम्रान खानच्या बाजूने असल्याचे म्हटले जाते. पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी सामोपचाराचे धोरण घेत सरकार चालविले असले, तरी त्यांच्या सरकारला अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे.

**मालदीव** : मालदीव या लहानशा देशात झालेली सार्वत्रिक निवडणूक भारत हटावच्या मुद्यावर केंद्रित होती. भारताचा विरोध करीत राष्ट्रपती मुईझू यांच्या पक्षाने निवडणूक जिंकली तर खरी; पण पर्यटन व्यवसाय अचानक कोसळल्याने या देशाचे कंबरडे मोडले. चीन आपल्या मदतीस धावून येईल, असे वाटणाऱ्या मालदीवच्या पदरी निराशा पडल्याने मालदीवने पुन्हा नवी दिल्लीचा रस्ता धरला. दोन्ही देशातील संबंध पुन्हा पूर्ववत् होत असल्याने मालदीवची अर्थव्यवस्थाही सावरत असल्याचे दिसत आहे.

**ब्रिटन-अमेरिका** : ब्रिटनमधील सार्वत्रिक निवडणुकीत सुनक यांच्या हुजूर पक्षाचा धुव्वा उडेल, असे भाकीत वर्तविले जात होते. अगदी त्यानुसार या पक्षाचा धुव्वा उडाला आणि मजूर पक्षाला प्रचंड बहुमत मिळाले. ब्रिटन-अमेरिकेतीमधील सत्तांतर सुरळीत होत आले आहे. मात्र, अमेरिकेत २०२० मध्ये घडलेला घटनाक्रम याला अपवाद होता. २०२० मध्ये बायडेन यांनी सूत्रे हाती घेतली तेव्हा ते सुरळीत सत्तांतर नव्हते. ६ जानेवारी रोजी ट्रम्प समर्थकांनी कॅपिटल हिल भागात घडविलेला हिंसाचार व २० जानेवारीच्या सत्तांतर सोहळ्यावर ट्रम्प यांनी घातलेला बहिष्कार या पृष्ठभूमीवर बायडेन यांचा शपथविधी झाला होता. अमेरिकेतील निवडणुकीत रिपब्लिकन उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांच्या विजयानंतर तेथे सुरळीत सत्तांतर होण्याची चिन्हे आहेत. मावळते राष्ट्रपती ज्यो बायडेन यांनी ट्रम्प यांना शिष्टाचाराच्या चहापानासाठी निमंत्रित करून तसे आश्वासन दिले आहे.

**भारतातील निवडणूक** : भारतात मे महिन्यात झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला जनादेश मिळाला; पण स्पष्ट बहुमतासाठी काही जागा कमी पडल्या. तेलगू देसम व जनता दल (यू) या दोन पक्षांच्या पाठिंब्याने नरेंद्र मोदी पुन्हा एकदा पंतप्रधान झाले. पाकिस्तान-बांगलादेशच्या तुलनेत भारतातील लोकशाही किती भक्कम पायांवर उभी आहे हे पुन्हा एकदा या निवडणुकीच्या निमित्ताने सिद्ध झाले. लोकसभा निवडणुकीनंतर जम्मू-काश्मीर, हरयाणा, झारखंड, महाराष्ट्र या राज्यांत विधानसभा निवडणुका आटोपल्या. २०२४ मध्ये होणाऱ्या निवडणुकीचे वेळापत्रक एकप्रकारे आटोपले आहे. नव्या वर्षात दोन राज्यांत विधानसभा निवडणुका होणार आहेत. वर्षाच्या प्रारंभी दिल्ली आणि वर्षाच्या शेवटी शेवटी नोव्हेंबर महिन्यात बिहार!

**दिल्लीतील निवडणूक** : दिल्ली विधानसभेची निवडणूक फेब्रुवारी महिन्यात होणार आहे. म्हणजे महाराष्ट्र-झारखंड निवडणुकीचे ढोलनगारे शांत होत नाहीत, तोच दिल्ली विधानसभेचा बिगुल फुंकला जाणार आहे. त्यानंतर काही महिने सुदैवाने कोणत्याही राज्यात निवडणूक नाही. एकदम नोव्हेंबर महिन्यात बिहार विधानसभेची निवडणूक होणार आहे. २०२६ मध्ये आसाम, तामिळनाडू या राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होतील. २०२७, २०२८ काही विधानसभा, त्यानंतर २०२९ मध्ये लोकसभा निवडणुका होतील. असे हे दरवर्षी निवडणुकीचे चक्र कायम सुरू राहणार आहे.

**एक देश एक निवडणूक** : जगातील सर्वांत मोठ्या देशात भारतात ज्याप्रमाणे निवडणुकांचे अमाप पीक येत असते ते बहुधा कोणत्याही देशात येत नसावे. वर्षभरातील बाराही महिने निवडणुका व पोटनिवडणुका होत असतात. 'जेवढ्या निवडणुका जास्त, तेवढे काळ्या पैशाचे पीकही जास्त' हे समीकरण ठरलेले आहे. मोदी सरकारने 'एक देश एक निवडणूक' यावर विचार करण्यासाठी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. समितीने आपला अहवाल सादर केला. आता त्याची अंमलबजावणी केव्हा व कशी होणार, हा खरा प्रश्न आहे. यासाठी काही घटनादुरुस्त्या कराव्या लागणार आहेत. त्यासाठी लागणारे बहुमत सरकारजवळ नाही. यातून मार्ग काढण्यासाठी या मुद्यावर राजकीय पक्षांमध्ये एकमत निर्माण करण्याचा प्रयत्न सरकारने केला पाहिजे. 'एक देश एक निवडणूक' ही कल्पना ज्यावेळी देशात लागू होईल, त्यावेळी देशाच्या लोकशाहीसाठी ते सर्वांत मोठे योगदान ठरेल.

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# वेगाला आवरा, जीवाला सावरा!

जगणं माहीत असणाऱ्यांना वागणं कसं असावं हा प्रश्न कधीच पडत नाही. मग वाहन चालविताना ते जगणं जाते कुठे? तेव्हा तर प्रत्येक जण वाऱ्याशी बोलतच वायुवेगाने समोर जात असतो. येथेच गणित चुकते आणि होत्याचे नव्हते होऊन जाते. वाढत असलेले रस्ता अपघात आज खरोखरच चिंतेचा आणि मंथनाचा विषय ठरला आहे.

नागपुरात अपघातग्रस्ताचा जीव वाचावा म्हणून वाहतूक पोलिसांनी दुचाकीवर मागे बसणाऱ्यांनाही हेल्मेटची सक्ती केली आहे. एका अर्थाने ही सक्ती योग्य वाटत असली, तरी त्यालाही अनेक कंगोरे आहेत. हेल्मेट घातले म्हणजे जीव वाचतो असे सरसकट प्रशासनाचे म्हणणे हास्यास्पद आहे. आज बाजारात जे काही हेल्मेट उपलब्ध आहेत, ते डोक्याची किती सुरक्षा करतील याची काहीही हमी नाही. शिवाय हेल्मेट घाला आणि वाहतूक नियम पायदळी तुडवीत समोर जा, अशीच कृती १०० पैकी ९९ चालकांची आहे. अपघातमुक्त महाराष्ट्र करायचा असेल तर शहरात आणि ग्रामीण भागात प्रथमतः वाहनांच्या वेगावर नियंत्रण आणावे लागेल. अपघातात मरण पावणाऱ्यांची वाढत असलेली संख्या पाहता प्रत्येक वाहनाच्या गतीला लॉक करायला हवे. महाराष्ट्र परिवहन महामंडळाच्या बसेसची स्पीड लॉक असते. त्याचे अनेक फायदे होतात. मग खाजगी वाहनांची गती मोकळी का ठेवली जाते? जे वाहनचालक कर्तव्यावर असतात, ते वेळ वाचावा म्हणून वाहतूक नियम पायदळी तुडवितात. समजा अपघात झाला तर गुन्हा दाखल होतो अन् आरोपी चालकाला तातडीने सूचनापत्र देत सोडलेही जाते. एवढा कायदा तकलादू असल्याने कुठल्याही चालकाला दुसऱ्यांची पर्वा राहिलेली नाही. येथेच आपले गणित चुकत आहे. कारचालकांसाठी सीट बेल्ट असतो. दुचाकीने जाणाऱ्यांना हेल्मेट असते. मग ऑटो चालकांसाठी कुठलीही सुरक्षा नाही असे का व्हावे? ऑटोचेही अपघात आज वाढले आहेत. ऑटो उलटणे ही स्वाभाविक प्रक्रिया आहे. तीनचाकी असल्याने तो कुठेही उलटतो. विशेष म्हणजे ऑटोचालकांना वाहतूक नियमांचे पालन करणे अनिवार्य नसावे. अन्यथा त्यांनी वारंवार सिग्नल तोडण्याचे महापाप केलेच नसते. ऑटोचालक मागून येणाऱ्यांचा विचार न करता कुठेही थांबतात. परिणामी मागचा त्यांच्या ऑटोवर धडकतो आणि अपघातग्रस्त होतो. अशावेळी ऑटोचालक आपली चूक झाकून अपघातग्रस्तालाच दोष देतो. गोंदिया जिल्ह्यात सडक अर्जुनी परिसरात शिवशाही बसचा नुकताच अपघात झाला. या घटनेत ११ लोकांचा जीव गेला. हा अपघात आरोपी प्रणय उल्हास रायपूरकर या चालकाकडून घडला. विशेष सांगायचे झाल्यास प्रणयच्या हातून यापूर्वीच ६ चुका घडल्या आहेत. तरीही त्याला संबंधितांनी चक्क निर्दोष सोडले. याचा अर्थ यंत्रणा कुठेतरी आतमध्ये पोखरलेली तर नाही ना? याचाही शोध घ्यावा लागेल. दरम्यान, घरोघरी अन्नपदार्थ पोहोचविणारेही वाढले आहेत. गरमागरम खाद्यपदार्थ ग्राहकाला मिळावे म्हणून डिलिव्हरी करणारे वाहतूक नियम पायदळी तुडवितात. त्यांच्याही कृतीने अपघात वाढले आहेत. आजचा जमाना स्पर्धेचा आहे. त्याचा अर्थ चंद्रावर जायचा नाही. पण बहुतांश चालक चंद्रावरच जायचे आहे, असे वागत वाहन चालवितात. प्रश्न हा पडतो की, त्या वाहनचालकांना नेमकी कशाची घाई असते? याचा शोध घेतलाच पाहिजे. वाहनाची आणि चालविण्याची क्षमता असो किंवा नसो रस्त्याने जाणारे वायुवेगानेच वाहन चालवितात. वस्तुतः त्यांनी वाहन चालविताना आपल्या मागे पत्नी, मुलगा, मुलगी आणि आई-वडील आहेत याचा विचार करायला हवा. पण का कुणास ठावूक आपल्या मागे कुत्राच लागला असे समजून ते वाहन चालवितात.

नागपूर शहर पोलिसांनी दुचाकीवरील दोघांना हेल्मेटसक्ती केली आहे. पण हीच पोलिस यंत्रणा वेगाने वाहन चालविणाऱ्यांच्या विरोधात काहीच करीत नाही. त्यांना केवळ शासकीय आणि आपली तिजोरी भरायची आहे. या तिजोरी भरण्याच्या लक्ष्यामुळे मूळ हेतूच भरकटून गेला आहे. संपूर्ण महाराष्ट्र अपघातमुक्त करायचा असेल तर पोलिसांनी हेल्मेटसक्तीच्या मागे न लागता, वेगाने समोर जाणाऱ्यांवर, मद्यपान करून वाहन चालविणाऱ्यांवर, सिग्नल तोडणाऱ्यांवर अद्दल घडेल अशी कारवाई करावी. एवढेच नव्हे तर रस्त्यावर वाहन पार्क करणारे, हातठेले लावणारेही अपघातासाठी कारणीभूत ठरतात. त्यांच्यावर प्रशासन काही कारवाई करीत नाही. शेवटी पोलिसांचा हेतू प्रामाणिक असेल तर ते नक्कीच यावर विचार करून कृती करतील. पण त्यांना केवळ तिजोरीच भरायची असेल तर मग मात्र ब्रह्मदेव आला तरी सुधारणा शक्य नाही.

९८८१७१७८५९

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# थोडे चिंतन आवश्यक



अनपेक्षितपणे महायुतीला विधानसभा निवडणुकीमध्ये भरघोस यश मिळाले. इतके मिळाले की, राष्ट्रवादी आणि शिंदे सेना यांचे डोळे फाटून गेले. भाजपाला २०१४ मध्येसुद्धा १२२ जागा मिळाल्या होत्या. त्यामुळे १० जागा त्यांना जास्त मिळाल्या. त्यांचे डोळे फाटून जाण्याचे काही कारणच नाही. पहिल्यांदाच स्वतःच्या बळावर लढणारी शिंदे सेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांना मात्र या भरघोस यशामुळे आकाश ठेंगणे झाल्यासारखे वाटले. ज्या ज्या वेळेला अशा लोकांना भरपूर जागा मिळतात त्यावेळेला त्यांना या आम्हाला स्वबळावर मिळालेल्या आहेत, असा भास होतो, भ्रम होतो. परंतु भारतीय जनता पार्टीचे हिंदुत्ववादी, सनातन धर्माला मानणारे, देशाची चिंता करणारे लाखो मतदार निमूटपणे त्यांना आवडत असो अथवा नसो तरी शिंदे सेना आणि अजित पवार यांना मतदान करतात. हा भाजपाच्या वैचारिक अधिष्ठानाचा परिणाम आहे. परंतु, इतके मोठे यश मिळाल्यानंतर मुख्यमंत्री ठरवायला भाजपाला बरेच दिवस लागले. शिंदे मी नाराज नाही म्हणत होते तरी त्यांच्या दाढीमागची नाराजी लक्षात येत होती; किंबहुना महाराष्ट्रातील जनता गेले काही दिवस झाले हे सर्व नाराजीनाट्य बघत होती. जरी शिंदे म्हणाले की, आमच्यात सर्व काही आलबेल आहे, कुठलीही नाराजी नाही तरी मंत्रिपदाची रस्सीखेच, मुख्यमंत्रिपदाची अभिलाषा ही जनतेपासून लपून राहू शकली नाही. वास्तविक पाहता २०१९ मध्ये शिवसेना उद्धव ठाकरे यांना सोडून ज्यावेळेस एकनाथ शिंदे महायुतीमध्ये आले, त्यावेळेस त्यांना खरे तर उपमुख्यमंत्री करायला पाहिजे होते आणि देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री व्हायला पाहिजे होते. पण भाजपाने व विशेषतः देवेंद्र फडणवीस यांनी मोठे मन दाखवून असेल किंवा दिल्लीच्या आदेशाने असेल, शिंदेंना मुख्यमंत्रिपद दिले. आता त्याची पुनरावृत्ती होईल, अशी आशा करणे हा राजकीय वेडेपणाच आहे. अशा वेळेस भाजपाचा मुख्यमंत्री न बनणे म्हणजे जनमताचा अनादर करणे आहे. २०१९ मध्ये उद्धव ठाकरेंनी गद्दारी करून जनमताचा अनादर केला होता. आता भाजपाने शिंदेंच्या नाराजीच्या समोर झुकून त्यांना मुख्यमंत्रिपद दिले असते तर हा तर जनादेशाचा फार मोठा अपमानच म्हणावा लागला असता. सर्वच विरोधी पक्षांना भाजपापेक्षा देवेंद्र फडणवीस यांची भीती जास्त वाटते का? हा प्रश्न अनेक वेळा समोर येतो. उबाठाच्या प्रवक्त्या सुषमा अंधारे म्हणतात की, आम्हाला भाजपा चालते, पण देवेंद्र फडणवीस नको. महाराष्ट्राच्या राजकारणात एकमात्र जाणता राजा शरद पवारच राहिले पाहिजे. त्यांच्यापेक्षा बुद्धिवान आणि राजकारणी कोणी जन्माला येऊ नये, असे विरोधी पक्षांना वाटत असेल तर ही त्यांची चूकच आहे.

बरेचदा भाजपाची परिस्थिती चिंतनीय होते. भारतातल्या सर्वच राज्यांमध्ये प्रभावशाली कामगिरी करणारी भाजपा ही महाराष्ट्राची नाडी अजून ओळखू शकली नाही का हा प्रश्न वारंवार मनामध्ये निर्माण होतो. इतके मोठे पदाधिकारी आणि कार्यकर्ते असताना भाजपाला नेहमीच सत्तेसाठी युती करावी लागते, ही परिस्थिती कितपत योग्य आहे. हिंदुत्वाचे नाव घेतल्यावर जर लोकांना भाजपापेक्षा शिवसेना आठवत असेल तर भाजपाने आपली प्रचार यंत्रणा तपासून पाहायला पाहिजे. सर्वसामान्य मतदारापर्यंत विकास आणि हिंदुत्व या नाण्याच्या दोन्ही बाजू आपण घेऊन जाऊ शकलो नाही का? यावरही विचार करणे आवश्यक आहे.

भाजपा आणि अजितदादा यांच्याजवळ जवळपास १७५ आमदार असताना शिंदेंची मनधरणी करणे जरा जास्त झाले असे वाटते. मनधरणी करता करता दुसरा उद्धव ठाकरे भाजपाने जन्माला घालू नये म्हणजे मिळविले. सर्वच परिस्थितीमध्ये राज्याचा नेता कोण असेल, याचा निर्णय आधीपासूनच व्हायला हवा.

जरांगे पाटील सुरुवातीपासूनच भाजपाच्या विरोधात बोलत राहिलेले आहेत. भाजपाचे उमेदवार पाडले जावे, हीच त्यांची इच्छा होती. मराठा आरक्षणाकरिता फडणवीस सरकारने केलेले कार्य अत्यंत प्रशंसनीय असताना एखादा जरांगे पाटील त्या समाजामध्ये निर्माण कसा होऊ शकतो? आमचे मराठा नेते काय करीत आहेत, हाही प्रश्न विचारला गेला पाहिजे. मुख्यमंत्री मराठा असावा, ओबीसी असावा की अजून कोणत्या जातीचा असावा हे महत्त्वाचे नाही तर त्याला महाराष्ट्राचा गाडा हाकता आला पाहिजे. त्याच्यामध्ये उत्तम प्रशासकाचे गुण असले पाहिजे आणि त्याचबरोबर तो लोकनेता असला पाहिजे. २०२९ च्या निवडणुका या भाजपाला जर स्वबळावर लढवायच्या असतील तर आतापासून तशा पद्धतीची रणनीती ठरविणे आवश्यक आहे आणि केंद्राने आतापासून महाराष्ट्राचा नेता कोण राहील, हे ठरविणे आवश्यक आहे. अन्यथा भरघोस यश मिळूनही अनेक दिवस आपण मुख्यमंत्रिपदाचा चेहरा ठरवू शकत नाही, ही गोष्ट महाराष्ट्र भाजपा व केंद्र या दोघांकरिताही फारशी भूषणावह नाही. लोकांनी आमच्या डोळ्यांमध्ये अंजन घालण्यापेक्षा आम्ही स्वतःच आमच्या चुका, त्रुटी शोधून त्यावर कार्य करणे गरजेचे आहे असे वाटते.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### अमेरिकेचे भारताविरुद्ध कारस्थान

अमेरिकेने भारताचा अनेकदा विश्वासघात केला आहे. पाकिस्तानसारख्या अतिरेकी देशाला भारताविरुद्ध युद्धाकरिता प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे उचकवले अन् पाकिस्तानला भरभरून मदतही केली आहे. आता तर त्यांनी यावर्षी भारताविरुद्ध उघडउघड कटकारस्थान करणे सुरू केले आहे. त्यांचे वरिष्ठ अधिकारी काश्मीर, पंजाब, दक्षिणेकडील मोदीद्वेषी शक्तींना सर्रास भेटत आहेत. भारतात अंतर्गत संघर्ष वाढावा याबद्दल त्यांचे भरघोस प्रयत्न सुरू आहेत. कारण, भारताची वेगाने होत असलेली आर्थिक प्रगती त्यांना खटकते आहे. गेल्या पाच वर्षांत भारतीय उद्योगपती 'अदानी' एका उच्च स्थानावर पोहोचले आहेत; ते उंच उडत आहेत. गेल्या वर्षी ते जगातील दुसऱ्या क्रमांकाचे उद्योगपती झाले होते. हीच गती कायम राहिली असती तर ते जगातील सर्वांत मोठे उद्योगपती होऊ शकतात. लगेच अमेरिकेने भारतविरोधी माध्यमे हाताशी धरून अदानींची बदनामी करण्याचा कट केला. पण तो फारसा परिणामकारक झाला नाही. भारताची यूपीआय चलनाची पद्धत आता श्रीलंका, मॉरिशस, फ्रान्स, यूएई, मलेशिया, थायलंड, फिलिपाईन्स, व्हिएतनाम, सिंगापूर, कंबोडिया, दक्षिण कोरिया, जपान, तैवान, हाँगकाँग इत्यादी देशांशी आर्थिक व्यवहार करताना वापरायला लागले आहेत. सर्व भारतीयांनी आपसातील सर्व मतभेद दूर सारून देशाच्या भल्यासाठी एकजूट होणे अत्यंत गरजेचे आहे.

**गणेश ज. हजारे**/८६९८८१५५५९

### विधानसभा निवडणुकीत पोलिसांची दमछाक

नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत पोलिस दलाने आपल्या समर्पणाने लोकशाही प्रक्रियेला यशस्वी बनवले. राजकीय नेत्यांच्या सभा आणि निवडणुकीच्या प्रक्रियेदरम्यान मलकापूर शहरासह जिल्ह्यातील पोलिस अधिकारी व कर्मचारी यांनी अहोरात्र परिश्रम घेतले. बुलढाणा जिल्ह्यातील हे चित्र त्यांच्या निष्ठेची जिवंत साक्ष आहे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची बुलढाणा येथे सभा असो किंवा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची मलकापूर येथे सभा, या दोन्ही महत्त्वाच्या प्रसंगी जिल्ह्यातील पोलिस दलाने शिस्त आणि दक्षतेने बंदोबस्ताचे काम सांभाळले. उद्धव ठाकरे यांच्या सभेनंतर केवळ दोन दिवसांत अमित शाह यांच्या सभेसाठी पोलिसांना मलकापूर येथे स्थलांतर करावे लागले. तीन दिवस मुक्कामी राहत, त्यांनी हा मोठा कार्यक्रम शांततेत पार पाडला.

नेत्यांच्या सभांमध्ये पोलिस दलाचे काम फक्त गर्दीचे नियोजन एवढ्यापुरते मर्यादित नसते, तर तिथे शिस्त राखणे, अनुचित प्रकारांना आळा घालणे आणि नागरिकांचा विश्वास कायम ठेवणे या साऱ्यांची जबाबदारी ते समर्थपणे पार पाडतात. पोलिस दलाच्या या अविरत सेवेचा विचार करता, त्यांचे कौतुक करणे हे आपले नैतिक कर्तव्य ठरते. अनेकदा आपल्या कामाच्या ओझ्याखाली स्वतःचे आरोग्य आणि कुटुंबाचा वेळ ते बाजूला ठेवतात. तरीही कर्तव्याला प्राधान्य देत, ते नेहमीच सज्ज असतात. लोकशाही प्रक्रियेला शांततेत आणि व्यवस्थित पार पाडण्यात पोलिस दलाचा वाटा मोलाचा असतो. पोलिस दलाचे अथक प्रयत्न म्हणजेच लोकशाहीचा मजबूत आधारस्तंभ.

**दीपक ईटनारे**/८६६८३५६५८६

### नियम तोडणाऱ्या लोकांना वठणीवर आणा

शुक्रवार २९ नोव्हेंबरच्या अंकात रोहन बेनोडेकर यांनी, 'सिव्हिक सेन्स शून्याकडे जातोय का?' हा प्रश्न विचारून खरंच महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे. का असं होतंय काही कळत नाही. माणुसकीचे नियम जाऊच द्या, पण साधे सामाजिक नियम जर आम्ही पाळणार नसू तर कसली प्रगती केली म्हणायची आम्ही? देश म्हणजे देशातली माणसं ही सुंदर व्याख्या आम्ही लक्षात ठेवून, योग्य वेळी ती आपल्या आचरणात आणलीच पाहिजे आणि हा संस्कार घराघरात सहज व्हायलाच हवा. आई-बाबा, मुलांना शाळेच्या गणवेशात दुचाकीवर मागे बसवून सिग्नल तोडणार असतील तर ते लेकरू पण तसेच करेल. फ्लायओव्हर, महामार्गावरून चुकीच्या दिशेने येणाऱ्याचा मेंदू तर तपासणीसाठी घेतला पाहिजे, तर थुंक संप्रदायी मंडळींचे काय करावे, तेच समजत नाही. सिग्नलचा चौक, त्याच बाजूची भिंत अगदी थुंकून रंगवून टाकलेली दिसेल. डाव्या हातात फोन, एक हातात गाडीचे एक्सिलेटर आणि भर वेगात थुंकणे आणि मागे येणाऱ्यावर शिंतोडे. किळसवाणा प्रकार... मला असं वाटतं की स्वयंसेवी संस्थांच्या कार्यकर्त्यांना हाताशी धरून बिनडोक लोकांना तिथेच दंड करावा, अर्धा सरकार जमा, अर्धा त्या संस्थेला देणगी. त्याखेरीज ही मंडळी वठणीवर येणार नाहीत.

दुसरी गोष्ट म्हणजे काही दुकानदारांनी थेट आणि बेडरपणे सुरू केलेले अतिक्रमण...! एकदा तरी मध्यरात्री मोहीम राबवा आणि खरंच ही अतिक्रमणे काढा. आता याबाबत जागरूक नागरिक, हितकारिणी संस्थांनी पाऊल उचलणे गरजेचे वाटते.

**किशोर गलांडे**/९८२३४९११८७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### रोहित-रितिकाच्या बाळाचे नाव 'अहान'



**मुंबई** : भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार रोहित शर्मा व त्याची पत्नी रितिका सजदेह यांनी अलीकडेच आपल्या नवजात मुलाचे नाव जगासमोर आणले. १६ नोव्हेंबर २०२३ रोजी आपल्या दुसऱ्या अपत्याचे स्वागत करणाऱ्या या जोडप्याने त्याचे नाव 'अहान' ठेवले आहे. रितिकाने आपल्या इंस्टाग्रामवर ख्रिसमस-थीम असलेल्या मोहक फोटोद्वारे आपल्या बाळाचे नाव जाहीर केले. या छायाचित्रात कुटुंबातील सर्व सदस्यांची नावे असून यात रितिका व रोहित प्रेमाने 'रो' व 'रिट्स', त्यांची मुलगी समायरा 'सॅमी' आणि लहान मुलगा 'अहान' म्हणून संबोधले होते. या खास काळात कुटुंबासोबत राहण्यासाठी रोहित ऑस्ट्रेलियाविरुद्धची पहिली कसोटी खेळू शकला नाही, मात्र त्यानंतर तो भारतीय संघात परतला आहे.

### पाटणाला चौथे विजेतेपद जिंकून देण्याचे देवांक दलालचे लक्ष्य

**नोएडा** : अकराव्या प्रो-कबड्डी लीग (पीकेएल) हंगामात पाटणा पायरेट्सला विजेतेपद जिंकून देण्याचे माझे ध्येय आहे, असे देवांक दलाल म्हणाला. देवांक व अयान लोहछाब या उत्कृष्ट चढाईपटूंच्या नेतृत्वाखाली पाटणा पायरेट्सने बंगळुरू बुल्सवर ५४-२९ असा शानदार विजय मिळवल्यानंतर तो माध्यमाशी बोलत होता. या मोसमात १८१ गुणांसह सध्याचा ग्रीन स्लीव्ह होल्डर असलेल्या देवांकच्या मनात एकच ध्येय आहे. मला जर्सीवर आमच्या संघाच्या लोगोच्या वर एक चौथा तारा जोडायचा आहे, असे तो म्हणाला. प्रो-कबड्डी लीगच्या इतिहासात पाटणा पायरेट्सच्या तीन पीकेएल ट्रॉफीच्या विक्रमात आणखी एका ट्रॉफीची भर टाकण्याचा त्यांचा इरादा आहे. अयानचा समर्थपणे पाठिंबा असून त्याच्या नावावर ११३ छापे आहेत. अंकित जगलान आणि शुभम शिंदे यांच्या नेतृत्वाखालील त्यांची बचावात्मक फळी प्रतिस्पर्ध्यांना रोखण्याची जबाबदारी उत्तमरीत्या पार पाडत आहे. मी आमच्या बचावपटूंना सांगतो की आमचे चढाईपटूंना खुले ठेवा. जेव्हा ते बाहेरील योजनेसह खेळतात तेव्हा त्यांना बचाव फळीची उत्तम साथ मिळायला हवी. यामुळे आमचे चढाईपटू प्रेरित होतात व ते आपले शंभर टक्के योगदान देतात, असे त्यांचे मुख्य प्रशिक्षक नरेंद्र रेडू म्हणाले.

### जोकोविच ग्रॅण्ड स्लॅम्समध्ये आव्हान देण्यासाठी सज्ज

**बेलग्रेड** : यावर्षी ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये जबरदस्त मोहिमेनंतर आगामी ग्रॅण्ड स्लॅममध्ये जेनिक सिनर आणि कार्लोस



अल्काराझला आव्हान देण्यासाठी तयार आहे, असे २४ वेळा ग्रॅण्ड स्लॅम विजेता सर्बियाचा नोवाक जोकोविच म्हणाला. चारपैकी तीन ग्रॅण्ड स्लॅम जिंकल्यानंतर ३७ वर्षीय जोकोविचचे २०२४ हे वर्ष कोरडे राहिले. २०१७ साली दुखापतीमुळे त्रस्त राहिलेल्या मोहिमेनंतर जोकोविच प्रथमच कोणतीही प्रमुख स्पर्धा जिंकण्यात अपयशी ठरला आहे. प्रथम विश्वमानांकित इटलीच्या २३ वर्षीय सिनरने मेलबर्न पार्कमध्ये जोकोविचला त्याच्या पहिल्या ग्रॅण्ड स्लॅम विजेतेपदाच्या मार्गावर पराभूत केले व नंतर ऑक्टोबरमध्ये शांघाय मास्टर्स अंतिम सामन्यातही त्याला पराभूत केले. विद्यमान अमेरिकन ओपन विजेत्या सिनरने एटीपी फायनल्सचे विजेतेपद पटकावले, तर जोकोविचला दुखापतीमुळे स्पर्धेतून माघार घ्यावी लागली. स्पेनचा २१ वर्षीय कार्लोस अल्काराझनेही आपले विम्बल्डन विजेतेपद कायम राखले.

### भारताचा अमेरिकेकडून ३-८ ने पराभव

**चेंगडू** : भारतीय टेबल टेनिस संघाला रविवारी आयटीटीएफ मिश्र सांघिक विश्वचषक टेबल टेनिस स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात पहिल्या गट साखळी सामन्यात अमेरिकेकडून ८-३ असा पराभव पत्करावा लागला. मिश्रा दुहेरीच्या सामन्यात भारताच्या स्नेहित सुरवज्जुला व पोयमंती बैस्या अमेरिकेच्या नरेश नंदन व के. टिफनीकडून १-२ (१०-१२, ८-११, ११-४) असा पराभव पत्करावा लागला. महिला एकेरीत यशस्विनी घोरपडेला सॅली मॉयलँड विरुद्ध १-२ (९-११,८-११,११-७) ने पराभव पत्करावा लागला, त्यानंतर पुरुष एकेरीत जीत चंद्राचा पराभव झाला. त्यानंतरच्या पुरुष दुहेरीच्या सामन्यात स्नेहित सुरवज्जुला व जीत चंद्रा या जोडीचा २-० (९-११, ९-११) असा पराभव झाला. याबरोबरच भारतीय संघासाठी निराशाजनक दिवस संपला. मनिका बत्रा, श्रीजा अकुला, शरथ कमल आणि जी. साथियान या अनुभवी खेळाडूंशिवाय भारतीय संघ सोमवारी दुसऱ्या सामन्यात यजमान चीनशी खेळणार आहे.

# भारताने जिंकला वन-डे सराव सामना

### सॅम कॉन्स्टासचे शतक व्यर्थ

**कॅनबेरा, १ डिसेंबर**

भारत आणि ऑस्ट्रेलियन पंतप्रधान एकादशदरम्यानचा दोन दिवसीय सराव सामना पावसामुळे रद्द करण्यात आल्यानंतर रविवारी उभय संघादरम्यान वन-डे सराव सामना खेळवण्यात आला. यात भारतीय संघाने पंतप्रधान एकादशवर ६ गड्यांनी मात करून विजेतेपद पटकावले.

भारताने नाणेफेक जिंकून ऑस्ट्रेलियन पंतप्रधान एकादशला प्रथम फलंदाजी करण्यास आमंत्रित केले. सलामीवीर सॅम कॉन्स्टासने झळकावलेल्या शतकाच्या बळावर पंतप्रधान एकादशने ४३.२ षटकांत सर्वबाद २४० धावा काढल्या आणि भारतासमोर विजयासाठी २४१ धावांचे लक्ष्य ठेवले. भारतीय खेळाडूंनी फलंदाजीचा उत्तम सराव करत ४६ षटकांत ५ बाद २५७ धावा काढून आपला विजय साकार केला.



वन-डे सराव सामन्याच्या विजेतेपदाचा चषक स्वीकारताना रोहित शर्मा

या सामन्याच्या निमित्ताने भारतीय गोलंदाजांनीही आपला उत्तम सराव करून घेतला आणि पंतप्रधान एकादशचा सलामीवीर सॅम कॉन्टासने भारतीय गोलंदाजांना धैर्याने तोंड देत शतक झळकावले. जॅक क्लेयटनने ४० धावांची, तर हॅमो जेकबने ६१ धावांची खेळी केली. जॅक निसबेटने ११ धावा केल्या. इतर फलंदाज मात्र एक अंकी धावसंख्येवरच बाद झालेत. सॅम कॉन्स्टासने ९७ चेंडूंत १४ चौकार व एका षट्कारासह १०७ धावा ठोकल्या. हॅमो जेकबने ६० चेंडूंचा सामना करत ६१ धावा काढल्या, यात त्याने ४ चौकार व २ षट्कार खेचलेत. जॅक क्लायसनने ५२ चेंडूंत ६ चौकारांसह ४० धावांची खेळी केली.

भारताकडून हर्षित राणाने ४ बळी, आकाश दीपने २ बळी, मोहम्मद सिराज, प्रसिध कृष्णा, वॉशिंग्टन सुंदर व रवींद्र जडेजाने प्रत्येकी एक बळी टिपला.

भारताला विजय मिळवून देताना सलामीवीर यशस्वी जयस्वाल (४५) व केएल राहुलने (२७) पहिल्या गड्यासाठी ७५ धावांची भागीदारी करून डावाची चांगली सुरुवात केली. शुभमन गिलने अर्धशतकी खेळी केली. त्याने ६२ चेंडूंत ७ चौकारांसह ५० धावा ठोकल्या. नितीश कुमार रेड्डीने ३२ चेंडूंत ५ चौकार व एका षट्कारासह ४२ धावांची भर घातली. वॉशिंग्टन सुंदरने ३६ चेंडूंत ५ चौकारांसह नाबाद ४२ धावांची खेळी करत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. रवींद्र जडेजाने ३१ चेंडूंत २७ धावांचे योगदान दिले. पंतप्रधान एकादशकडून चार्ली ॲण्डरसनने २ बळी, लॉयड पोप, मॅट रेनशॉ व जॅक क्लायटनने प्रत्येकी एक बळी टिपण्यात यश मिळविले. (वृत्तसंस्था)



डेहराडूनमध्ये रविवारी, क्रीडा महाकुंभ २०२४ च्या राज्यस्तरीय स्पर्धेत 'मल्लखांब'वर आपले कौशल्य दाखवताना विद्यार्थी

# आशिया चषकासाठी भारतीय कनिष्ठ महिला हॉकी संघ जाहीर

**नवी दिल्ली, १ डिसेंबर**

आगामी ७ ते १५ डिसेंबर दरम्यान मस्कत, ओमान येथे होणाऱ्या आगामी आशिया चषक महिला कनिष्ठ गट हॉकी स्पर्धेसाठी हॉकी इंडियाने २० सदस्यीय संघाची रविवारी घोषणा केली. संघाचे नेतृत्व ज्योती सिंग करणार असून साक्षी राणाला उपकर्णधारपद देण्यात आले आहे.

गत विजेता म्हणून भारतीय संघ या स्पर्धेत उतरणार आहे. गत वर्षी भारताने दक्षिण कोरियाला २-१ ने पराभूत करून पहिले विजेतेपद पटकावले होते. ही स्पर्धा एफआयएच हॉकी कनिष्ठ विश्वचषक २०२५ हॉकी स्पर्धेसाठी पात्रता म्हणून काम करते. या स्पर्धेत दहा संघ सहभागी होत असून या दहा संघांना दोन गटात विभागण्यात आले आहे. भारताला चीन, मलेशिया, थायलंड आणि बांगलादेश सोबत अ गटामध्ये स्थान देण्यात आले आहे, तर ब गटामध्ये दक्षिण कोरिया, जपान, चीन तैपेई, हाँगकाँग चीन आणि श्रीलंका संघांचा समावेश आहे.

निधी आणि अदिती माहेश्वरी गोलमध्ये भक्कम उपस्थिती प्रदान करतील, तर बचाव फळी म्हणून मनीषा, ज्योती सिंग, लालथंटलुआंगी, पूजा साहू आणि ममता ओरम जबाबदारी सांभाळतील. वैष्णवी विठ्ठल फाळके, सुनेलिता टोप्पो, इशिका, रजनी केरकेट्टा, साक्षी राणा आणि खैदेम शिलेमा चानू यांचाही संघात समावेश आहे.

आक्रमणाचे नेतृत्व करण्यासाठी भारत दीपिका, ब्यूटी डुंगडुंग, कनिका सिवाच, मुमताज खान आणि लालरिनपुई यांच्यावर अवलंबून असेल. बिनिमा धन आणि हिमांशी शरद गावंडे यांची राखीव खेळाडू म्हणून निवड करण्यात आली


दीपिका, वैष्णवी विठ्ठल फाळके, सुनीलिता टोप्पो, मुमताज खान आणि ब्युटी डुंगडुंग यांनी भारतीय महिला वरिष्ठ राष्ट्रीय संघाचे प्रतिनिधित्व केले आहे व त्यांच्या अनुभवाचा संघाला फायदा होईल. (वृत्तसंस्था)

# सिंधू, सेन, त्रिशा-गायत्रीला विजेतेपद

### सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन ● सिंधूचा विजेतेपदाचा दुष्काळ संपला



सुवर्णपदकासह पी. व्ही. सिंधू



पहिल्यांदाच विजेतेपद पटकावणारी भारतीय जोडी त्रिशा जॉली व गायत्री गोपीचंद



सुवर्णपदकांसह लक्ष्य सेन

**लखनौ, १ डिसेंबर**

अव्वल मानांकित पी. व्ही. सिंधू व लक्ष्य सेनने रविवारी लखनौ येथील सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत अनुक्रमे महिला व पुरुष एकेरीचे विजेतेपद पटकावले.

दोन वेळा ऑलिम्पिक पदकविजेत्या सिंधूने चीनच्या जागतिक क्रमवारीत ११९व्या क्रमांकावर असलेल्या वू लुओ हिला २१-१४, २१-१६ असे पराभूत करून तिसऱ्यांदा या स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. तिने यापूर्वी २०१७ व २०२२ मध्ये विजेतेपद पटकावले होते.

पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत २०२१ च्या विश्व स्पर्धेतील कांस्यपदक विजेत्या लक्ष्य सेनने सिंगापूरच्या जिया हेंग जेसन तेहवर २१-६, २१-७ असे वर्चस्व गाजवत विजेतेपदावर आपले नाव कोरले.

सिंधूच्या विजयामुळे तिचे दोन वर्षांनंतर पोडियमच्या शीर्षस्थानी पुनरागमन झाले आहे, तिचे शेवटचे विजेतेपद जुलै २०२२ मध्ये सिंगापूर ओपनमध्ये होते. जागतिक क्रमवारीत १८ व्या स्थानी असलेली ही खेळाडू या वर्षाच्या सुरुवातीला मलेशिया मास्टर्स सुपर ५०० च्या अंतिम फेरीत पोहोचली होती.

पॅरिस ऑलिम्पिकमधील कांस्यपदकाच्या प्लेऑफमध्ये निराशाजनक पराभवानंतर लक्ष्य सेन विजेता म्हणून पुढे आला. हा विजय निःसंशयपणे नवीन हंगामापूर्वी त्याचा आत्मविश्वास वाढवेल. त्रिशा जॉली व गायत्री गोपीचंद या महिला दुहेरीच्या जोडीने चीनच्या बाओ ली जिंग आणि ली कियान या जोडीचा केवळ ४० मिनिटांत २१-१८, २१-११ असा पराभव करून पहिले सुपर ३०० विजेतेपद पटकावले. हा विजय भारतासाठी ऐतिहासिक क्षण ठरला, कारण त्रिशा व गायत्री या स्पर्धेत विजेतेपद पटकावणारी पहिली भारतीय महिला दुहेरी जोडी ठरली. ही जोडी २०२२ च्या आवृत्तीत उपविजेते ठरली होती. दुहेरीत पृथ्वी कृष्णमूर्ती रॉय आणि साई प्रतिक के या जोडीने अंतिम फेरीत चुरशीची लढत दिली, परंतु ७१ मिनिटांच्या लढतीत त्यांना चीनच्या हुआंग डी आणि लिऊ यांग याच्याकडून १४-२१, २१-१९, १७-२१ असा पराभव पत्करावा लागला. तत्पूर्वी, पाचव्या मानांकित तनिषा व ध्रुव या मिश्र दुहेरीच्या जोडीला अंतिम फेरीत सहाव्या मानांकित डेचापोल पुवारानुक्रोह व सुपिसारा पावसंप्रन या जोडीकडून २१-१८, १४-२१, ८-२१ असा पराभव पत्करावा लागला. (वृत्तसंस्था)

# सूर्यकुमार मुंबई संघात सहभागी होणार

### सय्यद मुश्ताक अली करंडक टी-२० क्रिकेट

**नवी दिल्ली, १ डिसेंबर**

भारतीय टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव एका कौटुंबिक समारंभात सहभागी होण्यासाठी दोन आठवड्यांची सुटी घेतल्यानंतर मंगळवार, ३ डिसेंबर रोजी आंध्र प्रदेशविरुद्धच्या पुढील सय्यद मुश्ताक अली करंडक टी-२० क्रिकेट सामन्यापासून मुंबई संघात दाखल होणार आहे.

सूर्याने जसे आधीच्या सामन्यात केले होते, तसेच या सामन्यातही तो कदाचित हंगामी कर्णधार श्रेयस अय्यरसोबत संघाचे नेतृत्व करणार नाही व तो नियमित खेळाडूंपैकी एक असेल.

दक्षिण आफ्रिकेवर ३-१ ने जोरदार मालिका जिंकून भारताचे नेतृत्व करणारा सूर्यकुमार यादव सोमवारी हैदराबादमध्ये मुंबई संघात दाखल होणार आहे व आंध्र प्रदेशविरुद्धच्या सामन्यात खेळेल अशी अपेक्षा आहे.

कौटुंबिक समारंभामुळे या स्पर्धेतील काही साखळी सामन्यात आपल्या अनुपलब्धतेबद्दल त्याने मुंबई क्रिकेट संघटनेला कळवले होते.

अय्यर कर्णधारपदी कायम राहिल्यास सूर्यकुमारला कोणतीही अडचण नाही व संघ व्यवस्थापनाला सूर्यकुमारसाठी योग्य वाटेल अशा कोणत्याही क्रमावर फलंदाजी करण्यास तो तयार असल्याचे समजते.

जेव्हा तो उपलब्ध असेल तेव्हा सर्व देशांतर्गत स्पर्धेत मुंबईसाठी खेळणे हे सूर्यकुमारचे सर्वोच्च प्राधान्य आहे. तो सय्यद मुश्ताक अली करंडकातील मुंबईच्या उर्वरित सामन्यात खेळणार आहे आणि २१ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या विजय हजारे चषकातही खेळणार आहे. भारतासाठी सर्व फॉरमॅटमध्ये खेळण्याचा विचार आहे. (वृत्तसंस्था)




# डी. गुकेश-डिंग लिरेन लढत बरोबरीत

**सिंगापूर, १ डिसेंबर**

भारताचा आव्हानवीर डी. गुकेशने रविवारी सिंगापूर येथे झालेल्या जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेच्या सहाव्या फेरीत अटीतटीच्या लढतीत गतविजेत्या चीनच्या डिंग लिरेनला बरोबरीत रोखले.

सलग तिसरी लढत अनिर्णीत राहिल्यामुळे दोन्ही खेळाडूंची ३ गुणांची समानता राहिली. विजेतेपद जिंकण्यासाठी अजून ४.५ गुणांची कमाई करणे आवश्यक आहे.

दोन्ही खेळाडूंनी ४६ चालीनंतर सामना बरोबरीत राखण्यास मान्य केले. हा चौथा सामना अनिर्णित ठरला. ३२ वर्षीय लिरेनने सुरुवातीचा डाव जिंकला होता, तर १८ वर्षीय गुकेशने तिसऱ्या डावांत विजय मिळवला. दुसरा, चौथा आणि पाचवा डाव अनिर्णित राहिला. १४ फेऱ्यांच्या या स्पर्धेत अजूनही आठ डाव खेळणे शिल्लक आहे. सोमवारी दुसऱ्या विश्रांतीच्या दिवसानंतर पुन्हा लढत सुरू होईल. (वृत्तसंस्था)

# यूपी रुद्राचे नेतृत्व हार्दिक सिंगकडे

**लखनौ, १ डिसेंबर**

हॉकी इंडिया लीगच्या (एचआयएल) आगामी हंगामासाठी भारताचा स्टार मिडफिल्डर हार्दिक सिंगची रविवारी यूपी रुद्रस संघाच्या कर्णधारपदी निवड करण्यात आली.



यदु स्पोर्ट्सच्या मालकीच्या लखनौ फ्रेन्चायझीने एक मजबूत संघ तयार केला आहे, यात प्रियोबर्त तालीम, गुरज्योत सिंग, ललित कुमार उपाध्याय, सिमरनजीत सिंग, लार्स बाल्क व केन रसेल या युवा खेळाडूंसह भारतातील व परदेशातील काही दिग्गज हॉकीपटूंचा समावेश आहे.

मी हार्दिकला संघाचा कर्णधार म्हणून घोषित केल्याबद्दल अभिनंदन करू इच्छितो. मला लिलावात पॉल, थॉमस आणि सेड्रिक यांना भेटण्याची संधी मिळाली, असे यदू स्पोर्ट्सचे सह-संस्थापक माधवकृष्ण सिंघानिया म्हणाले. आम्ही निवडलेल्या संघातील प्रत्येक खेळाडू कर्णधारासारखाच आहे. त्यांच्याकडे मंत्रमुग्ध करणारी हॉकी खेळण्यासाठी व लोकांची मने जिंकण्यासाठी आवश्यक ते सर्व कौशल्य आहे, असे यूपी रुद्रा संघाचे मालक सिंघन्या म्हणाला.

हार्दिक सिंग हा लिलावात आमचा पहिला पसंतीचा खेळाडू निवड होता आणि तो संघाचे नेतृत्व करेल याची आम्हाला खात्री होती. त्याला भारतासाठी सातत्याने चांगली कामगिरी करताना बघितले. ऑलिम्पिक कांस्यपदक व दोन वेळा मोठ्या जिंकणेऱ्या भारतीय संघाचा एक भाग असणे, ही काही छोटी कामगिरी नाही, असेही यूपी रुद्राचे मुख्य प्रशिक्षक पॉल व्हॅन ॲस म्हणाले.

मला ही संधी दिल्याबद्दल मी आमच्या सर्व कर्मचाऱ्यांचा खूप आभारी आहे. हॉकी इंडिया लीगच्या या मोसमात यूपी रुद्राचे नेतृत्व करण्याची संधी मिळाल्याबद्दल मी खूप आनंदित आहे, असे हार्दिक सिंग म्हणाला.

दिग्गज ध्यानचंद जी यांच्या मूळ गावी असलेल्या संघाचे प्रतिनिधित्व करणे आणि कर्णधारपद सांभाळणे ही अभिमानाची बाब आहे. आमच्याकडे प्रत्येक विभागात ताकद व कौशल्य असलेले अनेक खेळाडू आहे, असेही तो म्हणाला. (वृत्तसंस्था)

# इंग्लंडचा न्यूझीलंडवर ८ गड्यांनी विजय

### १० बळी टिपणारा ब्रायडन कार्स सामनावीर

**ख्राईस्टचर्च, १ डिसेंबर**

येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात रविवारी चौथ्या दिवशी इंग्लंडने न्यूझीलंडवर ८ गड्यांनी दमदणीत विजय नोंदविला. या विजयाबरोबरच इंग्लंडने तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.

न्यूझीलंडने ६ बाद १५५ धावांवरून पुढे आपल्या दुसऱ्या डावास सुरुवात केल्यानंतर त्यांचा डाव ७४.१ षटकांत २५४ धावांत आटोपला. ब्रायडन कार्सने ४२ धावांत ६ बळी टिपल्यामुळे इंग्लंडसमोर विजयासाठी १०४ धावा काढण्याचे सोपे लक्ष्य राहिले व ते त्यांनी १२.४ षटकांत २ गडी गमावत गाठले.

न्यूझीलंडच्या पहिल्या डावातील ३४८ धावांच्या प्रत्युत्तरात इंग्लंडने ४९९ धावांचा डोंगर उभारून १५१ धावांची आघाडी मिळविली. न्यूझीलंडचा दुसरा डाव २५४ धावांवर आटोपला.



इंग्लंडचा ब्रायडन कार्स

न्यूझीलंडकडून केन विल्यम्सन (६१), रचिन रवींद्र (२४), डॅरील मिचेल (८४) व नॅथन स्मिथने (२१) संघाची धावसंख्या वाढवण्याचा चांगला प्रयत्न केला, परंतु ब्रायडन कार्स व ख्रिस वोक्सच्या गोलंदाजीसमोर इतर फलंदाज फार वेळ टिकाव धरू शकले नाही.

पहिल्या डावात ६४ धावांत ४ बळी टिपणाऱ्या ब्रायडन कार्सने दुसऱ्या डावात ४६ धावांत ४ बळी टिपलेत. एकूण दहा बळी टिपणारा ब्रायडन सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला. ख्रिस वोक्सने ३ बळी टिपले.

इंग्लंडला विजयाचे लक्ष्य गाठून देताना सलामीवीर झॅक क्रॉली एक धाव काढून बाद झाला व त्याचा सहकारी बेन डकेट २७ धावांवर बाद झाला, परंतु कसोटी पदार्पण करणारा जेकब बेथेल आणि १५० वा कसोटी सामना खेळत असलेल्या जो रूटने सामन्याच्या चौथ्या दिवशी चहापानाच्या आधी इंग्लंडला विजयाचे लक्ष्य गाठून दिले. इंग्लंडने १२.४ षटकांत २ बाद १०४ धावा काढून विजयावर शिक्कामोर्तब केला. जेकबने नाबाद ५० धावांची, तर जो रूटने नाबाद २३ धावांची खेळी केली. आता वेलिंग्टनमध्ये शुक्रवारपासून दुसरा कसोटी सामना सुरू होईल आणि हॅमिल्टनमध्ये तिसरा कसोटी सामना होणार आहे. (वृत्तसंस्था)

### रूटने मोडला सचिनचा विक्रम!

**हॅगली ओव्हल येथे रविवारी झालेल्या पहिल्या कसोटीत इंग्लंडने न्यूझीलंडवर आठ गड्यांनी विजय मिळवलेल्या सामन्यात जो रूटने सचिन तेंजुलकरचा विक्रम मोडला. इंग्लंडचा माजी कर्णधार जो रूट आपला १५० वा कसोटी सामना खेळताना महान सचिन तेंडुलकरला मागे टाकून कसोटी क्रिकेटच्या चौथ्या डावात सर्वाधिक धावा करणारा फलंदाज झाला. रूटने केवळ १५ चेंडूंत २२ धावांचे योगदान दिले कारण इंग्लंडने केवळ १२.४ षटकांत १०४ धावांचे लक्ष्य गाठले. रुटच्या चौथ्या डावात १,६३० धावा झाल्या व त्याने तेंडुलकरच्या १,६२५ धावांचा विक्रम मोडीत काढला.**

## संक्षिप्त वृत्त



### रयतेचा राजा; राजा शिवछत्रपती महानाट्यात ९०० कलाकारांचा सहभाग

**अकलूज, दि. १ डिसेंबर-**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक वर्षपूर्ती सोहळ्यानिमित्त दिनांक २ व ३ डिसेंबर रोजी आयोजित केलेल्या रयतेचा राजा-राजा शिवछत्रपती या महानाट्याला अकलूज येथे आजपासून प्रारंभ होत आहे. १२५ बाय ७० फुटाच्या व्यासपिठावर हे महानाट्य साकारत असून सुमारे ९०० कलाकारांचा यामध्ये सहभाग आहे. सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील जयंती समारंभ समिती अकलूज, शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज व सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना कामगार वर्ग यांचे वतीने विजयसिंह मोहिते-पाटील क्रीडा संकूल येथे महानाट्याचे आयोजन केले आहे. महानाट्यात छत्रपती चित्रपट कलावंत शंतनू मोघे, अभिनेत्री पल्लवी वैद्य, रवींद्र कुलकर्णी, अभिनेते विश्वजीत फडते हे प्रमुख भूमिकेत आहेत. याचे लेखक युवराज पाटील, दिग्दर्शक अजय तपकिरे व सूत्रधार डॉ. विश्वनाथ आवड आहेत. मागील काही दिवसापासून या महानाट्याचा सराव सुरू आहे. यात घोडे, बैलगाड्या, पायदळ, मावळे दिसणार आहेत. महानाट्यात शिव जन्मापासून ते शिवराज्याभिषेक सोहळ्यापर्यंतच्या ऐतिहासिक घटनांचे व छत्रपती शिवाजी महाराजांच्या सहकार्यांच्या शौर्याची गाथा उलगडणार आहे. सहकार महर्षी साखर कारखान्याचे अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संग्रामसिंह मोहिते-पाटील, स्वरुपाराणी मोहिते-पाटील, सयाजीराजे मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली विविध कमिट्या कार्यरत असून क्रीडा संकुल येथे याची तयारी पूर्ण झाली आहे. यावेळी सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील उपस्थित होते.



### आर्थिकतेच्या नियोजनात भविष्याचं सुख : संतोष शिरशीकर

**सांगोला, दि. १ डिसेंबर-**

आपण भरपूर पैसे कमवतो, कमवलेले पैसे कसे खर्च होतात हेही कधी लक्षात येत नाही आणि त्यामुळे आपले भविष्य आर्थिकच्या बाबतीत अंधकारमय वाटतं. आपली गुंतवणूक योग्य व अचूक ठिकाणी झाली तर आपल्या कष्टाने कमावलेल्या पैशाला कोणत्याही प्रकारचा धोका नसतो. त्यामुळे आर्थिकतेच्या नियोजनात भविष्याचं सुख अवलंबून असते, असे प्रतिपादन प्रसिद्ध वक्ते संतोष शिरशीकर यांनी केले. नाझरा येथील श्रीकृष्ण मंदिर हॉलमध्ये धनवर्धन वेल्थ प्रायव्हेट लिमिटेड,कोल्हापूर यांच्या वतीने आयोजित केलेल्या आर्थिक साक्षरता व समृद्धता या कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर धनवर्धनचे संचालक निशांत लवटे, शितल लवटे, नाझरा विद्यामंदिरचे प्राचार्य बिभीषण माने, पर्यवेक्षक मधुकर धायगुडे, मुख्याध्यापिका मंगल पाटील, सरपंच मंदाकिनी सरगर, उपसरपंच सुवर्णा पाटील उपस्थित होते. यावेळी निर्मला कोळवणकर यांच्या संकल्पनेतून व आर.जी. बंडगर, स्वप्निल सासणे, धनवर्धनच्या संयोजनातून घेण्यात आलेल्या किल्ला स्पर्धेचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पाचवी ते सहावी गटात सुजल बनसोडे, श्रुती बाबर, संस्कार वाघमारे यांनी तसेच सातवी ते आठवी गटात श्रेयशी बाबर, कार्तिक आदाटे, यश मिसाळ यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी धनवर्धनचे गणेश जाधव व नाझरा विद्यामंदिर मधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सुनील जवंजाळ यांनी केले. आभार शितल लवटे यांनी मानले



### गुणवत्तेवर आधारित संशोधन व्हावे : डॉ. अडवीतोट

**अक्कलकोट, दि. १ डिसेंबर**

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अंगी संशोधन वृत्ती जागविण्याचा प्रयत्न होत असून संशोधनातून प्रेरणा देणे, गुणवत्ता वाढविणे आणि गुणवत्तेवर आधारित संशोधन व्हावे, अशी अपेक्षा प्राचार्य डॉ. शिवराय अडवीतोट यांनी केले. सी.बी.खेडगी महाविद्यालयात आयोजित अविष्कार रिसर्च महोत्सव पार पडला. यावेळी महोत्सवाच्या शुभारंभ प्रसंगी प्राचार्य डॉ. अडवीतोट अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर परीक्षक डॉ. सोमनाथ राऊत, डॉ. शिवाजी धडके, समन्वयक डॉ. सिद्धार्थ मुरूमकर उपस्थित होते. डॉ. शिवराय अडवीतोट पुढे म्हणाले,ग्रामीण भागातील शेतकरी खरा संशोधक असून त्याने लोकांच्या गरजा ओळखून शेतीत नवनवीन प्रयोग करून उत्पादन वाढविले. समाजाला संशोधनातून नवीन ज्ञान मिळाले पाहिजे. संशोधनाची संख्यात्मक वाढ न होता गुणात्मक वाढ होण्याची गरज आहे.

संशोधन वृत्ती महाविद्यालयीनच वाढीस लागते. मानवी जीवन सुधारण्यासाठी संशोधनाची गरज असून ज्ञान हेच विकासाचे माध्यम ठरले आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी संशोधनातील गुणवत्ता सिद्ध करण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख तथा समन्वयक डॉ. सिद्धार्थ मुरूमकर यांनी केले. तसेच यावेळी डॉ. राऊत वर डॉ. धडके यांचेही मार्गदर्शनपर भाषण झाले.या अविष्कार महोत्सवामध्ये पदवी विभागातून वीस संशोधक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. तसेच पाच पदव्युत्तर संशोधक विद्यार्थ्यांनी आपले शोधनिबंध सादर केले. सूत्रसंचालन डॉ. गुरुसिद्धय्या स्वामी यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा. आबाराव सुरवसे यांनी केले. महोत्सव यशस्वी करण्यासाठी प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## सोन्याच्या लालसेने पळविली जाते चक्क मृतदेहाची राख

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१ डिसेंबर -**



येथील वैकुंठ स्मशानभूमीत सुवासिनी महिलेवर अंत्यसंस्कार करण्यात आल्यानंतर सोन्याच्या लालसेने चक्क तिची राख पळविण्याच्या घटनां मध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यामुळे अंत्यसंस्कारा नंतर तिसऱ्या दिवशी अनेक वेळा राख नसल्यामुळे मयताच्या नातेवाईकांना नुसती अंत्यसंस्कार केलेल्या जागेची पुजा करुन घरी परतावे लागत आहे. त्यामुळे खरोखरच मड्याच्या टाळुवरचे लोणी खाण्याचा म्हणतातना त्या प्रमाणे आहे हा प्रकार. दरम्यान या प्रकाराकडे गांभिर्याने पाहून पालिकेने तसेच पोलिस प्रशासनाने संबंधितांना जेरबंद करावे अशी मागणी नागरिकांमधून केली जाते आहे.

शहर तसेच उपनगरातील एखाद्या व्यक्तीचा मृत्यु झाल्यास त्याच्यावर येथील गोपाळपूर रस्त्यावरील वैकुंठ स्मशानभूमीतच अंत्यसंस्कार करावे लागतात. शहराच्या लोकसंख्येचा विचार केल्यास येथे एकच स्मशानभूमी असल्यामुळे साधारणपणे दररोज येथे एक, दोन मयतांवर अंत्यसंस्कार केले जातात. गेल्या काही महिन्यापासून येथील स्मशानभूमीची अवस्था देखील दयनीय झाल्याचे दिसत आहे.

या स्मशानभूमीत सुवासिनी महिलांवर अंत्यसंस्कार केल्यानंतर त्यांच्या अंगावरील सोने मिळविण्याच्या लालसेने अंत्यसंस्कारा नंतर रात्रीच्या वेळी स्मशानातून राख देखील गायब केली जाते आहे. त्यामुळे बऱ्याच वेळा मृतांच्या नातेवाईकांना तिसऱ्या दिवशी पुजेसाठी राख न राहिल्यामुळे केवळ अग्नी दिलेल्या जागेची पूजा करुन घरी परतावे लागते आहे. त्यामुळे या प्रकाराकडे पालिकेने तसेच पोलिस प्रशासनाने गांभिर्याने पाहून याचा त्वरीत बंदोबस्त करावा, अशी मागणी शहर तसेच उपनगरातील सर्वसामान्य नागरिकांमधून केली जात आहे.

### कायमस्वरुपी सुरक्षा व सीसीटीव्हीची व्यवस्था आवश्यक

येथील स्मशानभूमीत सोन्याच्या लालसेने राख चोरुन नेण्याच्या घटना वाढत असल्यामुळे पालिकेने या ठिकाणी कायमस्वरुपी सुरक्षारक्षक नेमण्याची गरज आहे. या बरोबरच या ठिकाणी सीसीटिव्ही यंत्रणेची देखील गरज आहे. त्यामुळे उपद्रवी (दारुडे, जुगार, मटका घेणाऱ्या) मंडळींना चांगली जरब बसुन येथे चालणारे अवैधधंदे प्रकार किंवा धंदे बंद होण्यास मदत होईल.

चार दिवसांपूर्वी आपल्या मावसभावाच्या पत्नीचे निधन झाले. त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी मी गेलेलो होतो. त्या सुवासिनी असल्याने त्यांच्या अंगावर सोन्याचे मणीमंगळसुत्र होते. तिसऱ्या दिवशी गेलेलो असताना सोन्याच्या लालसेने अस्थी आणि राख देखील लंपास झालेली दिसली. हा निर्लज्जपणाचा प्रकार आहे. सोन्याच्या लालसेने मयताच्या अस्थी आणि राख देखील नातेवाईकांना मिळत नाही याला काय म्हणायचे ?

**- शशिकांत हरिदास,**
जिल्हाध्यक्ष, ग्राहक पंचायत



## जयसिंह मोहिते-पाटील यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १ डिसेंबर-**

सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांचा अमृत महोत्सवी वाढदिवस उत्साहात व विविध उपक्रमाने साजरा झशला.

शंकरनगर येथील मोहिते-पाटील यांच्या बंगल्यावर सकाळपासूनच शुभेच्छा देण्यासाठी गर्दी झाली होती. सकाळी जयसिंह मोहिते-पाटील यांना त्यांच्या कुटुंबीयांकडून औक्षण करण्यात आले. पत्नी सुलक्षणादेवी, सुमित्रा खानविलकर, स्वरूपराणी, ऋतुजा मोहिते-पाटील यांच्यासह कुटुंबातील महिलांनी त्यांचे औक्षण केले. नंतर त्यांनी ग्रामदैवत श्री अकलाई देवी, हनुमान मंदिर व सहकार महर्षि शंकराव मोहिते-पाटील यांच्या समाधीचे दर्शन घेतले. नंतर माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील व नंदिनी देवी मोहिते पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते पाटील, शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील, सुभाष दळवी, अशोक जावळे, महादेवा अंधारे, चंद्रकांत कुंभार, विजय दोशी, नारायण फुले, तात्या एकतपुरे लावणी कलावंत प्रमिला लोदगेकर संगीता, लोदगेकर यांनीही शुभेच्छा दिल्या.

## मोहोळच्या ग्रामीण रुग्णालयात 'एक ही भूल' नाटिकाद्वारे एड्स जनजागृती

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. १ डिसेंबर-**

जागतिक एड्स दिनानिमित्त ग्रामीण रुग्णालय मोहोळ येथे एड्स जनजागृती पर आधारित पथनाट्याद्वारे समज व गैरसमज सादर करण्यात आले.

यावेळी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. बालाजी गवाड, डॉ. कुमारी ऋतुजा कवडे, समुपदेशक सुनाबी शेख, टेक्निशन विजय कांबळे, समाधान माळी, परिचारिका कल्पना खरात, सौ. प्रिती घाडगे, सचिन गायकवाड, गोविंद व्यवहारे, आदी. उपस्थित होते.

मोहोळ शहरातील रंगभूमी प्रतिष्ठानच्या वतीने 'एक ही भूल ' या पथनाट्याच्या माध्यमातून एच. आय. व्ही. व एड्स या भिषण आजाराबद्धल असणारे समज - गैरसमज व समाजात असणारा भेदभाव दूर करण्याचा काही अंशी प्रयत्न केला त्यामध्ये प्रमुख कलाकार अमोल महामुनी, राजन घाडगे, अमोल माने, वैष्णवी महामुनी, राजवर्धीनी घाडगे या कलाकारांनी वेशभूषा परिधान करून अभिनयाद्वारे उपस्थितांची मने जिंकली. यावेळी नेटवर्क ऑफ सोलापूर बाय पीपल लिव्हिंग वुईथ एच.आय.व्ही. एड्स.संस्थेच्या वतीने कलाकारांना उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते प्रमाणपत्र देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सुनाबी शेख यांनी केले.



## ब्राम्हण महासंघातर्फे मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१ डिसेंबर-**

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरचे व्यवस्थापक तथा नायब तहसिलदार मनोज बाळकृष्ण श्रोत्री यांना अखिल भारतीय ब्राम्हण महासंघ महाराष्ट्र प्रदेश, पिंपरी चिंचवड, शहर जिल्हा यांचे वतीने सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले आहे.

अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे सचिन कुलकर्णी (पिं. चिं. शहराध्यक्ष), दिलीप कुलकर्णी (प्रदेश सरचिटणीस), महेश बारसावडे (पिं.चिं. कार्याध्यक्ष) यांनी १ डिसेंबर रोजी श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीच्या कार्यालयात उपस्थित राहून मनोज श्रोत्री यांचा सन्मानपत्र, श्रीफळ, शाल देऊन सत्कार करण्यात आला.



श्रोत्री यांनी आतापर्यंत तहसिल कार्यालय पंढरपूर, सांगोला, अक्कलकोट व उपविभागीय अधिकारी, पंढरपूर व मंगळवेढा इत्यादी ठिकाणी सेवा बजावली असून, त्यांना सुमारे २९ वर्षे महसूल सेवेचा अनुभव आहे. या सेवा कालावधीत आतापर्यंत केलेली उल्लेख कामे तसेच व्यवस्थापक म्हणून मंदिर समिती मार्फत कार्तिकी यात्रा २०२४ चे केलेले नियोजन व भाविकांना देण्यात येणा-या सोई सुविधांचा विचार करून अखिल भारतीय ब्राह्मण महासंघा तर्फे सन्मान करण्यात आला आहे. अखिल भारतीय ब्राम्हण महासंघाने केलेल्या सन्मानाने अधिक सकारात्मक सेवा करण्याची ऊर्जा मिळाली असून, ती ऊर्जा पुढील वाटचालीसाठी महत्त्वपूर्ण ठरेल, असे प्रतिपादन व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी केले.

## लवकर निदान झाले तर पुढील आजाराचे संकट टळते

### हृदयरोग तज्ञ डॉ. बिराजदार; शंकरनगर येथील शिबीरात ९४५ रुग्णांची मोफत तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १ डिसेंबर-**

कोणत्याही आजाराचे निदान प्राथमिक अवस्थेत व्हायला हवे. लवकर निदान झाले तर त्याचा फायदा रुग्णांना होतो. त्यामुळे भविष्यातील पुढील संकट टाळले जावू शकते. त्यामुळे दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या आरोग्य शिबीराचा लाभ घेवून रुग्ण बरे झाले तर मोफत आरोग्य शिबीरांचे सार्थक हो ईल, असे मत अकलूज येथील सुप्रसिध्द हृदयरोग तज्ञ डॉ. एम. के. इनामदार यांनी व्यक्त केले.




ग्रामपंचायत शंकरनगर, प्राथमिक आरोग्य केंद्र शंकरनगर व इंडियन मेडिकल असोशिएशन अकलुज यांचे संयुक्त विद्यामाने जयसिंह मोहिते-पाटील व मदनसिंह मोहिते-पाटील यांच्य अमृत महोत्सवी वाटचाली निमित्त शंकरनगर येथील प्राथमिक केंद्रात आयेजीत करण्यात आलेल्या मोफत आरोग्य शिबीराचे ऊद्घाटन कृषी ऊत्पन्न बाजार समिती अकलूजचेचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

सकाळी ९.३० वाजता आयोजीत करण्यात आलेल्या या शिबीरामध्ये मोफत आरोग्य व रक्तदान शिबीर व महात्मा गांधी जन आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. दिवसभर सुरु आलेल्या या शिबीरामध्ये ३४५ नेत्रबिंदू तपासणी करण्यात येवून त्यापैकी ४५ रुग्णांची शस्त्रक्रियेसाठी नोंद करण्यात आली. तसेच रक्तदाब १५, कान, नाक, घसा-२५, ख्रिरोग-६५, जनरल ८६, सी.बी.सी-३५, अस्थि-२५५, कपथेरपी २७५, हृदयरोग, बी. पी. शुगर-५५ अशा ९४५ विविध रुग्णांची तपासणी करण्यात आली. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रियंका शिंदे, सरपंच, वर्षा सरतापे, डॉ. नितीन एकतपुरे, डॉ. संतोष खडतरे, डॉ. संजय सिद, डॉ. कदम, डॉ. रावसाहेब गुळवे, डॉ. अभिजीत राजेभोसले, डॉ. सुरज महाडिक, डॉ. छाया दगडे, डॉ, काळे, डॉ. वाघमोडे, डॉ. नलवडे, डॉ. चंडगर, डॉ. थोरात, डॉ. रोहित देशमुख आदी उपस्थित होते. सुत्रसंचालन विठ्ठल नष्टे यांनी केले



## घारगाव येथे श्री काळभैरवनाथ जन्मोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १ डिसेंबर-**

करमाळा तालुक्यातील घारगाव येथील ग्रामदैवत श्री काळभैरवनाथ महाराज यांचे मंदिर प्रसिद्ध आहे. येथे सालाबाद प्रमाणे वर्ष ३४ वे अखंड हरिनाम सप्ताह, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा या कार्यक्रमाचे आयोजन ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आले होते. त्यावेळी घारगावच्या माजी सरपंच तथा विद्यमान ग्रामपंचायत सदस्या लक्ष्मी सरवदे सामाजिक कार्यकर्ते संजय सरवदे आणि सरवदे परिवार यांच्याकडून १०१ हरिपाठ पुस्तकाचे वाटप करण्यात आले. हभप घोडके महाराज, शंकर लेकुरवाळे देविदास सरवदे यांच्या हस्ते हरिपाठ पुस्तिका वाटप करण्यात आल्या. त्यानंतर सरवदे परिवाराकडून सर्व भक्तांना दरवर्षीप्रमाणे अन्नदान करण्यात आले.

## महाराष्ट्रात गाजताहेत सध्या तीन E

आपल्या महाराष्ट्रात सध्या ३ ए एकदम जोरात आहेत. हे तिन्ही E सध्या खूप गाजत आहेत.

यातला पहिला E म्हणजे आपल्या महाराष्ट्राचे सध्याचे काळजीवाहू मुख्यमंत्री माननीय श्री. एकनाथ शिंदे साहेब.

दुसरा गाजणारा E म्हणजे एतच् ( इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीन ) आणि तिसरा सध्या गाजत असलेला E म्हणजे Exit Poll. वरकरणी पाहता या ३ E मधे काहीही साम्य नाही.


कारण....

यातला पहिला E ( एकनाथ शिंदे साहेब) ही एक व्यक्ती आहे.

दुसरा ए हे एक यंत्र आहे आणि तिसरा E ही एक यंत्रणा आहे. त्यामुळे हे तीन ए सध्या एकाच वेळी चर्चेत आहेत हे या ३ गोष्टींमध्ये एकमेव साम्य आहे आणि ते असे एकाचवेळी चर्चेत आहेत हा योगायोग आहे इतकेच खरं तर यात साम्य किंवा संबंध आहे हे लक्षात घेऊन हा विषय इथे थांबवता आला असता.

**पण म्हणतात ना ....**
**मन चिंती ते वैरी न चिंती !**
**माझे अगदी तसेच झाले.**

सारे व्यावसायिक आयुष्य ऊींर डशीि मधे पॅटर्न शोधण्यात गेल्याचा दुष्परिणाम असेल कदाचित! (पुन्हा मनाने संकेत दिला की आपल्या मराठीतला सगळ्यात जास्त धोकादायक शब्द म्हणजे कदाचित ! ) एकदा असे वाटायला लागल्यानंतर लक्षात आले की या तिन्ही ए चा एकत्रित विचार करता येण्याजोगा आहे ... कारण यात काही बाबतीत फरक असला तरी काही बाबतीत साम्यही आहे...




यााबाबत सगळ्यात पहिल्यांदा लक्षात आलेली गोष्ट म्हणजे हे तिन्ही E (एकनाथ शिंदे साहेब, इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीन, exit Poll) सध्या चर्चेत येण्याची सुरुवात किंवा प्राथमिक कारण एक आहे. ते म्हणजे नुकतीच होऊन गेलेली आपल्या महाराष्ट्राच्या विधानसभेची निवडणूक ! याबाबतची दुसरी गोष्ट म्हणजे या निवडणुका होण्याआधी या तिन्ही गोष्टीबाबत आपल्या महाराष्ट्राच्या विधानसभेची निवडणूक जाहीर होण्याआधी कोणाची फारशी काही तक्रार नव्हती. ५० खोके, गद्दार वगैरे शब्द फारसे काही बोचरे उरलेले नव्हते. पण ही निवडणूक ... मतदान आणि निकाल या दोन्हीं अर्थाने . होऊन गेली आणि या तिन्ही ए चे आपल्या महाराष्ट्राच्या समाजकारणातले स्थानच एकदम बदलले.



आता हेच बघा ना ! निवडणूक होईपर्यंत एकनाथ शिंदे साहेब एकदम कार्यक्षम मुख्यमंत्री होते. निवडणूक निकाल जाहीर झाले आणि ते पार काळजीवाहू मुख्यमंत्री, झाले की हो राव ! बरं , काळजीवाहू मुख्यमंत्री होण्यात काही गैर नाही. तो संसदीय संकेत आहे. तो आपला महाराष्ट्र दर निवडणुकीनंतर कसोशीने पाळतो. पण एकनाथ शिंदे साहेब मुख्यमंत्री असताना ते सत्तेत येण्यापूर्वी त्यांच्या आधीच्या काळात मुख्यमंत्री असणाऱ्या उद्धव ठाकरे साहेब यांच्याविषयी म्हणायचे की ठाकरे साहेब घरून सरकार चालवत असत ! पण शिंदे साहेब काळजीवाहू मुख्यमंत्री झाल्यापासून एकतर दिल्लीत तरी होते , नाहीतर त्यांच्या गावी दरे इथे ! म्हणजे नेमके कोण कोणाची काळजी ....

अशीच स्थिती त्या एतच् म्हणजे Electtonic Voting Machines ची ! जून २०२४ मधे पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीचे निकाल लागले तेव्हा त्यांच्या विरुद्ध एक शब्द नाही . त्यानंतर अवघ्या ६ महिन्यात आपल्या महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका झाल्या आणि त्यानंतर हा गदारोळ.... दैव देते आणि कर्म नेते असे कोण तरी म्हणले म्हणे ! झाले होते इतकेच की . लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला जास्त जागा मिळाल्या होत्या ; विधानसभा निवडणुकीत महायुतीला ! माझा एक मित्र काल सांगत होता की त्याला एतच् विचारत होते त्यावेळी बाबा आढाव महायुतीच्या बाजूने .....

Exit poll या तिसऱ्या ए ची स्थिती आधीच्या दोन ए पेक्षा काही फारशी वेगळी नाही. त्यांचे यावेळचे अंदाज असे काही चुकले आहेत की Exit Poll हे प्रकरण मिडिया मंडळीना दिलेली Employment Guarantee Scheme असण्या पलीकडे फारसे काही महत्व देण्याजोगे नाही असे वाटायला लागावे. एक गोष्ट नक्की की या तिन्ही ए नी या ना त्या अर्थाने गेला महिना अक्षरशः गाजवला आणि दुसरी गोष्ट म्हणजे या तीन गोष्टींवर असा आणि इतका प्रकाशझोत अजून फार काळ टिकणार नाही ... ते नजरेआड होणार नाहीत हे खरे असले तरी .... अर्थात या तिघांनी अचानक काहीतरी वेगळेच रूप दाखवले ीक्ष मात्र हे चित्र नक्कीच बदलेल !

**- चन्द्रशेखर टिळक**

## संक्षिप्त वृत्त



### भावसार व्हिजन सेंट्रलच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्याला सायकल भेट

**सोलापूर, दि.१ डिसेंबर-**

भावसार व्हिजन सोलापूर सेंट्रल क्लबचे प्रकल्प संचालक अभियंता सागर पुकळे यांचे वडीलांच्या शासकीय सेवानिवृत्तीनिमित्त भावसार व्हिजन एरिया १०५ च्या गव्हर्नर सौ. सविता अभंगे मॅडम यांच्या शुभहस्ते भावसार व्हिजन सोलापूर सेंट्रलच्या माध्यमातून एका गुणवंत विद्यार्थ्याला शिक्षणाची सोय व्हावी म्हणून सायकल भेट देण्यात आली. यावेळी अध्यक्ष लक्ष्मीकांत मुसळे, एनईसी सदस्य अश्विन डोईजोडे, सुषमा डोईजोडे, राजेश झिंगाडे, ज्योती झिंगाडे, सिद्राम हंचाटे, सुधीर क्षीरसागर, प्रभाकर जवळकर आदी उपस्थित होते.



### एन.ए.बी. निवासी अंधकार्यशाळेत सारिका सोनावणे यांचे मार्गदर्शन

**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

एन.ए.बी.संचलित एन.ए.बी. निवासी अंधकार्यशाळेत मानसिक आरोग्य व यशस्वी जीवन या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. सोलापूर आरोग्य विभागाचे सारिका सोनावणे ह्या प्रमुख व्याख्याता म्हणून लाभले. आपल्या व्याख्यानात त्यांनी मानसिक संतुलन कसे राखावे व यशस्वी जीवन कसे जगावे तसेच मेडिटेशनचे जीवनातील महत्त्व याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. त्यांच्या समवेत सोनाली गवळी उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारून आपले शंकाचे निरसन केले. यावेळी कार्यशाळेचे अधिक्षक रामचंद्र कुलकण, रियाज मुल्ला व आकांक्षा भंडारे व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

### चैत्यभूमीला महापरिनिर्वाणदिनी येणाऱ्या वाहनांना टोल माफी देण्याची मागणी

**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

सहा डिसेंबर रोजी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी मुंबई येथे अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या आंबेडकरी अनुयायांच्या सर्व वाहनांना टोल माफी करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश चिटणीस शशिकांत कांबळे यांनी निवेदनाद्वारे केली आहे. दरवर्षी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी मुंबई येथे अभिवादन करण्यासाठी देशातील सर्व राज्यातून लाखोच्या संख्येने आंबेडकरी अनुयायी येत असतात. बहुजन समाजाच्या भावनेचा आदर करून सहा डिसेंबर रोजी चैत्यभूमी मुंबई कडे येणाऱ्या राज्यातील सर्व वाहनांना टोल माफी करावी, असे पाठविलेल्या निवेदनात म्हटले आहे. दरम्यान, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी यासंदर्भात तातडीने निर्णय घेऊन संबंधित विभागाला आदेश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.



### सेवाभावी प्रोजेक्टमध्ये आयएएस अशोक काकडेंचे योगदान मोलाचे

**मुंबई, दि. १ डिसेंबर-**

▶▶ **राज्यपालांच्या हस्ते सेवा रत्न पुरस्काराने अशोक काकडे सन्मानित**

सेवाभावी अधिकारी म्हणून सर्वांना परिचित असणारे सारथीचे व्यवस्थापकीय संचालक आय. ए. एस. अधिकारी अशोक काकडे यांना उत्कृष्ट सेवाभावी कार्याबद्दल 'सेवा रत्न पुरस्कार' देऊन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. काकडे यांनी त्यांच्या कारकिर्दीमध्ये शासनाच्या अनेक सेवाभावी प्रोजेक्टमध्ये आपले मोठे योगदान दिले आहे. साईदिशा प्रतिष्ठान व इंडियाज टॅलेंट सम्मान फोरम (आयटीएसएफ) या संस्थेच्यावतीने यंदाचा सेवा रत्न पुरस्कार विलेपार्लेच्या मुकेश पटेल सभागृह मोठ्या उत्साहात संपन्न झाला. ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, अभिनेते सयाजी शिंदे, गायक शंकर महादेवन, गायिका वैशाली सामंत यांना नटसम्राट बालगंधर्व गौरव पुरस्कार तर गायिका पिहू शर्मा आणि गायक अंगद राज यांना नटसम्राट बालगंधर्व रायझिंग स्टार अवॉर्ड पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. साईदिशा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष समाजसेवक दत्तात्रय बाळकृष्ण माने व इंडियाज टॅलेंट सम्मान फाऊंडेशन या संस्थेच्या माध्यमातुन दर वर्षी या पुरस्काराचे आयोजन करण्यात येते. पुरस्काराला उत्तर देताना काकडे म्हणाले, शासनाने माझ्याकडे वेगवेगळे प्रोजेक्ट दिले होते. त्या प्रोजेक्टच्या माध्यमातून अनेक चांगली काम माझ्या हातून घडली. लहानपणापासून माझ्या वडिलांची एक शिकवण आहे, ती म्हणजे लोकांचे आशीर्वाद घेण्यासाठी आपण काम करायचे. सध्या सारथीच्या माध्यमातून चार साडेचार हजार हातांना काम मिळाले. देशभरामध्ये आयएएस, आयपीएस हा टक्का मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. राज्यपालांकडून मिळालेली ही शाबासकीची थाप, मला पुढील कामकाजासाठी अत्यंत प्रेरणादायी राहील.

# चळवळीतील पक्षांकडे मतदारांनी फिरवली पाठ!

## वंचितच्या ८ उमेदवारांना २६ हजार तर बसपाच्या ११ उमेदवारांना ११ हजार मते

▶▶ रासप ६, मनसे ४ तर प्रहारचे २ उमेदवार होते मैदानात

▶▶ सर्व उमेदवारांचे झाले डिपॉझिट जप्त




**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

यंदाच्या विधानसभा निवडणुकीत सोलापूर जिल्ह्यात चळवळीतील राजकीय पक्षांकडे मतदारांनी सपशेल पाठ फिरवली असल्याचे चित्र मताच्या आकडेवारीवरून स्पष्ट होते. वंचित बहुजन आघाडीच्या ८ उमेदवारांना २६ हजार तर बसपाच्या ११ उमेदवारांना ११ हजार मते मिळवता आली आहेत. प्रहार २, रासप ६ तर मनसेने ४ उमेदवार निवडणुकीच्या मैदानात उतरवले होते. या सर्व उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले आहे.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत सोलापूर जिल्ह्यात वंचित बहुजन आघाडी, बसपा या चळवळीशी निगडित असलेल्या राजकीय पक्षांना म्हणावी तेवढी मते मिळाली नाहीत. हक्काच्या मतदारांनीही त्यांच्याकडे पाठ फिरवली असल्याचे दिसून येते. मराठीच्या मुद्द्या वरून कार्यरत असलेल्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनेही यंदाच्या या निवडणुकीत जिल्ह्यात उमेदवार उभे केले होते. रासप आणि प्रहार जनहित पक्षानेही विविध मतदारसंघात आपली उमेदवारी दाखल केली होती. मात्र, या पक्षांनाही मतदारांनी खंबीर असे पाठबळ दिलेले नाही. अत्यंत कमी मते या पक्षांना मिळाली आहेत.

### 'वंचित'चे ८ उमेदवार निवडणूक मैदानात

यंदाच्या विधानसभा निवडणुकीत सोलापूर जिल्ह्यात एकूण ११ लोकसभा मतदारसंघांपैकी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने ८ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. या सर्व उमेदवारांना मिळून वंचितला एकूण २६ हजार ३९७ मते मिळाली आहेत. यामध्ये माढा मतदार संघातील राहुल चव्हाण यांना २,२३१, बार्शी - धनंजय जगदाळे १,२४४, सोलापूर उत्तर - विक्रांत गायकवाड २,४७७ , सोलापूर शहर मध्य- श्रीनिवास संगेपाग १,५६३ , अक्कलकोट - संतोषकुमार इंगळे ३,८०७, सोलापूर दक्षिण - संतोष पवार ११,३४३ , पंढरपूर -मंगळवेढा - अशोक माने १,४६४, माळशिरस - राज कुमार यांना २,२६८ मते मिळाली. विशेष म्हणजे मोहोळ या अनुसूचित जातीसाठी राखीव मतदार संघातील उमेदवाराचा अर्ज छाननीत बाद झाला.

### ११ मतदारसंघात बसपाच्या हत्तीला केवळ ११ हजार मते

बहुजन समाज पार्टीने जिल्ह्यात सर्वच ११ विधानसभा मतदारसंघात उमेदवार उभे केले होते. सर्वच उमेदवारांच्या मतांची गोळाबेरीज पाहिली असता एकूण १० हजार ९४७ मते बसपाला मिळवता आली. यामध्ये करमाळा - संजय वामन शिंदे १,५२५, माढा- अभिजीत धनंजय पाटील १,०२७, बार्शी- मनोज कांबळे ६३७ , मोहोळ- बळीराम मोरे १,०२९, सोलापूर उत्तर - शीलवंत काळे १,५४७ , सोलापूर मध्य - डॉ. सुभाष गायकवाड ६१४ , अक्कलकोट - इकरार शेख ६९४ , सोलापूर दक्षिण- कपिल कोळी १,०२५, पंढरपूर - दत्ता वाडेकर ६७७, सांगोला - शशिकांत गडहिरे ८४८, माळशिरस सुरज सरतापे १,३ २४ मते मिळाली आहेत.

**मनसेच्या ४ उमेदवारांना एकूण ७१३१ मते**

सोलापूर जिल्ह्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने ४ मतदारसंघात आपले उमेदवार उभे केले होते. त्या चारही उमेदवारांना एकूण ७,१३१ मते मिळाली आहेत. म्हणावी तेवढी मते मनसेला जिल्ह्यात मिळू शकले नाहीत.

### चळवळीतील पक्षांकडून निवडणुकीच्या पूर्वतयारीचा अभाव

चळवळीतील पक्षांकडून निवडणुकीच्या पूर्वी आवश्यक ते नियोजन, मोर्चे बांधणी, पक्ष संघटन, योग्य रणनीती या बाबींचा अभाव दिसून येतो. निवडणूक जाहीर झाली की लगबग दिसून येते. ऐनवेळी उमेदवारांची शोधा शोध केली जाते. यामुळेच या पक्षांना म्हणावे तेवढे मतदान झाल्याचे दिसून येत नाही. ऐनवेळी घाई गडबडीत निवडणूक उरकून घेण्याचा प्रकार केला जातो. वैचारिक वारसा असलेल्या या पक्षांनी निवडणूकपूर्व नेटके नियोजन केल्यास चांगले यश मिळू शकते, असे राजकीय वर्तुळातून बोलले जात आहे.

चार उमेदवारांना मिळालेली मते याप्रमाणे - सोलापूर उत्तर विधानसभा मतदारसंघात परशुराम (प्रशांत) इंगळे यांना १,१५५, अक्कलकोट मल्लिनाथ पाटील १,२९३ , सोलापूर दक्षिण - महादेव कोगनुरे २१५५ तर पंढरपूर - दिलीप धोत्रे यांना २,५२८ मते मिळवता आली.

**सोलापूर दक्षिणमध्ये प्रहार तिसऱ्या क्रमांकावर**

जिल्ह्यात ११ मतदारसंघापैकी केवळ दोन मतदारसंघात प्रहार जनहित पक्षाच्या वतीने दोन उमेदवार उभारण्यात आले होते. यापैकी सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघात बाबा मिस्त्री यांना तिसऱ्या क्रमांकाची २६ हजार ७०६ मते मिळवता आली. तर अक्कलकोट मतदार संघातील जमीर शेख यांना केवळ ७९८ मते मिळाली. दोन्ही उमेदवारांना मिळून एकूण २७ हजार ५०४ मते मिळू शकली आहेत.

**रासपचे ६ उमेदवार मैदानात**

राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने यंदाच्या निवडणुकीत एकूण सहा विधानसभा मतदारसंघात आपले उमेदवार उभे केले होते. या उमेदवारांना एकूण ३,६८८ इतके मते मिळवता आली आहेत. यामध्ये बार्शी विधानसभा मतदारसंघात किशोर गाडेकर यांना २७४ मते, मोहोळ - नागनाथ क्षीरसागर यांना ६२९, अक्कलकोट- सुनील बंडगर यांना १,३१२, सोलापूर दक्षिण - उमेश काळे यांना १९३ , पंढरपूर -मंगळवेढा - पंकज देवकते ८५५ तर माळशिरसमध्ये सुनील लोखंडे यांना ४२५ मते मिळाली.

# लोकमंगलचा सामूहिक विवाह सोहळा १५ डिसेंबरला

## विवाह नोंदणी सुरू; १० डिसेंबर अंतिम मुदत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

दरवर्षी परंपरेप्रमाणे होणारा लोकमंगल फाउंडेशनच्यावतीने आयोजित सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळा यंदा १५ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ६.१५ वाजता गोरज मुहूर्तावर विजापूर रोडवरील शिवाजी अध्यापक विद्यालयाच्या प्रांगणात पार पडणार आहे. हा लोकमंगल फौंडशनतर्फे होणारा ४२ वा सामुदायिक विवाह सोहळा आहे, अशी माहिती लोकमंगल फौंडेशनच्यावतीने देण्यात आली. दरम्यान, या विवाह सोहळ्यासाठी नाव नोंदणीसाठी मंगळवार, दि. १० डिसेंबर अंतिम तारीख आहे.

विवाह सोहळ्यासाठी सोलापूर शहरासह जिल्ह्यामध्ये लोकमंगल बँक, लोकमंगल नागरी पतसंस्था, लोकमंगल मल्टीस्टेट, आदी एकूण १२५ पेक्षा जास्त माहिती केंद्राची व्यवस्था करण्यात आली आहे. या विवाह सोहळ्यामध्ये जास्तीत जास्त विवाह इच्छुकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन लोकमंगल फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी विकास नगर येथील लोकमंगल फौंडेशनच्या ऑफीसला संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या विवाह सोहळ्यात प्रत्येक वधू-वरास विवाहाचे कपडे, हळदीचे कपडे, वऱ्हाडी मंडळीच्या भोजनाची सोय, मानाचा आहेर, स्वतंत्र मेकअप करण्याची व्यवस्था, वधूस मणी मंगळसूत्र व जोडवे देण्यात येणार आहेत. ताट, वाटी, ग्लास प्रत्येकी ५ नग, स्टील हंडा, स्टील डबा, तांब्या आदी संसारोपयोगी साहित्य देण्यात येणार आहे. वधू- वरांची सोलापूर शहरातील प्रमुख मार्गाने मिरवणूकही काढण्यात येणार आहे. याशिवाय प्रत्येकाच्या धर्माप्रमाणे विवाह लावून दिले जाणार आहेत.

### आतापर्यंत ३ हजार ८९ जोडपी विवाहबद्ध

लोकमंगल फौंडशनतर्फे होणारा ४२ वा सामुदायिक विवाह सोहळा आहे. आतापर्यंत ३ हजार ०८९ जोडपी विवाहबद्ध झाली आहेत. यामध्ये हिंदू २ हजार ३८२, बौद्ध ६७६, मुस्लिम २०, जैन ७ तर ख्रिश्चन समाजाचे ७ विवाह झाले आहेत. या विवाह सोहळ्यातही इच्छुक वरवधुंनी आपली नोंदी करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.



सोलापूर : महाराष्ट्र लोकसेवा आयोग राज्यपत्रीत गट अ आणि ब ची राज्य सेवा पूर्व परीक्षा परीक्षा रविवार झाली. सोलापूर जिल्ह्यातील १८ हजार तर शहरातील ७ हजार ८०० परीक्षार्थींनी शहरातील १८ केंद्रावर दोन सत्रात ही परीक्षा झाली. या परीक्षेसाठी राज्यातील अडीच लाख विद्यार्थी परीक्षेला बसले होते. संगमेश्वर कॉलेज परिसरात टिपलेले छायाचित्र. (छायाचित्र : केवल तिवारी)

# श्री क्षेत्र बाळे येथील श्री खंडोबा यात्रा आजपासून

## सर्वत्र घुमणार येळकोट... येळकोट... जय मल्हारचा जयघोष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१ डिसेंबर**

''सोलापूर शहर जिल्ह्यात घुमणार येळकोट येळकोट... जय मल्हारचा जयघोष........ श्री खंडोबा देवाच्या यात्रेस होणार प्रारंभ.....'' बाळे येथील श्रीक्षेत्र खंडोबा मंदिर परिसरात आता सुरू होणार आहे. खंडोबा यात्रेच्या धार्मिक विधीस लवकरच प्रारंभ होणार आहे. यात्रेच्या अनुषंगाने मंदिर समितीच्या वतीने सर्व तयारी करण्यात आली आहे. भाविकांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे अन् खासगी सुरक्षारक्षक तैनात करण्यात येणार असून, मंदिरावर विद्युत रोषणाई बरोबरच रंगरंगोटीचे काम पूर्ण झाले आहे.

दरम्यान, सोमवार दिनांक २ डिसेंबर २०२४ रोजी श्रींच्या गाभाऱ्यात घटस्थापना करण्यात येणार आहे. त्यानंतर चंपाषष्ठी निमित्त शनिवार ७ डिसेंबर २०२४ रोजी काकडा आरती अभिषेक व महापूजा पालखी सोहळ्याने यात्रेस उत्साहात, आनंदमय वातावरणात तसेच मंगलमय वाद्यांच्या तालावर प्रारंभ होणार आहे. शनिवार दी.७ डिसेंबर रोजी चंपाषष्ठी निमित्त



### श्री खंडोबा यात्रेनिमित्त तयारी सुरू

बाळे खंडोबा यात्रेच्या अनुषंगाने रंगरंगोटी, सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सीसीटीव्ही कॅमेरे, मंडप उभारणे, दर्शन रांग, स्वच्छता, खेळणी व प्रासादिक स्टॉल उभारण्याचे काम सुरू आहे. महापालिका सिटी बस सेवा आणि पाण्याची सोय करणार आहे. त्याचा अनुषंगाने यात्रा काळात दर्शनासाठी मंदिर दिवसभर खुले राहणार आहे. देवस्थान ट्रस्टच्या वतीने या ठिकाणी नेटके नियोजन करण्यात आले आहे.

**-विनोद ढेपे अध्यक्ष, श्री क्षेत्र बाळे खंडोबा देवस्थान.**

तसेच यात्रेचा पहिला रविवार दि. ८, दुसरा रविवार १५, तिसरा रविवार २२ आणि चौथा रविवार २९ डिसेंबर २०२४ याचारही रविवारी खंडोबा देवाची यात्रा भरणार आहे.

### यंदा चार रविवार; विविध धार्मिक कार्यक्रम होणार

चंपाषष्टी शनिवार, चार रविवार असे एकूण चार दिवस खंडोबा देवाची यात्रा भरणार आहे. दिवसभर जागरण गोंधळ, वाघ्या मुरळी नाचवणे, तळी भंडारा उचलणे, वारू सोडणे, नवस फेडणे, जावळ काढणे आदी धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. या यात्रेत दर्शनासाठी लाखो भाविक महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्र या राज्यातून येतात.

याप्रत्येक रविवारी पहाटे ५.०० वाजता काकड आरती सकाळी ८.०० वाजता अभिषेक व महापूजा सायंकाळी ८.०० वाजता अभिषेक महापूजा सायंकाळी ७.०० वाजता घोडा व नंदी ध्वजासह पालखी सोहळा होणार आहे.

### सुरक्षेच्या दृष्टिकोनातून राहणार सीसीटीव्ही कॅमेऱ्याची करडी नजर

तसेच यात्रेनिमित्त रविवार दि.५.०० जानेवारी रोजी महाप्रसाद वाटप कार्यक्रमाने या यात्राची सांगता होणार आहे. यात्रेचे मानकरी पाटील, तोडकरी, कांबळे, सुरवसे व गावडे आदिसह इतर सर्व मानकरी व भाविकांना मानाचे विडे देऊन प्रसाद वाटप करण्यात येतो.

### भाविकांची गर्दी; दर्शनरांगेचे योग्य नियोजन

यात्रेच्या अनुषंगाने दरवर्षी मंदिरात होत असलेल्या भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेऊन यंदा मंदिर समिती प्रशासनाने दर्शनासाठी भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता विशेष दर्शनरांग तयार करण्यात येत आहे. स्त्रीयांसाठी वेगळी अन् पुरुष भाविकांसाठी वेगळी दर्शनरांग असणार आहे. दर्शनरांगेतील घुसखोरी रोखण्यासाठी सुरक्षारक्षक तैनात करण्यात येणार आहे. मनपाने मंदिर परिसरातील खड्डे बुजविले आहेत.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## विवाहितेच्या छळप्रकरणी पतीसह सहा जणांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

विवाहिता ही सासरी नांदत असताना सासरकडच्या मंडळींनी मिळून शारीरिक व मानसिक तसेच आर्थिक त्रास देऊन छळ केल्याची फिर्याद निलोफर जुबेर कलबुर्गी (वय-४०,रा.बसवेश्वर नगर भाग २ नई जिंदगी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती जुबेर कलबुर्गी,सासू शमी कलबुर्गी,दीर समीर अब्दुल,सादिक अब्दुल,जाऊ हिना जमीर,सलमा (सर्व.रा.शास्त्रीनगर,सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना १५ डिसेंबर २००६ ते



३० ऑक्टोंबर २०२४ रोजी पर्यंतच्या दरम्यान फिर्यादी यांच्या सासरी घडली.या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल शिंदे हे करीत आहेत.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### विद्यानिकेतन हायस्कूलमध्ये संविधान दिन साजरा

**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

बाहूसार शिक्षण प्रसारक मंडळ संचलित विद्यानिकेतन हायस्कूलमध्ये संविधान दिवस साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक गोपीनाथ नवले हे अध्यक्षस्थानी होते. सहशिक्षक अविनाश वळसंगकर यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी सहशिक्षक जगदीश अळ्ळीमारे यांनी भारतीय संविधानाची निर्मिती कशी झाली याबाबत विस्तृत माहिती आपल्या मनोगतातून दिली. इयत्ता पाचवी-अ चा विद्यार्थी अमीर शेख यानेही आपल्या भाषणातून भारतीय संविधानाची माहिती सांगितली. त्याचबरोबर प्रशालेतील सर्व विद्यार्थी व सर्व शिक्षकांनी संविधानाचे वाचन केले. या कार्यक्रमास प्रशालेचे पर्यवेक्षक शंकरगिरी गिरी क्रीडाप्रमुख रेणुका खमितकर यांचे विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षिका रूपादेवी राजगे यांनी केले. तर सहशिक्षक राजकुमार लवटे यांनी सर्वांचे आभार मानले.

### राष्ट्रसंत, विश्वभूषण विद्यालयात फुले यांचा स्मृती दिन साजरा

**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

सदसंकल्प शिक्षण व समाजसेवा संस्थेच्या राष्ट्रसंत प्राथमिक शाळा व विश्वभूषण विद्यालयाता महात्मा ज्योतीबा फुले यांचा स्मृती दिन साजरा करण्यात आला. राष्ट्रसंतमध्ये श्री. लालखा व मुख्याध्यापिका मंजुश्री खंडागळे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा दिन साजरा झाला. यावेळी विद्यार्थ्यांनी शैक्षणिक कार्याचे पोस्टर, म नोगत, एकांकिका व नाटक सादर केले. डी. पी. भालशंकर यांनी प्रास्ताविक केले. पी. व्ही दराणे यांनी सुत्रसंचालन केले. विश्वभूषण विद्यालयात श्री. धांडे व मुख्याध्यापक सत्यवान पाचकुडवे यांच्या उपस्थितीत फुले यांना अभिवादन करण्यात आले. श्री. व्हनकडे यांनी प्रास्ताविक केले. श्री. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. मुस्कान जमादार यांनी आभार मानले.

### औद्योगिक प्रगती शासकीय धोरणांच्या स्थिरतेवर अवलंबून

**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

महाराष्ट्र विधानसभा २०२४ निवडणुकीत राज्यातील जनतेने महायुतीला २०० हून अधिक जागा देत निर्विवाद बहुमत दिले आहे. हा निकाल महाराष्ट्र राज्याच्या प्रगतीसाठी हितकारी आणि उत्साहवर्धक ठरेल,असे एक उद्योजक या नात्याने वाटते. कारण कोणत्याही राज्याची आर्थिक-औद्योगिक प्रगती ही शासकीय धोरणांच्या स्थिरतेवर अवलंबून असते आणि धोरणे स्थिर राहण्यासाठी तेथील राजवट मजबूत असावी लागते.व तसेच महाराष्ट्राचा कौल विकासालाच अशा शब्दांत अदील ग्रुप ऑफ सुपर स्टोअर्स,दुबई,युएईचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मसालाकिंग डॉ.धनंजय दातार यांनी नव्या सरकारला शुभेच्छा दिल्या.

### मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये फुले यांची पुण्यतिथी साजरी

**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

मजरेवाडी शिक्षण प्रसारक मंडळाच्या श्री मल्लिकार्जुन हायस्कूल हत्तुरे नगर येथे थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुण्यतिथी साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक वैजिनाथ हत्तुरे होते. प्रमुख अतिथी पर्यवेक्षक रमेश दिंडोरे, धरेप्पा हत्तुरे होते. यावेळी संतोष पनशेट्टी, संग्राम आवताडे, सतिश फुलारी, श्रावणी गायकवाड, श्रावस्ती गायकवाड, अस्मिता तडलगी या विद्यार्थ्यांनी भाषणे केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पवनराज स्वामी यांनी केले. सूत्रसंचालन श्राविका केसकरने केले. श्रावणी मायनाळे यांनी आभार मानले. यावेळी सांस्कृतिक विभाग प्रमुख सुकेशनी गंगोंडा, दत्तात्रय अगरखेड आदी उपस्थित होते.

### टुगेदर वी सोअर या मोहीमेचा शुभारंभ

**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

श्रीराम फायनान्स लिमिटेडने टुगेदर वी सोअर ही प्रेरणादायी नवीन ब्रँड मोहीम सुरू केली आहे. श्रीराम फायनान्सची ही मोहीम,एकतेची शक्ती अधोरेखित करत, म हत्त्वाकांक्षी भारतासोबत भागीदारी करण्याच्या वचनबद्धता प्रतिबिंबित करते.राहुल द्रविडच्या स्वतःच्या आयुष्याचे काही अंश घेऊन,या मोहिमेचा उद्देश हा उत्साह साजरा करणे आणि भागीदारीला पुढे जाण्याचे साधन म्हणून दाखवणे आहे.

# सोलापूरकरांना लागले वेध; पालकमंत्री कोण?

## मागील ५ वर्षात जिल्ह्याला होता उपरा पालकमंत्री; आता मात्र स्थानिकच असण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा । प्रशांत माने**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

विधानसभा निवडणूक निकालानंतर राज्यात महायुतीचे सरकार येणार हे निश्चित असल्याने सोलापूरकरांना आता वेध लागले आहेत ते सोलापूर जिल्ह्याला पालकमंत्री कोण असणार याची होय. कारण २०१९ ते २०२४ या पाच वर्षांच्या कालावधीत महाविकास आघाडी आणि महायुती या दोघांचेही सरकार असताना सोलापूरला मात्र उपराच पालकमंत्री मिळाल्याने सोलापूरचा विकास मोठ्या प्रमाणात रखडल्याची नाराजी सोलापूरकरांची आहे. सोलापूरला कोणी राजकीय वालीच नाही, अशी भावना सोलापूरकरांकडून व्यक्त होत आहे. कारण सोलापूर विकासाचे अनेक मोठे प्रकल्प कासवापेक्षाही संथगतीने सुरु असल्याने सोलापूरच्या विकासाला जणू ब्रेकच लागल्याची खंत सोलापूरकर व्यक्त करीत आहेत.

मागील पाच वर्षात पहिले अडीच वर्षे राज्यात महाविकास आघाडीचे सरकार होते. महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेसकडे सोलापूरचे पालकमंत्रीपद होते. परंतु त्यावेळच्या एकत्रित राष्ट्रवादीने सोलापूरला स्थानिक पालकमंत्री तर दिलाच नाही पण अडीच वर्षांच्या कालावधीत दोन ते तीन पालकमंत्री सतत बदलले. विशेष म्हणजे राष्ट्रवादीचे सोलापूर जिल्ह्यात अनुभवी म्हणजेच सहा टर्मचे आमदार असतानाही राष्ट्रवादीने उपराच पालकमंत्री सोलापूरकरांच्या डोक्यावर आणून बसवला होता. सोलापुरात काम करण्यास त्यांचे उपरे पालकमंत्री इच्छुकच नसल्यामुळे सोलापूरचा विकास तर झालाच नाही पण सोलापूर जिल्हा राज्याच्या इतर जिल्ह्यांच्या तुलनेत वेगळा पडल्याची भावना सोलापूरकरांमध्ये होती. राष्ट्रवादीच्या एका पालकमंत्र्याने तर सोलापूरकरांच्या हक्काच्या उजनी धरणाचे पाणी इंदापूरला पळवल्याने देखील सोलापूरकर प्रचंड नाराज होते. एवढेच काय तर सोलापूर कर्नाटक राज्याला जोडा अशीही तीव्र भावना काही सोलापूरकरांनी रोषाने व्यक्त केली होती.



तर नंतरच्या अडीच वर्षात राज्यात महायुतीचे सरकार होते. महायुतीच्या सरकारमध्ये सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्रीपद हे भाजपाकडे होते. भाजपाने देखील सोलापूरला स्थानिक पालकमंत्री न देता उपराच पालकमंत्री दिला. भाजपाला देखील एकदा पालकमंत्री बदलावा लागला. विशेष म्हणजे भाजपामध्ये देखील दोन आमदार असे होते की, ते दोन्ही मागे २०१४ ते २०१९ कालावधीत मंत्री तर होतेच पण एकजण पालकमंत्री देखील होता. असे अनुभवी आमदार असतानाही भाजपाने स्थानिक पालकमंत्री दिला नाही, म्हणून सोलापूरचा विकास गतीने होवू शकला नसल्याची ओरड सोलापूरकरांची आहे.



ईरसाल राजकारण करणाऱ्या सोलापूर जिल्ह्याने एकेकाळी आणि एकाचवेळी महाराष्ट्राला मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री दिलेले होते. महाराष्ट्राच्या राजकारणात सोलापूर जिल्ह्याचे स्थान नेहमीच म हत्वाचे राहिल्याचा इतिहास आहे. पण गेल्या पाच वर्षात मात्र सोलापूर जिल्हा राज्याच्या राजकारणात मागे पडल्याचे जाणवते आहे. सोलापूर जिल्ह्यातील प्रमुख राजकीय घराण्यांनी पक्ष बदलल्यामुळे जिल्ह्याला सक्षम नेतृत्वच राहिलेले नसल्याचे चित्र होते. सोलापूर जिल्ह्यातील अनेक सिंचनाचे प्रकल्प वर्षेनुवर्षे रखडलेले आहेत. सोलापूरकरांच्या जिव्हाळ्याची सोलापूर ते उजनी जलवाहिनीचे काम मागील अनेक वर्षांपासून संथगतीने सुरु आहे. उजनी धरणावतील पर्यटनाचा विषय देखील कागदावरच आहे. नमामी चंद्रभागा लोक देखील आता विसरले आहेत. पंढरपूर तिर्थक्षेत्र प्राधिकरणाचे काम कासवापेक्षाही संथ आहे. सोलापूर शहरातून होणारे दोन उड्डाणपूल मागील दहा ते बारा वर्षांपासून कागदावरच आहेत. सोलापूरच्या लगत बोरामणी येथे होवू घातलेले आंतराष्ट्रीय विमानतळाचे काम भूसंपादनातच अडकवून ठेवलेले आहे. शेतकऱ्यांची दोन हजार एकर उपजाऊ जमीन गेल्या अनेक वर्षांपासून पडीक पडलेली आहे. सोलापूरच्या होटगी रोडवरील विमानतळावरून विम ानसेवा सुरु होण्याची सोलापूरकरांना आजही प्रतिक्षाच आहे. एका कारखान्याच्या अनधिकृत चिमणीने सोलापूरच्या विकासाचे विमान उडू न दिल्याची शोकांतिका सोलापूरकरांनी पाहिलेली आहे. सोलापूर शहर व जिल्ह्यात रस्त्यांच्या कामांसाठी वारेमाप निधी आणला गेला पण त्यालाही टक्केवारीची झालर असल्यानेच काही प्रम ाणात रस्त्यांची कामे झाली आहेत. आता ही रस्त्यांची कामे किती दर्जेदार झाली तो संशोधनाचा वेगळा विषय आहे. स्मार्ट सिटी योजनेतून सोलापूरकरांना काय मिळाले आणि झालेल्या कामांचा दर्जा काय हा तर किचकट संशोधनाचा विषय आहे.

मागील अडीच ते तीन वर्षांपासून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडलेल्या आहेत. यामुळे सामान्य नागरिक आणि प्रशासन यांच्यातील दुआ नाहीसा झालेला आहे. महापालिका, जिल्हा परिषद, नगरपरिषदा यावर प्रशासक राज असल्याने सामान्य जनता होरपळून निघत आहे. प्रचंड मुजोर झालेल्या प्रशासकीय राजने सामान्य जनतेच्या नागरी समस्या वाऱ्यावर सोडल्या आहेत. अंधळ दळतय अन् कुत्र पीठ खातय असा काहीसा प्रकार सध्या सुरु आहे. ज्या मतदारांच्या जीवावर सत्ताकारण व राजकारण करणाऱ्यांना सामान्य जनतेविषयी काहीच कसे वाटत नसेल, अशी हतबलता आता पिचलेली जनता दबक्या आवाजातच विचारत असल्याची शोकांतिका आहे.

### पालकमंत्री अनुभवी का नवा चेहरा ?

सोलापूर जिल्ह्याला भाजपाचा पालकमंत्री असणार हे निश्चित आहे. जिल्ह्यात भाजपाचे पाच आमदार विजयी झालेले आहेत. आ. सुभाष देशमुख, आ. विजयकुमार देशमुख, आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. समाधान आवताडे, आ. देवेंद्र कोठे यापैकी आमदार अनुभवी आहेत. तरी दोन देशमुख आणि कल्याणशेट्टी यांच्यापैकी कोणाच्या गळ्यात पालकमंत्री पदाची माळ पडणार याची उत्सुकता आहे. पण जिल्ह्याचे नेतृत्व करणारा आणि भविष्यात भाजपाचे दोन खासदार व ८ आमदार विजयी करण्याची जबाबदारी उचलणारा पालकमंत्री भाजपाने द्यावा, अशी चर्चा देखील पक्षातून सुरु आहे. केवळ आपल्या मतदारसंघापुरता पालकमंत्री असेल तर पक्षाचे राजकीय नुकसान होते, हा अनुभव आहे.

## दर महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी संवाद दिन

### जि.प. माध्यमिक शिक्षण विभागाचा नवोउपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१ डिसेंबर -**

शालेय शिक्षण विभागंतर्गत शिक्षण विभाग माध्यमिक जिल्हा परिषद सोलापूर विभागाकडील मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित, अंशःत अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित, सलंग्न सर्व शाळेवर कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रकारच्या तक्रारी व अडचणी असतात. सदर तक्रारी व अडचणी सोडविण्यासाठी जिल्हास्तरावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) कार्यालयाच्या वतीने दर महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी दुपारी ३ वाजता हरिभाई देवकरण प्रशाला येथे संवाद

सर्व शिक्षा अभियान
सब पढ़ें सब बढ़ें

दिनाचे आयोजन करण्यात येणार आहे.

दरम्यान, त्या अनुषंगाने शहर जिल्ह्यातील सर्व शैक्षणिक संस्था आणि शाळेत कार्यरत असणाऱ्या शिक्षकांनी या संवाद दिना दिवशी हजर राहावे, असे निर्देश कार्यालयाकडून संबंधित शैक्षणिक संस्था आणि शाळेंना दिले आहेत. त्या पार्श्वभूमीवर शिक्षकांनी संवाददिन यादिवशी उपस्थित राहून आपले निविदेन व इतर व्यवहार दयावे. तसेच संवाद दिनाकरिता उपस्थित राहणाऱ्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी वरिष्ठांच्या परवानगीने रजा मंजूर करुन घेवून उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा परिषद माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी केले आहे.

## प्रवासात महिलेचे गंठण लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

सैफुल ते मंद्रूप बस मध्ये प्रवासादरम्यान फिर्यादी रेणुका रमेश कोळी (वय-२३,रा. सोलापूर महानगरपालिका कॉटर्स,जुळे सोलापूर) यांनी पर्समध्ये ठेवलेले १ लाख ५ हजार रुपये किमतीचे बारा ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी गंठण अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २९ नोव्हेंबर रोजी सकाळी साडे अकरा ते पावणे दोनच्या दरम्यान सैफुल बस स्टॉप ते मंद्रूप दरम्यान घडली.याप्रकरणी रेणुका कोळी यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल भिसे हे करीत आहेत.

## पशुगणनेसाठी २९२ प्रगणक, ८० पर्यवेक्षक नियुक्त


### पशुपालकांनी पशुगणनेत सहभागी व्हावे

### पशुसंवर्धन अधिकारी डॉ. नरळे यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि १ डिसेंबर-**

केंद्र शासनाच्या आदेशानुसार जिल्हयामध्ये २५ नोव्हेंबरपासून पशुगणना मोहिमेची सुरवात झाली आहे. ही पशुगणना २८ फेब्रुवारी पर्यंत सुरू राहणार असून या कालावधीत प्रगणक घरोघरी जाऊन, पशुधनाची माहिती घेणार आहेत. प्रत्येक गावातील व शहरातील प्रगणक नागरिकांशी संवाद साधून माहिती गोळा करणार आहेत. तरी नागरिकांनी या गणनेत योग्य माहिती देवून सहकार्य करावे असे, आवाहन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. एन.एल.नरळे यांनी केले आहे.

या पशुगणनेमध्ये सर्व प्रजातीच्या पशुधन व कुक्कुट पक्षी जाती लिंग व वय निहाय गणना करण्यात येणार आहे. पशुगणना ही संगणकीय प्रणालीवर होणार असल्याने सदरची पशुगणना करणेसाठी प्रगणकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.



पशुसंवर्धन विभागामार्फत जिल्ह्यात २९२ प्रगणक व ८० पर्यवेक्षकांची नियुक्ती केली आहे. शहरी भागाकरीता ४ हजार घरामागे १ प्रगणक व ग्रामीण भागाकरीता ३ हजार घरामागे १ प्रगणक नियुक्ती केली आहे. पशुगणनेत प्रगणक कुटुंब प्रमुखाचे नाव, त्यांचे शिक्षण, जनावर त्याची प्रजात, वय, लिंग, त्यांचा कोणत्या उद्देशाकरीता पालन केले जाते, त्यापासून मिळणारे उत्पादन आदी विविध माहिती संकलित केली जाणार आहे. कत्तलखाना, दररोज होणाऱ्या जनावर व पक्षीनिहाय कत्तलीची संख्या, गोशाळा, छोटे मोठे नोंदणीकृत व अनोंदणीकृत कुक्कुटपालन संस्था, मांस विक्री केंद्र तेथे रोजची जनावरे, पक्षीनिहाय कत्तल विक्री, मोकाट जनावरे, कुत्रे आदी विविध प्रकारची नोंदणी वेगवेगळ्या पध्दतीने केली जाईल. या पशुगणनेमधून प्राप्त होणारी माहिती पुढील पाच वर्षाचे नियोजन, धोरणात्मक निर्णय व विविध योजनांकरीता उपयुक्त असल्याने सदर पशुगणना महत्वाची आहे. पशुगणना करणाऱ्या प्रगणकांना सर्वतोपरी सहकार्य करावे आवाहनही मुख्य कार्यकारी अधिकारी कूलदिप जंगम, अति मुख्य कार्यकारी अधिकारी संदिप कोहिणकर यांनी केले आहे.

### कोणतेही पशुधन वंचीत राहणार नाही

सर्व ग्रामपंचायत स्तरावरील सर्व सरपंच, ग्राम पंचायत अधिकारी, सर्व कर्मचारी यांनी गावपातळीवर पशुगणना (दि.२५) नोव्हेंबर २०१४ ते (दि.२८) फेब्रुवारी २०२५ पर्यंत होणार असल्यामुळे पशुगणना करणाऱ्या प्रगणकांना सहकार्य करावे. जेणे करून गावपातळीवरील सर्व पशुधनाची नोंद पशुगणनेमध्ये होईल. पशुगणनेपासुन कोणतेही पशुधन वंचीत राहणार नाही.

**-डॉ. एन.एल. नरळे,**
**पशुसंवर्धन अधिकारी सोलापूर.**

## लालपरीचा प्रवास महागणार? प्रवाशांच्या खिशाला कात्री

### एसटीने शासनाकडे पाठवला १४ टक्के भाडेवाढीचा प्रस्ताव

### लाडक्या बहिणीचा सर्वसामान्य जनतेवर पडणार परिणाम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ डिसेंबर**

प्रवाशांच्या सेवेसाठी सार्वजनिक परिवहन व्यवस्था राबवणाऱ्या एसटी महामंडळाने नागरिकांच्या खिशाला कात्री लावण्याची तयारी सुरू केली आहे. यंदा प्रवासी भाड्यात वाढ करण्याचा निर्णय एसटी महामंडळाने घेतला आहे. एसटी महामंडळाने गत तीन वर्षात कोणतीही भाडेवाढ केली नाही. तसेच यंदाच्या दिवाळी हंगामात देखील हंगामी भाडेवाढ केली नाही, असे सांगत तब्बल १४.१३ टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला असल्याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून प्राप्त झाली आहे.



दरम्यान, दरवाढीचा हाच टक्का कायम ठेवल्यास आज असलेल्या १०० रुपयांच्या तिकिटामागे १५ रुपये जादा मोजावे लागतील. उत्पन्नाच्या तुलनेत खर्च भागत नसल्यामुळे महामंडळाने भाडेवाढीचा प्रस्ताव पुढे आणल्याचे सांगितले जात आहे. ( दी.२७ ) नोव्हेंबर २०२१ रोजी तिकीट दरवाढ झाली होती. आता सुरुवातीला १२.३६ टक्के दरवाढ करण्याचा प्रस्ताव शासनाकडे महामंडळाच्या वाहतूक विभागाने पाठविला होता. महामंडळ स्तरावर खलबते झाल्यानंतर त्यात वाढ करण्यात आल्याची माहिती प्राप्त झाली आहे. हा प्रस्ताव १४.१३ टक्के एवढा करण्यात आला आहे. शासन १२.३६ टक्क्याला किंवा १४.१३ टक्के या दरवाढीच्या प्रस्तावाला मंजुरी देते की यातून दुसरा मार्ग काढला जातो, याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

### लाडक्या बहिणींमुळे भाडेवाढ?

शासनाने नवीन लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. अंतर्गत महिलांना १५०० रुपये दर महिन्याला शासनाकडून दिले जात आहेत. त्यामध्ये आणखीन वाढ करून २१०० रुपये देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यामुळे सरकारी तिजोरीवर या अतिरिक्त निधीचा बोजा पडत आहे. त्यामुळे शासनाने आता प्रत्येक क्षेत्रात भाडेवाढ आणि महागाई वाढवण्याचा निर्णय घेतला असल्याचे दिसत आहे.

### सर्वसामान्यांवर पडणार बोजा

एसटी महामंडळाच्या बसेसकडे सर्वसामान्यांच्या प्रवासासाठी अनुकूल सार्वजनिक परिवहन व्यवस्था म्हणून पाहिले जाते. सध्या महागाई वाढल्याने सर्वसामान्य नागरिकांचे जीवन हैराण झाले आहे. अशा स्थितीत एसटी महामंडळाने आणि शासनाने प्रवासी भाडे वाढ केल्यास नागरिकांच्या खिशाला मोठी कात्री बसणार आहे. परिवहन व्यवस्थेचा बोजा पर्यायने नागरिकांवर पडणार आहे.


**-अशोक कुदळे, प्रवासी**

## अहिल्यादेवी होळकर विद्यापीठासमोर अपघात; टँकर चालकावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाच्या समोर अपघात प्रकरणी टँकर क्रं.एमएच.१३. सीयु.९२२२ यातील अज्ञात चालकाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.हि घटना ३० नोव्हेंबर रोजी दुपारी सव्वा दोन वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी सुहास सज्जन शिंदे (वय-३३,मु.पो. कसबा सांगाव,ता.कागल,जिल्हा कोल्हापूर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून वरील टँकर क्रमांकाच्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यााबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी हे कोल्हापूर आगार येथून एसटी बस क्रम ांक एमएच.१३.सीयु.७५३५ म ध्ये प्रवासी घेऊन सोलापूर येथे




वरील ठिकाणी आले असता, रस्त्यावर वाहने थांबली असल्याने फिर्यादी यांनी त्यांच्या ताब्यातील एसटी थांबवली.तसेच त्यांच्या मागे असलेला कंटेनर क्रमांक एमएच.०२.क्यू.जी.४९६३ हा थांबला होता.त्या कंटेनरला वरील क्रमांकाच्या अज्ञात वाहनाने निष्काळजीपणाने व अतिवेगाने वाहन चालून कंटेनरला मागून धडक देऊन कंटेनरच्या समोरील व मागील बाजूस नुकसान होण्यास व तसेच एस टी बसची काच फुटून ३५ हजार रुपयांचे नुकसान होण्यास कारणीभूत झाला असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल कसबे हे करीत आहेत.


सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९६१

**अन्यायी अन्यायी । किती म्हणोन सांगो काई ॥**
**सेना पापाचा पुतळा । तुज शरण जी दयाळा ॥**

आपण काय आहोत हे दाखवण्यासाठी स्वत:च्या चुका, उणीवा, दोष, त्रुटी झाकायच्या आणि इतरांना कमी लेखणे किंवा इतरांना कमी दाखवून आपले मोठेपण सिध्द करण्याचा प्रयत्न करणे चूक असते. खरे म्हणजे दुसऱ्याच्या चुका दाखवणे सोपे असते. पण स्वत:च्या चुका, उणीवा, त्रुटी, दोष दाखवून त्या मान्य करणे, अत्यंत अवघड असते. ज्याला हे अवघड पण अत्यावश्यक काम जमते, तोच खऱ्या अर्थाने मोठा व चांगला असतो. सेनाजींसारखा महात्मा नश्वर देहाच्या मोठेपणासाठी चूक करणे शक्यच नाही. कारण या महात्म्याकडे ईर्षा, द्वेष, मत्सर, काम, क्रोध, अहंकार, लोभ, मीपणा, स्वार्थ आदिला स्थानच नाही. तरीपण सेनाजी आपण, अन्यायी अन्यायी । किती म्हणोन सांगो काई ॥, असे आहोत असे म्हणतात. या अभंगात पश्चाताप झालेल्या भक्तांचे लक्षण व भाव महाराजांनी स्पष्ट केला असावा असे वाटते. यावरून आपण आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे, असे आम्हास वाटते. अनेकांना त्यांच्याकडील दोष, उणीवा, चुका आहेत, हेच मान्य नसते. आपण करतो तेच बरोबर आहे, असे वाटण्यामुळे चुकांची पुनरावृत्ती होते. एखाद्याला तू चुकतो आहेस किंवा तुझ्यात हे दोष, आहेत, असे म्हटले तर वाईट वाटते.



समोरच्याच्या दोष, चुका, त्रुटी सुधारायच्या असतील तर त्या आपल्याकडे घेऊन त्यावरील उपाय सांगणे हा एक मार्ग शिल्लक राहतो. म्हणूनच की काय, सेनाजी पश्चाताप झालेल्या किंवा संसारात अडकलेल्या जीवाकडील काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर, मीपणा, स्वार्थ हे विचारात घेऊन यामुळे आपण चांगले कार्य करण्यापासून दूर राहत असल्याचे सांगतांना ते, काम क्रोध लोभ मोहो । नाडिलो यांचेनी पहा हो ॥, असे म्हणतात. चांगले कार्य करायचे असेल म्हणजेच माणूस म्हणून जगायचे असेल तर या सर्व नको त्या गोष्टीपासून दूर व्हायला हवे. या सर्वांची दूरता म्हणजेच सर्व चांगल्या गोष्टीचे आगमन होय. सेनाजींनी कळत न कळत आपणाला आपल्या चुका दाखवून देण्याचा आणि यातून मुक्त होण्याचा मार्ग दाखविला आहे. जवळपास प्रत्येकजण स्वत: होऊन आपण चांगले कसे आहोत हे सांगत असतो. याच्या उलट आपण कांही प्रमाणात का होईना आपल्या चुका, दोष झाकून ठेवण्याचा प्रयत्न करीत असतो. असे असले तरीही बोटावर मोजता येण्याइतके संत महात्मे त्यांचा चांगुलपणा न सांगता त्यांचे दोष, चुका सांगतात. खरे म्हणजे संत महात्म्यांकडे चुका, दोष असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. कारण ते चुका, दोषास कारणीभूत असणाऱ्या ईर्षा, द्वेष, मत्सर, अहंकार, काम, क्रोध, स्वार्थ इत्यादीतून पूर्णत: मुक्त झालेले असतात. तरीपण असे महात्मे आपण, पापी, दोषी असल्याचे सांगतात. खरे म्हणजे त्यांचे दोष, चुका ह्या सांसारिक प्रकारच्या नसतात. त्यांच्या चुका दोष हे भक्तित, पांडूरंगाच्या सेवेत कमी पडण्याच्या अनुषंगाने असतात. चोखोबाराय म्हणतात, महापापिया उध्दार । एका दरुशनें निर्धार ॥. भगवंताला दोष दाखवायला हवेत. अनेक संतांनी स्वत:ला दोषी, पापी म्हवून घेतल्याचे त्यांच्या साहित्यावरुन दिसून येते. आपण केलेली भक्ती, सेवा ही कमी आहे. सेना पापाचा पुतळा । तुज शरण जी दयाळा ॥, असे त्यांना वाटते. यालाच ते दोष, पाप, चुका समजतात. सेनाजी या अनुषंगाने स्वत:ला पापाचा पुतळा समजून पांडूरंगाला शरण जाण्याची भाषा बोलून दाखवत आहेत. आपणाला सेनाजींच्या या विचाराशी तुलना करून पाहता आली तरी बरेच कांही साध्य होईल असे आम्हास वाटते.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| **वार : सोमवार** | **दिनविशेष - देव दीपावली** |
| **दि. २ डिसेंबर २०२४** | **मार्तंडभैरव षड्रात्रोत्सवारंभ** |
| **विक्रम संवत् २०८०-८१** | **चांगला दिवस** |
| **शके - १९४६** | **....राहू काल....** |
| **संवत्सर - क्रोधी नाम** | **रविवार : दु.४.३० ते ६.००** |
| **मास - मार्गशिर्ष** | **सोमवार : स. ७.३० ते ९.००** |
| **शु प्रतिपदा (१२.४३)** | **मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०** |
| **ऋतु - वसंत** | **बुधवार : दु. १२ ते १.३०** |
| **नक्षत्र - ज्येष्ठा (१५.४५)** | **गुरुवार : दु. १.३० ते ३.००** |
| **योग - धृति (१६.००)** | **शुक्रवार : स.१०.३० ते १२** |
| **करण - बालव (२४.५९)** | **शनिवार : स. ९ ते १०.३०** |

### राशीभविष्य

**मेष :** वादग्रस्त किंवा अडकून पडलेली रक्कम मिळण्याचे योग आहेत.कौटुंबिक वाद होण्याची शंका आहे. राजकीय अधिकाऱ्यांपासून सहकार्य मिळेल.

**वृषभ :** धावपळ केल्याने आपली कामे पार पडणार आहे. नौकरीमध्ये बदल होण्याची शक्यता.

**मिथुन :** सकारात्मक परिणाम अनुभवण्याची आशा ठेवू शकता. व्यापारात विस्तार होण्याची शक्यता आहे.

**कर्क :** ज्यादा फायद्याच्या इराद्याने जोखमीचे कामे स्विकारणे योग्य ठरणार नाही.

**सिंह :** अनकूल परिणाम मिळण्यासाठी सक्रीय राहणे आवश्यक आहे. कौटुंबिक वाद होण्याची शंका आहे.

**कन्या :** अधिकारामध्ये वाढ होईल. व्यापारात अपेक्षेप्रमाणे फायदा नुकसान होईल.अडकून पडलेली कामे मार्गी लागतील.

**तुळ :** कामातील स्थान बदलल्याने व अस्थिरतेमुळे मन दु:खी होईल. सौदेबाजीमध्ये सावधान राहणे फायदेशीर राहील. .

**वृश्चिक :** स्थावर मालमत्ता उदा. जमीन, जागा, घर या संदर्भातील चाललेली बोलणी आपल्या बाजूने राहील. सौदेबाजीमध्ये सावधान राहा.

**धनु :** निर्णय घेण्यासंबंधी द्विधा मनस्थिती निर्माण होईल त्यामुळे कार्याची गती कमी होईल.

**मकर :** आपल्या नि:स्वार्थी वृत्तीमुळे आपल्याला फायदा होईल. व्यापारात गुंतवणूक फायदेशीर राहील. व्यापारात विस्तार होण्याची शक्यता आहे.

**कुंभ :** अडकून पडलेली कामे मार्गी लागतील. भौतिक सुख साधने, सुविधामध्ये विस्तार होईल.

**मीन :** अंधविश्वासापासून लांब राहून आलेल्या संधीचा फायदा उठवा. व्यावसायिक कामे जबाबदारीने पार पाडा. तिवनात यशस्वी व्हाल.

# देश निर्मितीसाठी शिक्षकांची भूमिका महत्वाची

## डॉ. फिरोज बख्त अहमद यांचे विचार : २९ व्या तत्त्वज्ञ संतश्री ज्ञानेश्वर-तुकाराम स्मृती व्याख्यानमालेचा थाटात समारोप

**तभा वृत्तसेवा**
**पुणे, दि. १ डिसेंबर-**

''देशाचे पहिले शिक्षण मंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांनी देशात उच्च शिक्षणाचे दरवाजे उघडे केले. देश निर्मितीसाठी शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे हे त्यांनी जाणले होते.'' असे विचार दिल्ली येथील मौलाना आजाद नॅशनल उर्दु युनिव्हर्सिटीचे माजी कुलगुरू डॉ.फिरोज बख्त अहमद यांनी व्यक्त केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एम आयटी, पुणे आणि संतश्री ज्ञानेश्वर-संतश्री तुकाराम महाराज स्मृती व्याख्यानमाला न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने युनेस्को अध्यासना अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या २९ व्या तत्त्वज्ञ संतश्री ज्ञानेश्वर-तुकाराम स्मृती व्याख्यानमालेच्या समारोप समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.




यावेळी अध्यक्षस्थानी विश्वशांती केंद्र विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड होते. तसेच प्रा.शरदचंद्र दराडे पाटील, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कुलगुरू प्रा. डॉ. आर.एम. चिटणीस, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस.एम.पठाण, २९ व्या तत्त्वज्ञ संतश्री ज्ञानेश्वर-तुकाराम स्मृती व्याख्यानमालेचे समन्वयक व प्र कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे आणि डॉ. मिलिंद पात्रे उपस्थित होते.

यावेळी योगाचार्य मारूती पाडेकर गुरूजी आणि प्रा. अतुल कुलकर्णी यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

डॉ.फिरोज बख्त अहमद म्हणाले, ''आजाद यांनी हिंदू मुस्लिम एकतेवर अधिक भर दिला. महात्मा गांधी आणि पं.नेहरू यांच्या खांद्याला खांदा लावून देशाला प्रगतीपथावर नेण्यास कार्य केले. धर्मा ने मुस्लिम असून सुद्धा आजाद यांनी सर्वधर्माचे पालन केले. १६ जुलै १९४९ साली देशातील एका वृत्तपत्रात मौलाना अबुल कलाम आजाद यांच्या विरोधात एक बातमी प्रकाशित झाली होती. त्यांनी नारळ फोडून एका रेल्वे स्टेशनचे उद्घाटन केले. त्यामुळे त्यांचा धर्म नष्ट झाला. यावर आजाद यांनी मोहम्मद अली जीना यांना उत्तर पाठविले होते की नारळ आणि घी टाकून माझा धर्म आणखी मजबूत होतो.''

प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, ''भारतीय संस्कृती, परंपरा आणि तत्वज्ञानाचा संदेश जगभर पसरविण्यासाठी या व्याख्यानमाला महत्वपूर्ण आहे. भारताला विज्ञान आणि ज्ञानाची भूमी म्हणून संपूर्ण जगभर ओळखले जाते. भारतीय संस्कृती समाजात रुजविण्याचे कार्य मोठ्या प्रमाणात झाले पाहिजे. समाजातील लोकांचे स्वत्व, स्वधर्म आणि स्वाभिमान जागृत करुन शांततामय समाज निर्माण होण्यास मदत होईल.''

डॉ. एस.एम.पठाण म्हणाले, ''देशातील पहिले शिक्षण मंत्री मौलान अबुल कलाम आजाद यांनी शिक्षण क्षेत्रात आमुलाग्र बदल घडविला. त्यांनी उच्च शिक्षण क्षेत्राला नवा आयाम दिला आहे. भारतीय संस्कृती ही अत्यंत प्राचीन व ऋषिमुनींची आहे.''

यावेळी मारूती पाडेकर गुरूजी यांनी योगासनाचे महत्व सांगून सर्वांना उत्तम आरोग्य ठेवण्याच्या शुभेच्छा दिल्यात.

डॉ.आर.एम.चिटणीस यांनी प्रास्ताविक केले. प्रा.गौतम बापट यांनी सूत्रसंचालन केले.डॉ. मिलिंद पांडे यांनी आभार मानले.




## विद्यानिकेतन हायस्कूलमध्ये क्रीडा सप्ताहास सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

बाहुसार शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, विद्यानिकेतन हायस्कूलच्या वतीने क्रीडा सप्ताहास पुंजाल मैदान येथे सुरुवात झाली. याचे उद्घाटन भारतीय रेल्वेत तिकीट चेकर व माजी विद्यार्थी श्रीकांत अलकुंटे व विशाल कुणी यांच्या हस्ते झाले. मुख्याध्यापक गोपीनाथ नवले हे अध्यक्षस्थानी होते. प्रास्ताविक पर्यवेक्षक शंकरगिरी गिरी यांनी केले.

सहशिक्षिका रूपादेवी राजगे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष बापूसाहेब ढगे, क्रीडा प्रशिक्षक वासुदेव दोरनाल, हिंगुलांबिका प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद हंचाटे, क्रीडाप्रमुख रेणुका खमितकर यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते क्रीडासाहित्याचे पूजन करण्यात आले.

आकाशात फुगे सोडून व क्रीडाज्योत पेटवून क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले. या क्रीडा सप्ताहामध्ये क्रिकेट, कबड्डी, खो-खो, धावणे, दोरीवरील उड्या, विविध मनोरंजनात्मक खेळांचा समावेश करण्यात आला.

# अन्नधान्य, कडधान्य व गळित धान्य पिकांसाठी राज्यांतर्गत पीक स्पर्धा

## ३१ डिसेंबरपर्यंत नोंदणी करता येणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

राज्यात पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग होऊन उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांचे मनोबल वाढून आणखी उमेदीने नवनवीन, अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषी उत्पादनाम ध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परिसरातील इतर शेतकऱ्यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेवून राज्यांतर्गत पीकस्पर्धा योजना राबविण्यात येत आहे. रब्बी हंगाम सन २०२४ पीक स्पर्धे साठी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन कृषी आयुक्तालयाचे कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) रफिक नाईकवाडी यांनी केले आहे.

कृषी विभागामार्फत रब्बी हंगाम सन २०२४ मध्ये सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस या ५ पिकांसाठी पीक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. पीकस्पर्धेसाठी ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस या पिकांसाठी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ३१ डिसेंबर आहे. स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क प्रत्येक पिकासाठी स्वतंत्र सर्वसाधारण गटासाठी रु.३०० व आदिवासी गटासाठी रु. १५० राहील. स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याकडे स्वतःच्या नावावर जमीन असणे व ती जमीन तो स्वत: कसत असणे आवश्यक आहे. स्पर्धेत भाग घेणाऱ्या शेतकऱ्याला एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकांसाठी स्पर्धेत सहभाग घेता येईल. तसेच पीक स्पर्धेमध्ये सहभाग घेण्याकरता स्पर्धकास शेतावर त्या पिकाखाली किमान ४० आर क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे.

पीक स्पर्धेमध्ये सहभाग घेण्याकरता स्पर्धकांनी विहित नमुन्यातील अर्ज (प्रपत्र-अ), ठरवून दिलेले प्रवेश शुल्क भरल्याचे चलन, ७/१२, ८-अ चा उतारा, जात प्रमाणपत्र (केवळ आदिवासी असल्यास),पीक स्पर्धे साठी शेतकऱ्याने संबंधित ७/१२ वरील घोषित केलेल्या क्षेत्राचा चिन्हांकित केलेला नकाशा, बँक खाते चेक/पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत आदी कागदपत्रे अर्जासोबत जोडावीत.

या योजनेबाबत अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, अथवा महाराष्ट्र शासन कृषी विभागाचे संकेतस्थळाला भेट द्यावी. असे आवाहनही कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) श्री. नाईकवाडी यांनी केले आहे.

### प्रथम पारितोषिक ५० हजार

सर्वसाधारण व आदिवासी गटातील शेतकऱ्यांसाठी पीक निहाय पारितोषिक असे (प्रथम तीन ) राज्य : ५०, ४०, ३० हजार.जिल्हा : १०, ७, ५ हजार. तालुका : ५, ३, २ हजार

# खेळात देखील करियर घडविता येते : योगेश इंडी

## सुमीतीबाई स्कूलमध्ये क्रीडा सप्ताहास सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

मन व शरीर कायम निरोगी व उत्साहीत ठेवायचे असेल तर विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या मैदानी खेळात सहभाग घ्यावा. विशिष्ट क्रीडा प्रकारात प्राविण्य मिळवून पुढे जावून यात करिअर देखील घडविता येते; त्यामुळे विद्यार्थ्यांनी याकडे लक्ष द्यावे, असे मार्गदर्शन सुवर्ण स्पोर्ट्स अकॅडमीचे संस्थापक सचिव योगेश इंडी यांनी केले.

येथील श्राविका संस्था संचलित पद्मश्री सुमतिबाई इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये शनिवार क्रीडा सप्ताहाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. त्यांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलित व मैदानाचे पुजन करुन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेच्या प्रमुख कार्यकारी अधिकारी देवई शहा, शाळेच्या मुख्याध्यापिका




स्वाती कांबळे,प्रायमरी विभागाच्या सुपरवायझर कल्पना रामावत, हायस्कुलचे सुपरवायझर जयेश शिरढोणे,प्री-प्रायमरीच्या समन्वयक अर्चना अक्कलकोटे इ.मान्यवरांची प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या आरंभी प्रमुख पाहुणे व मान्यवरांच्या स्वागत व सत्कार समारंभानंतर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध पध्दतीने पथसंचलन करीत व्यासपीठावरील मान्यवरांना मानवंदना दिली. त्यानंतर प्रायमरी व हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी लेझीम, मँपो रिबन, कवायत प्रकार इ. कलाविष्कार अतिशय सुंदर पध्दतीने सादर करुन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सहशिक्षिका संगीता फुटाणे यांनी केले. सहशिक्षिका मिनाक्षी सग्गम यांनी आभार मानले. या रंगारंग अश्या कार्यक्रमासाठी पालक प्रतिनिधी, विद्यार्थ्यांचे पालक बहुसंख्येने उपस्थित होते. हा उद्घाटन सोहळा यशस्वीतेसाठी प्रायमरीचे क्रीडा शिक्षक रोहन घाडगे, अजित पाटील, कराटे शिक्षक सोमनाथ मगर, नृत्यशिक्षक गणेश कुडक्याल यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## जिल्हा सबज्युनियर सॉफ्टबॉल निवड चाचणी स्पर्धा उद्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

सोलापूर मनपा जिल्हा सॉफ्टबॉल असोसिएशनच्या वतीने सब ज्युनियर शहर व जिल्हा निवड चाचणी स्पर्धा मुले व मुली ३ डिसेंबर रोजी दुपारी ४ वाजता श्री मल्लिकार्जुन हायस्कूल हत्तुरेनगर विमानतळाच्या समोर आयोजित केली आहे. १ जानेवारी २०१० नंतर जन्मलेले खेळाडू यासाठी पात्र आहेत. खेळाडूंनी सोबत येताना आवश्यक साहित्यासह उपस्थित रहावे. यामधून निवडलेला संघ हा माळीनगर येथे होणाऱ्या राज्य स्पर्धेत सहभागी होईल. खेळाडूंनी सचिव प्रा.संतोष खेंडे ९८५०६६६७९५ अथवा गंगाराम घोडके ९४२३७१७२७७ यांच्याशी संपर्क साधावा. या निवड चाचणीस खेळाडूंनी सहभागी व्हावे, असे आवाहन संघटनेचे जिल्हाध्यक्ष सिद्धेश्वर पाटील व उपाध्यक्ष संतोष गवळी यांनी केले आहे.



## केंद्रस्तरीय खो-खो स्पर्धेत विंचूरच्या जिल्हा परिषद शाळेस दुहेरी मुकुट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विंचूरच्या खोखो संघाने लहान गट मुले व मुली या दोन्ही गटात विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला.

तेलगाव (भीमा) येथे संपन्न झालेल्या भंडारकवठे केंद्रस्तरीय स्पर्धेत केंद्रातील अनेक दिग्गज संघांना पराभूत करून विंचूर बीटस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरले. जिल्हा परिषद शाळेतील खेळाडूंनी अष्टपैलू खेळ करीत पहिल्यांदाच विजयाचे मानकरी ठरले. संघास खेळाडूंना क्रीडा मार्गदर्शक तुळशीराम शेतसंदी, शांतप्पा कोळी, अशोक साळुंखे, सुनंदा जमादार व मीना नळे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे गटशिक्षणाधिकारी मल्हारी बनसोडे, केंद्रीय मुख्याध्यापक महादेव पेशवे, विंचूर शाळेचे मुख्याध्यापक बसवराज बनपुरे, गावचे सरपंच उपसरपंच व सर्व ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्य तसेच ग्रामस्थांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# अपघाताचे दडपण अन् मृत्यूचे भय

**नाट्य समीक्षण**
**विद्या काळे**

**ओंकार नाट्य मंदिर संस्थेने शनिवार दि. ३० नोव्हेंबर रोजी भयरात्र नाटक सादर केले. या नाटकाचे लेखक रविशंकर झिंगरे तर दिग्दर्शक संदीप जाधव यांनी केले.**

एका आड गावातील स्टेशनवर दोन प्रवासी एक तरूण, एक म्हातारा. म्हातारा बोलू लागतो नुकत्याच झालेल्या रेल्वे अपघातातील रक्ताच्या थारोळ्यातील मृताबद्दल.एका क्षणी म्हाताऱ्याची बडबड असह्य होऊन तरूण बोलू लागतो आणि स्वतः:च्या पत्नीच्या व्यभिचारा बद्दल. गृहछिद्र उघड करतो. घडविलेल्या अपघाताचे असह्य दडपण आणि मित्राला मृत्यूच्या दाढेत ढकलण्याचे मानसिक दडपण त्यातून निर्माण झालेले मृत्यूचे भय त्यातून सुटण्याची धडपड. म्हाताऱ्याला मरण हवे, तरुणाला नको. म्हाताऱ्याचं जीवन-मरणावरील भाष्य. हा नाटकाचा विषय.



पडदा उघडताच दिसते एका छोट्या स्टेशनवरील फलाटाचे दृष्य. स्टेशन प्लॅटफॉर्म लहान पण विचित्र अवस्था की माणसं नसून भुतंखेतं रहात असावीसं वाटत होतं. स्टेशन पेक्षा कचराकुंडी वाटत होती. इतक्या अडगळीत बाक तेवढा छान अजबच. गाडीचा आवाज येत होता प्रेक्षकांच्या उजव्या बाजूनं आणि प्रकाश झोत प्रेक्षकांच्या डावीकडून उजवीकडे. बाका मगचा दिवा छान. दोन्ही मित्र घराच्या गच्चीवर बसलेले नसून फलाटावरच बसलेले वाटत होते.अशा दृष्यात म्हाताऱ्यानं फ्रीज होणे आवश्यक होते. याकडे लक्ष देणे गरजेचे. मागील बाजूस चहाची मोडकी पाटी ठीक होती.

रंगभूषा आणि वेशभूषेत म्हातारा बराच तरणा वाटत होता.याकडे लक्ष द्यावयास हवे. पाऊस, थंडी, उघड्यावर 'वारा' तो ला थंडी, भीतीची शिरशिरी काही नव्हते रात्रभर बसून ही शर्ट इन, इस्त्रीचा. म्हातारा अश्वत्थामा पांढऱ्या फेक शर्टात,पायात स्लीपर आणि स्टेशन यांचा मेळ बसत नव्हता. इंजिनाची शिट्टी,गाडीचे धडधडत जाणे,पावसाचा आवाज,रात्र हे दाखवूनही भेसूर पणा कुठेच नव्हता. तो ने बोलताना च्या चुका एंट्री, एक्झिट याकडे लक्ष देणे आवश्यक.म्हातारा मेला. उठून जाण्याआधी लाइट्स आले.अशा चुका टाळल्या असत्या तर बरं झालं असतं. एकाच स्पर्धेत एकच नाटक दोन संघांनी केल्यामुळे तुलना होणे अपरिहार्य.

६३ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा २०२४-२५

- **आजचे नाटक : लपून छपून**
- **वेळ व ठिकाण :** सायं.७ वा. हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर
- **लेखक :** हर्ष शिवशरण
- **दिग्दर्शक :** सुमित फुलमामडी

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# मंद्रूप वीज वितरण कार्यालय 'असून अडचण नसून खोळंबा'

## एका वर्षात चार प्रभारी अधिकारी; शेतकऱ्यांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रूप, दि. १ डिसेंबर-**

मंद्रूप वीज वितरण कार्यालयात दोन वर्षांपासून सहायक अभियंता पद रिक्त असल्याने एका वर्षात चार प्रभारी सहायक अभियंता बदलण्यात आले. प्रभारी सहायक अभियंताकडून शेतकऱ्यांच्या तक्रारीची दखल घेण्यात येत नसल्याने व वरिष्ठ अधिकारीही तक्रारीकडे दुर्लक्ष करीत असल्याने शेतकऱ्यांनी तक्रार कोणाकडे करावी? असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे.

रब्बी हंगामातील नोव्हेंबर, डिसेंबर व जानेवारी महिना शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे असतात. रब्बी हंगामातील गहू, ज्वारी, हरभरा, मका व तूर या पिकांच्या अधिक उत्पन्नासाठी त्यांना पाणी द्यावे लागते. यावर्षी रब्बी हंगामात एकाही पावसाने दमदार हजेरी न लावल्याने गहू, ज्वारी, हरभरा या पिकांच्या पेरणीसाठी ओलावा नव्हता. त्यामुळे जमीन ओलाव्यासाठी विजेचा वापर वाढला आहे. शिवाय तीन महिन्यात वीज वापर अधिक असल्याने



अनेक भागातील ट्रान्सफार्मर जळून जात आहेत. तर अनेक ठिकाणी विजेच्या व्होल्टेजसंदर्भात शेतकऱ्यांच्या तक्रारी आहेत.

वीज कर्मचाऱ्यांना तक्रारी सांगितल्यानंतर अधिकाऱ्यांना तक्रारी सांगण्यास सुचविले जाते. मात्र मंद्रुपचे तत्कालीन सहायक अभियंता सचिन चोरगी यांची बदली झाल्यानंतर दोन वर्षांपासून अद्याप सहायक अभियंता नेमणूक करण्यात आले नाही. त्यामुळे वडकबाळ, गुंजेगाव, अंत्रोळी या कार्यालयातील अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त पदभार देण्यात आले आहे. मात्र प्रभारी अधिकारी तीन महिन्यात बदलून जात असल्याने व त्यांच्याकडून शेतकऱ्यांच्या तक्रारी सोडविण्यासाठी प्रयत्न होत नसल्याने मंद्रुप वीज वितरण कार्यालय 'असून अडचण नसून खोळंबा' झाली आहे.

सध्या शेतीमधील वीज वापर वाढल्याने शेतकरी तक्रार करण्यासाठी कार्यालयास फोन केल्यानंतर ऑपरेटर फोन स्वीकारत नाहीत. वारंवार वीज खंडीत होत असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. अनेक ठिकाणी ट्रान्सफार्मर बद्दल तक्रार असताना वीज कर्मचारी दुरुस्ती करण्यास तयार नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांचे गहू, ज्वारी, हरभरा व तूर या पिकांच्या उत्पन्नावर परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. याबद्दल वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार केल्यानंतर कर्मचाऱ्यांना अभय देण्याचे काम सुरू आहे. शिवाय ट्रान्सफार्मर दुरुस्त करण्यासाठी पैसे जमा करण्यास सांगण्यात येत आहे. त्यामुळे वीज वितरण कार्यालयाच्या गलथान कारभाराला शेतकरी वैतागला असून वीज कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

### महिन्यांपासून ट्रान्सफार्मर तक्रारीकडे दुर्लक्ष

मंद्रूप व वांगी सीमेवरील ट्रान्सफार्मरवरून कमी दाबाने वीजपुरवठा सुरू आहे. याबाबत सहायक अभियंत्यांकडे तक्रार केली. मात्र त्यांच्याकडून कार्यवाही होत नाही. कमी दाबाने वीजपुरवठा होत असल्याने विद्युत पंप सुरू होत नाही. त्यामुळे चार एकरवरील गहू, ज्वारी व हरभरा करपून चालली आहे.

**- सूर्यकांत जोडमोटे, शेतकरी, मंद्रुप**

### वीज कार्यालयासमोर आंदोलन करणार

मंद्रुपमधील शेतकरी वीज कार्यालयासंदर्भात तक्रार केल्यानंतरही दखल घेण्यात येत नाही. शिवाय रात्री वीजपुरवठा करून शेतकऱ्यांना त्रास देण्यात येत आहे. वीज वितरण कार्यालयाच्या गलथान कारभाराच्या विरोधात मंद्रुप वीज कार्यालयासमोर आंदोलन करणार आहे.

**- जाविद आवटे, अध्यक्ष,**
अखिल भारतीय किसान सभा, दक्षिण सोलापूर

## संक्षिप्त वृत्त



### बार्शी येथे संविधान दिन साजरा

**बार्शी, दि. १ डिसेंबर-**

संविधान दिनानिमित्त बार्शी न.पा. शिक्षण मंडळ कार्यालयास पंचायत राज ग्रामविकास विभाग भाजप यांचेवतीने संविधान उद्देशिका फोटो प्रत बार्शी न. पा. शिक्षण मंडळ अधिकारी अनिल बनसोडे यांना भेट देण्यात आली. व संविधान दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी पंचायतराज ग्रामविकास विभाग भाजपा तालुकाध्यक्ष दशरथ उकिरडे, विधानसभा संयोजक हेमंत रातंजनकर, बार्शी शहर पदाधिकारी लक्ष्मीकांत कुलकर्णी, प्रणव रणदिवे, अश्विन गाढवे, सुमित खुरंगुळे, मिलिंद बनसोडे, प्रवीण ढाकणे यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला.



### अक्कलकोट येथे केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धा

**अक्कलकोट, दि. १ डिसेंबर-**

श्री जगद्गुरु पंचाचार्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेचे शुभारंभ केंद्रप्रमुख भीमाशंकर धडके यांच्या हस्ते व खेळाडूच्या सामूहिक क्रीडा प्रतिज्ञा घेऊन क्रीडा स्पर्धेला सुरुवात करण्यात आली. कडबगाव केंद्रातील जिल्हा परिषद मराठी व कन्नड शाळा गौडगाव,जि प शाळा मराठी व कन्नड कडबगाव,जिल्हा परिषद मराठी शाळा अक्कलकोट स्टेशन जिल्हा परिषद मराठी व कन्नड शाळा गुरववाडी व जिल्हा परिषद मराठी शाळा कुंभार आदी शाळांनी सहभाग घेतले होते. यावेळी व्यासपीठावर केंद्रप्रमुख भीमाशंकर धडके, मुख्याध्यापक कल्याणी देशट्टी क्रीडा शिक्षक परमेश्वर व्हसुरे आदी मान्यवर उपस्थित होते. कबड्डी खो-खो लंगडी बुद्धिबळ व धावणे हे स्पर्धा घेण्यात आले या स्पर्धेला पंच म्हणून तानाजी चव्हाण कल्याणी गंगोंडा संतोष चिंचोळीकर महादेव चव्हाण गणपती किणगी बसवराज स्वामी स्मिता शिंदे त्रिभुवन जाधव पी. एस.व्हसुरे आदींनी काम पाहिले.




### सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे यांचा सन्मान

**बार्शी, दि. १ डिसेंबर-**

बार्शी तालुका पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे यांना विधानसभा २०२४/ निवडणूक शांततेने आणि शिस्तीने पार पाडल्याबद्दल पोलीस अधीक्षक यांच्याकडून सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले. यावेळी बार्शी तालुका पोलीस स्टेशनने विविध संवेदनशील गावांमध्ये शांततेचे वातावरण राखण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे विशेष कौतुक करण्यात आले. सहाय्यक पोलीस निरीक्षक ढेरे यांच्या नेतृत्वाखाली, सर्व ठिकाणी शिस्तीचे पालन करत निवडणूक अत्यंत शांततेने पार पडली, ज्यामुळे ग्रामस्थांनी सुरक्षिततेची भावना व्यक्त केली. हे सन्मानपत्र त्यांच्या कार्यक्षमता आणि आदर्श पोलीस सेवा सादर करण्याबद्दल दिले गेले.

### पत्रकार चंद्रकांत हगलगुंडे यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**अणदूर, दि. १ डिसेंबर-**



तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील गेल्या तीस वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत असलेल्या व विविध क्षेत्रात ठसा उमटवून ग्रामीण भागात पत्रकारितेची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या आदर्श पत्रकार चंद्रकांत हगलगुंडे यांना राज्यस्तरीय राष्ट्रभक्ती सेवा गौरव पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे. गेल्या अनेक वर्षापासून जय मल्हार पत्रकार संघाच्या माध्यमातून पंचक्रोशीत विविध उपक्रम राबवून वेगळा आदर्श या संघाने निर्माण केला आहे. नारी शक्तीचा सन्मान, अणदूर भूषण सन्मान, नवरत्नांचा सन्मान, हलगी महोत्सव, कोरोना काळात जनजागृती अभियान व मदत अशी विशेष उपक्रम राबवल्याने संघाचे सर्वत्र कौतुक होताना दिसते. त्यांच्या या कार्याचे विशेष दखल घेऊन मलकापूर जिल्हा बुलढाणा येथील माणुसकी मल्टीपर्पज फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष विवेक राजापुरे यांनी ही निवड घोषित केली असून ५ जानेवारी २०२५ रोजी कार्यक्रमात त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे. त्यांना मिळालेल्या या मानाच्या पुरस्काराबद्दल जयमल्हार पत्रकार संघ, ८ फार्मा ग्रुप, खडकाळी मॉर्निंग ग्रुपने त्यांचे अभिनंदन केले आहे.



## मनसेच्या वतीने आ. अभिजीत पाटील यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि.१ डिसेंबर -**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते दिलीपबापू धोत्रे यांच्या वतीने माढ्याचे नवनिर्वाचित आमदार अभिजीत पाटील यांचा पंढरपूर येथील मनसे कार्यालयात सत्कार करण्यात आला. हलगीच्या कडकडाटात आणि फटाक्याची आतषबाजी करून आमदार अभिजीत पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना दिलीप धोत्रे म्हणाले की अभिजीत पाटील यांनी केलेल्या कामाची पोचपावती नागरिकांनी त्यांना आमदार करून दिली आहे. भविष्यकाळात अभिजीत पाटील यांच्या माध्यमातून नागरिकांचे प्रश्न कायमचे सोडवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. जनतेच्या मनातील आमदार म्हणून अभिजीत पाटील यांना जनतेने निवडून दिले याबद्दल मतदार संघात नागरिकांचे त्यांनी आभार मानले. याप्रसंगी अभिजीत पाटील आमदार म्हणजे आपण आमदार आहोत असे उदगार दिलीप धोत्रे यांनी काढले. यावेळी बोलताना अभिजीत पाटील म्हणाले की हा सन्मान हा माझ्या घरचा सन्मान आहे. मी या परिसरात लहानाचा मोठा झालो या परिसरातील नागरिकांनी माझी जडणघडण केली आहे. माझ्या यशामध्ये येथील नागरिकांचा मोठा वाटा असल्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले. ते पुढे बोलताना म्हणाले, भारत नाना नंतर जनतेने मला स्वीकारले आहे. पुढील पंढरपूर नगरपालिका निवडणूक लढवून शहराच्या सर्वांगिण विकास करण्यासाठी मी आमदार माढ्याचा जरी असलो तरी पंढरपुरातील विकासासाठी प्रयत्न करणार असल्याचा विश्वास दिला. यावेळी त्यांनी अनेक प्रसंगांना उजाळा दिला.

## पंढरीतील चार्जिंग स्टेशन लवकर सुरू करा



### ग्राहक पंचायतीची मागणी; काम संथगतीने

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१ डिसेंबर -**

राज्य परिवहन महामंडळाच्या पंढरपूर येथील चार्जिंग स्टेशनचे काम लवकर पुर्ण करून ते सुरु करावे अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने विभाग नियंत्रकाकडे पत्राद्वारे केली असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

राज्य परिवहन महामंडळाच्या येथील चार्जिंग स्टेशनचे काम अतिशय संथगतीने सुरू असल्याने येथून इलेक्ट्रीक बस धावु शकत नाहीत. आषाढी यात्रेत मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ होणार असेही सांगितले जात होते. ते न होता मागील आठ महिन्यांपासून हे काम सुरू आहे तथापि अद्यापही ते पूर्ण झालेले नाही ही वस्तुस्थिती आहे.

सोलापूर जिल्ह्यात सोलापूर शिवाय पंढरपूर आणि मंगळवेढा या दोनच आगारात चार्जिंग स्टेशनची उभारणी चालू आहे.मात्र दोन्ही ठिकाणची कामे पूर्ण झालेली नाहीत. त्यामुळे सोलापूर ते पुणे या मार्गावरच इलेक्ट्रीक बस धावत आहेत.जिल्हयातील इतर दोन्ही ठिकाणची कामे पुर्ण न झाल्याने देशातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असलेल्या पंढरपूर येथील आगार व भाविक इलेक्ट्रीक बस सेवेपासून वंचित आहेत. त्यामुळे चार्जिंग स्टेशनची उभारणी गतीने पुर्ण करुन त्याची चाचणी लवकरच घेऊन प्रवासी भाविकांना इलेक्ट्रीक बस सेवा उपलब्ध होईल अशी अपेक्षा ग्राहक पंचायतीचे प्रांत कोषाध्यक्ष विनोद भरते, प्रांत सदस्य सुभाष सरदेशमुख,जिल्हा संघटक दीपक इरकल, जिल्हा सचिव सुहास निकते, तालुका अध्यक्ष विनय उपाध्ये उपाध्यक्ष नंदकुमार देशपांडे, संघटक महेश भोसले, सदस्य अण्णा ऐतवाडकर, सागर शिंदे यांनी व्यक्त केली आहे.

### विभागीय साहित्य संमेलनासाठी कवी मारुती कटकधोंड यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**



महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा वारणानगर आयोजित सहकार महर्षी तात्यासाहेब कोरे साहित्य नगरी वारणानगर येथे ७ आणि ८ डिसेंबर रोजी २९ वे विभागीय मराठी साहित्य संमेलन होणार आहे. शनिवार दि. ७ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत निमंत्रित कवींचे कवी संमेलन प्रख्यात कवी अरुण म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. काव्य संमेलनासाठी महाराष्ट्रातील विविध शहरातून कवी उपस्थित राहणार असून ते आपली कविता सादर करणार आहेत. या विभागीय साहित्य संमेलनासाठी सोलापूरचे ज्येष्ठ कवी मारुती कटकधोंड यांची निमंत्रित कवी म्हणून निवड झाली.

यापूर्वी मारुती कटकधोंड यांनी फलटण, सातारा, गुहागर, बार्शी, मंगळवेढा येथे निमंत्रित कवी म्हणून निवड झाली होती त्यात त्यांनी आपली कविता सादर केली आहे.

## मल्लखांब स्पर्धेत मछिंद्र लोंढेला रौप्यपदक

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि. १ डिसेंबर-**

विद्या विकास मंडळाचे यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा येथील खेळाडू महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्या अंतर्गत पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद मुंबई उपनगर द्वारा आयोजित राज्यस्तरीय शालेय मल्लखांब स्पर्धा १४, १७, १९ वर्ष वयोगट मुले व मुली या भिमानगर एज्युकेशन सोसायटी शाळा, भीमा नगर कॉलनी, (पश्चिम) मुंबई येथे दिनांक २८ ते २९ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आल्या. या स्पर्धेतून १९ वर्षाखालील मुलांच्या गटात मच्छिंद्र लोंढे याने पुणे विभागातर्फे रोप्यपदक प्राप्त करून मल्लखांबमध्ये घवघवीत यश संपादन केले.



या स्पर्धेतून महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यातून एकूण ११ विभागामधून ३२४ स्पर्धकांनी स्पर्धेत भाग घेतला. स्पर्धेमध्ये मच्छिंद्र लोंढेला ३०.०० गुणापैकी २३.९५ गुणांक प्राप्त केले. या स्पर्धेमध्ये १९ वर्षे वयोगटातून पुणे विभागातून मच्छिंद्रनाथा लोंढे याने दैदीप्यमान कामगिरी करून पुणे विभागाला रौप्यपदक प्राप्त करून दिले. या यशस्वी खेळाडूला महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा. राम काळे व त्रिमूर्ती क्लबचे सागर शिरसकर यांचे मार्गदर्शन लाभले. मच्छिंद्र लोंढे हा त्रिमूर्ती स्पोर्ट्स क्लब करमाळा येथे सराव करीत आहे. या यशस्वी कामगिरीबद्दल विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, संस्थेचे सहसचिव विक्रमसिंह सूर्यवंशी, प्राचार्य डॉ. एल. बी.पाटील, उपप्राचार्य संभाजी किर्दाक, वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## १५ हजारांची लाच घेताना वैरागच्या हवालदाराला अटक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ डिसेंबर-**

अपघात विमा क्लेम करण्यासाठी पंचनामा व वाहनाच्या विम्याचे कागदपत्रे देण्यासाठी १५ हजाराची लाच घेताना वैराग पोलीस ठाण्यातील हवालदार राहुल इरण्णा सोनकांबळे (वय ५२ वर्ष, नेमणूक वैराग पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण (वर्ग ३) आणि झिरो मनोज किशोर वाघमारे (वय ४० वर्ष, रा. सिद्धार्थनगर, वैराग, बार्शी) या दोघांना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलिसांनी शनिवारी रात्री अटक केली आहे.

यातील तक्रारदार यांचे वडील रोड अपघातामध्ये गंभीर जखमी झाल्याने वैराग पोलीस ठाणे सोलापूर ग्रामीण येथे दिनांक ११ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल असून, सदर गुन्ह्याचा तपास हवालदार सोनकांबळे यांच्याकडे आहे. सदर अपघाताच्या घटनास्थळ पंचनामाचे कागदपत्र हे यातील तक्रारदार यांना इन्शुरन्स क्लेम करण्यासाठी आवश्यक असल्याने, तक्रारदार यांनी याबाबत पोलीस हवालदार सोनकांबळे यांच्याशी संपर्क साधला असता, पो.हवा. सोनकांबळे यांनी घटनास्थळ पंचनामा कागदपत्र देण्यासाठी २० हजार रुपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती १५ हजार रुपये स्वीकारण्यास संमती देऊन लाच रक्कम आरोपी खाजगी इसम वाघमारे यांच्यामार्फतीने स्वीकारली. लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आलेले असून त्यांच्यावर वैराग पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

या कारवाईत पोलीस उप अधीक्षक गणेश कुंभार, पोलीस अंमलदार श्रीराम घुगे, पोहवा प्रमोद पकाले, पोशि राजू पवार, चा .पोहवा राहुल गायकवाड यांनी भाग घेतला.

## बॅलेट पेपरवर चाचणी मतदानासाठी माळशिरस ग्रामस्थांचा तहसीलदारांना अर्ज

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १ डिसेंबर-**

आमच्या गावात पूर्वीपासून आत्तापर्यंत नेहमीच उत्तमराव जानकर यांना मोठे मताधिक्य मिळत असताना या विधानसभा निवडणुकीत मात्र विरोधी उमेदवाराला १६० मतांचे मताधिक्य मिळाले असल्याने यावेळी काहीतरी घोटाळा झाला असल्याची शक्यता व्यक्त करीत मारकडवाडी येथील ग्रामस्थांनी आपल्या शंकेचे निरसन करण्यासाठी गावात बॅलेट पेपरवर चाचणी मतदान घेत असून त्यासाठी शासकीय कर्मचारी पुरविण्याची मागणी केली. मात्र निवडणुकीत असा कोणताही घोटाळा झाला नसून सर्व नियमानुसार निवडणूक प्रक्रिया झाल्याने त्यानंतर चाचणी मतदान घेण्याची कसलीही तरतूद नसल्याचे प्रसिद्धिपत्रकात म्हटले आहे.

मारकडवाडी (ता.माळशिरस) येथील ग्रामस्थांनी याबाबत तहसीलदार माळशिरस यांना लेखी निवेदन दिले असून त्यामध्ये आपले गावात आत्तापर्यंत सन २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत १५३८ मतांपैकी जानकर यांना ९७९ मतातून ६८५ मताधिक्य दिले.सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत १६८३ मतांतून १०४६ मताधिक्य दिले.सन २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत १०२१ मतातून ५५५ मताधिक्य उत्तमराव जानकर किंवा ते सांगतील त्या उमेदवाराला दिले आहे. या विधानसभा निवडणुकीत मोहिते पाटील व उत्तमराव जानकर हे दोन विरोधक एकत्र आल्याने आमचे मारकडवाडी गावात आनंदी वातावरण होते.त्यामुळे संपूर्ण गावाने उत्तमराव जानकर यांना मतदान केले आहे. मात्र मतमोजणीनंतर उत्तमराव जानकर यांना ८४३ मते तर विरोधी राम सातपुते यांना १००३ मते पडलेली आहेत. आमचे गावचे यापूर्वीचे ही मतदान सन २००९, २०१४, २०१९, व पाच महिन्यांपूर्वीची २०२४ लोकसभा या निवडणुकीतील मारकडवाडी गावचे मतदान पाहिले असता ८० टक्के मतदान हे उत्तमराव जानकर किंवा ते सांगतील त्या उमेदवाराला मिळालेले होते. त्यामुळे आत्ताच्या विधानसभा निवडणुकीमध्ये फार मोठे घोटाळे झाले आहेत किंवा कसे? याबाबत खात्री करण्यासाठी आम्ही चाचणी मतदान घेणार आहोत,त्यासाठी आपली शासकीय यंत्रणा मिळावी,त्याचे आम्ही सर्व गावकरी मिळून संपूर्ण शुल्क भरणेस तयार आहे, तरी ३ डिसेंबरला चाचणी मतदानासाठी (एक्झिट पोल) आम्हास शासकीय कर्मचारी मिळावेत अशी विनंती या निवेदनात केली आहे. त्यानंतर तहसीलदार माळशिरस यांच्या वतीने प्रसिद्धिपत्रक जारी करून त्या अनुषंगाने खुलासा केला आहे,

त्यामध्ये या निवडणुकीत प्रत्येक टप्प्यावर उमेदवारांना अवगत करुण स्वतः अथवा प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहण्याबाबत कळविले होते.प्रत्यक्ष मतदान सुरू होण्यापूर्वी विधानसभा मतदार संघातील प्रत्येक गावातील मतदान केंद्रावर ईव्हीएम मशीनद्वारे मॉकपोल घेऊन संबधित केंद्राच्या मतदान प्रतिनिधी यांना मतदान प्रक्रिया दाखविण्यात आलेली होती. निवडणुकीत या गावातील मतदान केंद्र क्रमांक ९६,९७ व ९८ वर मिळून ११ उमेदवार प्रतिनिधी उपस्थित होते. त्याच्या उपस्थितीत ५० मताचा मॉकपोल घेऊन नियंत्रण युनिट मधील मते व व्हीव्हीपट मधील चिट्ट्याचा ताळमेळ घेऊन नियंत्रण युनिट क्लिअर करुनच मतदान सुरू करण्यात आले आहे. तसेच मतदान केंद्र क्रमांक ९८ आद्रटवस्ती या केंद्रावर पूर्णवेळ वेबकास्टींगद्वारे मतदान प्रक्रियेवर निगराणी ठेवण्यात आलेली होती.त्यानुसार या तिन्ही मतदान केंद्रावर अनुक्रमे ८६४, ७६२ व २७९ असे महिला व पुरुष मिळून मतदान झाले आहे. यामध्ये कुठलीही तफावत नाही. निवडणूक निरीक्षक यांचे देखरेखीखाली व मतमोजणी प्रतिनिधी याचे समक्ष मतमोजणीची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडण्यात आलेली आहे.

त्यावेळी कोणतीही लेखी वा तोंडी तक्रार करण्यात आली नसून ६ दिवसानंतर चाचणी मतदानाची मागणी केली आहे. मात्र दिनांक २३ नोव्हेंबर रोजी निवडणुकीची प्रक्रिया संपलेली असून मतदानोत्तर चाचणी मतदान घेण्याची कोणतेही तरतुद नाही,किंवा शासकीय कर्मचारी देणे बाबत कोणतेही प्रयोजन नाही. त्यामुळे या अर्जाचा विचार करता येत नसल्याने अर्ज निकाली काढण्यात आल्याचे म्हटले आहे.

### जिल्हा सांख्यिकी विभागात स्नेहल बदेची अन्वेषकपदी निवड

**करमाळा, दि. १ डिसेंबर-**



करमाळा तालुक्यातील उमरडची स्नेहल सुभाष बदे हिची जिल्हा सांख्यिकी कार्यालय येथे अन्वेषकपदी निवड झाली आहे. सदर परीक्षा महाराष्ट्र अर्थ व सांख्यिकी संचनालय विभागा मार्फत घेण्यात आली होती. स्नेहल बदे हिने या परीक्षेत यश मिळवून करमाळा तालुक्याचे नाव उचावले आहे.तिने महिलांच्या 'इमावा' प्रवर्गातून हे पद प्राप्त केले आहे. कु.स्नेहल ही नायब तहसीलदार सुभाष बदे यांची कन्या तर उमरडचे पोलीस पाटील अंकुश कोठावळे यांची भाची आहे. तिच्या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## तरसाच्या हल्ल्यात गाईचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि १ डिसेंबर -**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील शेतकरी कैलास रामचंद्र घोंगडे या शेतकऱ्याच्या गाईवर तरसाने हल्ला केला, यामध्ये गाईचा जागेवरच मृत्यू झाला. सदरच्या मृत्यूमूखी पडलेल्या गाईचा वनविभागाने रितसर पंचनामा केला आहे. या भागात ऊसाचे व बागायती ऊसाचे मोठे क्षेत्र आहे. यापूर्वी सुद्धा या भागात तरस व इतर प्राणयांचा वावर कायम आढळून आला आहे. मोठ्या प्रमाणात जनावरावर हल्ला करीत शेळ्या, मेंढया व इतर जनावरावर हल्ला केला होता यामध्ये अनेक जनावरे मृत्यूमूखी पडली आहेत. यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड मोठे आर्थीक नुकसान झाले आहे. यामुळे शेतकऱ्यांना रात्री अपरात्री पिकांना पाणी देणे अवघड झाले असून यामुळे सध्या या भागात शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. वनविभागाने या भागात कोणत्याही उपाययोजना केल्या नाहीत. वनविभागाने ताबडतोब या भागातील हिंस्र प्राणयांचा बंदोबस्त करावा.



## संक्षिप्त वृत्त...



### आदर्श पब्लिक स्कूलमध्ये क्रीडा सप्ताह उत्साहात

**कुर्डूवाडी, दि. १ डिसेंबर-**

आदर्श पब्लिक स्कूलमध्ये वार्षिक क्रीडा सप्ताहाचे आयोजन २५ ते ३० नोव्हेंबर दरम्यान करण्यात आले होते. सलग सहा दिवस सुरू असलेल्या क्रीडा सप्ताहात सुरुवातीचे तीन दिवस सेमी विभाग व शेवटचे तीन दिवस सीबीएसई विभागातील विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारात आपला सांघिक व वैयक्तिक सहभाग नोंदवून दोन्ही प्रकारात सर्वच विद्यार्थ्यांनी आपले कौशल्य पणाला लावत क्रीडा महोत्सव यशस्वी केला. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अमोल सुरवसे, सचिव दयानंद सुरवसे व प्रकल्प संचालिका पूजा सुरवसे यांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलित करून शालेय ध्वज फडकवून क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन केले. याप्रसंगी चारही हाऊसच्या विद्यार्थ्यांनी हाऊस संचलन सादर केले व क्रीडा शपथ घेतली. उद्घाटन प्रसंगी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करताना प्रकल्प संचालिका पूजा सुरवसे यांनी क्रीडा स्पर्धेत राष्ट्रीय स्तरापर्यंत मजल मारलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करून इतर विद्यार्थ्यांनीही त्यांचा आदर्श घ्यावा, असे प्रतिपादन केले. अध्यक्षीय भाषण संस्थापक अध्यक्ष अमोल सुरवसे यांनी केले. सूत्रसंचालन गणेश ठवरे यांनी केले. क्रीडा महोत्सवात विद्यार्थ्यांनी रनिंग, सॅकरेस, संगीत खुर्ची, लंगडी, रस्सीखेच, गोळा फेक, थाळीफेक, लांब उडी, अडथळा शर्यत, रिले रेस, कबड्डी, खो-खो, हॉलीबॉल, नेटबॉल यासारख्या विविध प्रकारातील स्पर्धेत सहभागी होऊन खूप अटीतटीची चुरस व संघभावना जपत सर्व सामने यशस्वी केले. अंतिम दिवशी सर्व क्रीडा प्रकारानुसार सर्व विजेत्या स्पर्धकांना सुवर्ण, रौप्य व कांस्य पदक, प्रशस्तीपत्र व ट्रॉफी देऊन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. क्रीडा सप्ताह यशस्वी करण्यासाठी प्रशालेतील क्रीडाशिक्षक अहमद मुलाणी, उमेश डिसले व अमोल मिरगणे तसेच सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.



### माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या हस्ते देवेंद्र फडणवीसांचा सत्कार

**पंढरपूर,दि.१ डिसेंबर -**

भारतीय जनता पक्षाचे जिल्ह्याचे नेते तथा जिल्ह्याचे माजी आमदार प्रशांत प्रचारक यांनी माजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांचा सत्कार केला. महायुतीच्या भव्य आणि ऐतिहासिक विजयानंतर भाजपाचे ज्येष्ठ नेते देवेंद्र फडणवीस यांची माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी नुकतीच मुंबई येथील त्यांच्या सागर या निवासस्थानी भेट घेतली. महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वामध्ये भाजपाने यंदाच्या विधानसभा निवडणूकीत दैदीप्यमान असे यश संपादन केले. त्यांनी या निवडणूकीमध्ये जवळ पास ६० ते ७० सभांचे आयोजन करुन भाजपा तसेच महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ सभा घेतल्या. त्यामुळे भाजपाच्या घवघवीत यशा मध्ये फडणवीस यांचा सिंहाचा वाटा आहे. भाजपाच्या या दणदणीत विजयाबद्दल परिचारकांनी देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन केले. यावेळी प्रशांत परिचारक यांचे बंधू तथा युरोपियन शुगरसचे अध्यक्ष उमेश परिचारक देखील उपस्थित होते. या दोघांसमवेत पंढरपूर आणि मंगळवेढा विधानसभा मतदार संघातील अन्य मान्यवर पदाधिकारी मंडळी देखील उपस्थित होते.



### करमाळ्यात शिक्षक भारती संघटनेची सहविचार सभा

**करमाळा, दि. १ डिसेंबर-**

खासगी शाळांमधील शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या हक्कासाठी काम करणाऱ्या, शिक्षक भारती संघटनेची सहविचार सभा शनिवार दिनांक ३० नोव्हेंबर २०२४ रोजी संपन्न झाली.ही सभा करमाळा येथील शासकीय विश्रामगृहात पार पडली. या सभेसाठी करमाळा तालुक्यातील शिक्षक भरती संघटनेशी संलग्न अनेक शिक्षक उपस्थित होते.सभेत अनेक ठराव पास करण्यात आले त्यात सावित्री-फातिमा जिल्हास्तरीय पुरस्कार २०२५ करिता तालुक्यातील आदर्श शाळा, आदर्श शिक्षक, आदर्श क्रीडाशिक्षक, आदर्श लिपिक व आदर्श सेवक यांच्या निवडी सर्वानुमते करण्यात आल्या. तसेच शिक्षक भारती दिनदर्शिका २०२५ तालुक्यातील प्रत्येक शिक्षकांपर्यंत पोहोचवण्याचे नियोजन करण्यात आले. यावेळी शिक्षक भरती संघटनेचे तालुका अध्यक्ष विजयकुमार गुंड, उपाध्यक्ष किशोर जाधवर, सचिव सचिन गाडेकर, कोषाध्यक्ष गोरख ढेरे, प्रसिद्धीप्रमुख बाळकृष्ण गायकवाड, संघटक सागर देशमुख, मारुती साखरे, जिल्हा कार्यकारणी सदस्य बाळासाहेब भिसे उपस्थित होते.

## मारकडवाडी ग्रामस्थांची फेरमतदानाची मागणी चुकीची

### निवडणूक निर्णय अधिकारी विजया पांगारकर यांचा खुलासा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

जिल्ह्यासह राज्यात नुकत्याच विधानसभा निवडणुका पार पडल्या असून, माळशिरस तालुक्यातील मारकडवाडी येथील ग्रामस्थांच्या वतीने पुन्हा बॅलेट पेपरवर मतदान घेण्यासाठी तालुका प्रशासनाकडे निवेदन देण्यात आले आहे. मात्र निवडणूक आयोगाच्या सर्व नियमांचे पालन करूनच या माळशिरस मतदारसंघातील प्रत्येक गावात विधानसभा निवडणुकीचे संपूर्ण काम काज पार पाडल्याने अशा पध्दतीने दुसऱ्यांदा मतदान घेण्याची तरतूद कायद्यानुसार करता येत नसल्याचा निर्वाळा माळशिरस विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी विजया पांगारकर यांनी दिला आहे.

पांगारकर यांनी केलेल्या खुलाशामध्ये म्हटले आहे की, नुकत्याच २५४-माळशिरस मतदारसंघामध्ये निवडणूक पार पडली असून, चार दिवसानंतर मारकडवाडी गावातील फेर मतदानाविषयी काही बातम्या प्रसारित होत असून, त्यामध्ये कसलेही तथ्य नाही. तरीही मारकवाडी ग्राम स्थांनी तहसीलदारांकडे चाचणी मतदान घेण्यासाठी अर्ज केला आहे. या गावातील ३ मतदान केंद्रांवर दि. २० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया अत्यंत सुरळीत पार पडली आहे. तर दि. २३ नोव्हेंबर रोजी उमेदवारांचे



निकालही जाहीर करण्यात आले आहेत. निवडणूक आयोगाच्या नियमानुसार ही निवडणूक प्रक्रिया अत्यंत पारदर्शकपणे पार पडली असतानाही ग्राम स्थांनी चाचणी निवडणूक घेण्यासाठी कर्मचाऱ्यांची टीमही द्यावी, अशी मागणी केली आहे. चाचणी मतदान प्रक्रिया कोणत्याही कायद्याच्या प्रक्रियेत नाही. या गावातील तीनही केंद्रावरील झालेली मते व्यवस्थितपणे मोजली आहेत. यामुळे अशी दुबार मतदान प्रक्रिया आता घेता येणार नाही. या गावच्या तीनही केंद्रावरील पोलिंग एजंटकडूनही कोणतीही तक्रार नाही. मतमोजणीदिवशीही हे सर्वजण उपस्थित होते. निकालाची घोषणा आणि निवडणूक प्रक्रिया पार पडल्यानंतर तब्बल ६ दिवसांनी अशा प्रकारची मागणी काही ग्रामस्थांनी केली आहे. यामुळे त्यांची मागणी फेटाळून लावली आहे. सगळ्यात महत्वाचे म्हणजे विधानसभा निवडणुकीच्या प्रत्येक टप्प्यात उभारलेल्या सर्वच उमेदवारांना किंवा त्यांच्या प्रतिनिधींना सहभागी करून घेतले होते.

#### दुबार मतदान प्रकार अशक्य : जिल्हाधिकारी आशीर्वाद

याबाबत जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याशी संवाद साधल्यावर त्यांनी सांगितले की, जिल्ह्यातील ११ मतदारसंघात विधानसभा निवडणुकीची प्रक्रिया निवडणूक आयोगाच्या प्रत्येक नियमांचे काटेकोरपणे पालन करून अत्यंत पारदर्शकपणे पार पाडली आहे. मारकडवाडी या गावातही ३ बुथवर अत्यंत शांततेत मतदान झाले आहे. निकालही लागल्यानंतर कसलीही गडबड नाही. यामुळे आता या ग्रामस्थांनी अर्जाद्वारे केलेली मागणी चुकीची असून, दुबार मतदान प्रक्रिया कायदेशीरपणे घेता येत नसल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले.

याबाबत सर्वांना लेखी पत्रही देण्यात आले होते. या तालुक्यातील ३४५ मतदान केंद्रावर मतदानादिवशीही प्रथम ५० मतांचे अभिरूप मतदान घेण्यात आले होते; त्यातही तफावत आढळून आली नाही. तरीही मारकडवाडीत काही ग्रामस्थांकडून येत्या ३ तारखेला बॅलेंट पेपरवर मतदान पार पडणार असल्याच्या चुकीच्या बातम्या पसरत असून, त्यावर कसलाही विश्वास ठेवू नये; कारण निवडणूक प्रकिया पूर्ण संपली असल्याने कोणत्याच गावात असा प्रकार होणार नसल्याचेही शेवटी पांगारकर यांनी नमूद केले आहे.

## जनतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर : आ. डॉ. देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१ डिसेंबर-**

तुमचा पाठिंबा आणि विश्वास हीच माझी ताकद आहे. जनतेच्या भल्यासाठी काम करणे हेच माझे ध्येय असून, भविष्यातही मी तुमच्या सेवेसाठी तत्पर राहीन. आपले प्रेम आणि आशीर्वाद कायम राहू द्या असे आवाहन करत विधानसभा निवडणुकीतील यशाने आम्ही हुरळून जाणार नाही असे मत आ.बाबासाहेब देशमुख यांनी व्यक्त केले.



निवडणुकीनंतर जेवढे म ताधिक्य तेवढे वृक्षारोपण लावण्याचा त्यांनी संकल्प केला असून शनिवारी मुंबईहून त्यांचे सांगोला येथे आगमन झाले. यावेळी सर्वसामान्य नागरिक, कार्यकर्त्यांनी हार तुरे याऐवजी रोपे देऊन आ. बाबासाहेब देशमुख यांचे अभिनंदन करत आहे. यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना आ.बाबासाहेब देशमुख म्हणाले, सांगोल्याच्या सर्वसामान्य जनतेसमोर मी नतमस्तक होत असून हा विजय आमची जबाबदारी वाढवणारा आहे. स्वर्गीय भाई गणपतराव देशमुख यांच्याप्रमाणे माझ्यावर सांगोल्यातील सर्वसामान्य जनतेने मोठा विश्वास दाखवलेला आहे. त्यामुळे आम्हाला मतदार संघात खूप काम करावे लागेल याची जाणीव होत आहे. जनतेने दाखवलेल्या विश्वासाला मी कधीही तडा जाऊ देणार नाही.

## शांतलिंगेश्वर हिरेमठात पाच हजार दिव्यांचा दीपोत्सव



### कार्तिकि मासानिमित्त अक्कलकोटमध्ये आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट,दि. १ डिसेंबर**

येथील कुंभार गल्लीतील श्रीशैल्य पीठाचे श्री शांतलिंगेश्वर हिरेमठात मठाधिपती श्री. ष. ब्र. जयगुरुशांतलिंगराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या नेतृत्वाखाली कार्तिक मास निमित्ताने सुमारे ५ हजार दिव्यांचा दीपोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रारंभी माजी मठाधिपती परमपूज्य गुरुवर्य लिंगैक्य श्री.ष. ब्र. गुरुशांतलिंग शिवाचार्य व काशी विद्यापीठाचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ.श्री.ष.ब्र. श्रीपतीपंडिताराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर महास्वामीजी यांच्या हस्ते दिपोत्सवचा शुभारंभ दिपप्रज्वलनाने करण्यात आले. अवघ्या १ हजार दिव्यांपासून सुरू झालेला हा उत्सव वाढत गेला. कुंभार कारागिर श्रीशैल तुकाराम कुंभार यांनी पणती सेवा केली. शेवटी आझाद गल्लीतील श्री रेणुकाचार्य

> भारतीय संस्कृतीमध्ये कार्तिक महिन्यातील या दीपोत्सवात प्रज्वलित केले जाणारे दिवे हे मांगल्याचे प्रतीक मानले जातात. यामुळे दुष्ट शक्ती पळून जातात, अशी धारणा आहे.
>
> **- श्री. जयगुरुशांतलिंगराध्य महास्वामीजी, मठाधिपती.**

अक्कनबळग महिला मंडळाच्या वतीने महामंगला आरतीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आले. शेवटी उपस्थित भाविकांना महाप्रसाद वाटप करण्यात आला. दिपोत्सव सोहळा वेदमूर्ती बसवराज शास्त्री यांच्या वैदिकत्वात पार पडला. सूत्रसंचालन तात्यासाहेब समाने यांनी केले. या सोहळ्यास ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन देवस्थानचे अध्यक्ष शिवनिंगय्या स्वामी, श्री स्वयंभू गणेश मंदिराचे पुजारी ओंकार ग्रामोपाध्ये, विवेकानंद पतसंस्थेचे शाखाधिकारी चंद्रकांत दसले, माजी सैनिक अनिल हत्ते, उद्योजक भिमाशंकर कुंभार, भिमाशंकर करकी, इरण्णा पाटील, शिवय्या स्वामी, श्रीमती अनुसया स्वामी, कल्लप्पा सोमेश्वर, रामचंद्र कडबगांवकर, विजयकुमार हौदे, सुरेश जेवरगी, राजु कुडल, शरणप्पा कुंभार, शिवानंद कुंभार, सिध्दाराम कुंभार उपस्थित होते.



## मुख्यमंत्रीपदी देवेंद्र तर राणा पाटील यांची मंत्रीपदी वर्णीसाठी महाआरती

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. १ डिसेंबर -**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्रजी फडणवीस हे पुन्हा विराजमान व्हावेत तसेच त्यांच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री म्हणून तुळजापूर तालुक्याचे भाजपाचे आमदार राणा जगजितसिंहजी पाटील यांची वर्णी लागावी. म्हणून अणदुर येथे श्री खंडोबा देवास महाआरती करण्यात आली.

श्रीफळाचे तोरण बांधुन येळकोट येळकोट जय मल्हार चा गजर व बेल भंडाऱ्याची उधळण करीत मंदिरास प्रदक्षिणा घालण्यात आली. या महाआरतीस जेष्ठ नागरिक तात्या काळे, उमाकांत करपे, माजी सरपंच धनराज मुळे, जिल्हाचिटणीस साहेबराव घुगे, शहराध्यक्ष दीपक घोडके,सिध्दाराम धमुरे, युवा मोर्चाचे कार्याध्यक्ष दयानंद म ुडके,डॉ विवेक बिराजदार, विष्णू घुगे, मधुकर बंदपट्टे, गुडेंशा गोवे, सुधीर ठाकूर, सोमनाथ लंगडे,बापु घुगे, लक्ष्मण मुळे, बाबुराव मुळे, बालाजी कुलकर्णी, देवेंद्र घुगे,अनिल अणदुरकर, राजकुमार गाढवे,निलेश आलुरे,लक्ष्मण बोंगरगे , शिवकुम ार स्वामी, प्रज्योत करपे उपस्थित होते.

## माजी आमदार सातपुतेंच्या उपस्थितीत आज भाजपा शाखांचे उदघाटन

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १ डिसेंबर-**



माळशिरस तालुक्यातील अकलूज येथे २ डिसेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता विजय चौक याठिकाणी भाजपच्या पाच शाखांचे उदघाटन माजी आमदार रामभाऊ सातपुते यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. तरी माळशिरस तालुक्यातील भाजपच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन भाजपाचे अकलूज शहराध्यक्ष महादेव कावळे यांनी केले

## 'पोस्ट-जिपॅट संधी' विषयावर गणपती फार्मसीमध्ये व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १ डिसेंबर -**

श्री गणपती इन्स्टिट्यूट ऑफ फाम ास्युटिकल सायन्सेस अँड रिसर्च, टेंभुर्णी येथे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आणि स्पर्धा परीक्षेच्या तयारीला चालना देण्यासाठी स्पर्धा परीक्षा सेलच्या वतीने पोस्ट- जिपॅट संधी या विशेष अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानाचे मार्गदर्शन फॅब्टेक कॉलेज ऑफ फार्मसी, सांगोला येथील सहाय्यक प्राध्यापक प्रा. कांचन दशरथ यांनी केले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि सरस्वती पूजनाने करण्यात आली. प्राचार्या डॉ. आर. आर. बेंदगुडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. कांचन दशरथ यांची सविस्तर ओळख करून दिली. प्रा. कांचन दशरथ यांनी विद्यार्थ्यांना जिपॅट परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षा स्वरूप, आणि तयारीसाठी आवश्यक तांत्रिक कौशल्ये याबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित करताना सांगितले की, स्पर्धा परीक्षा ही केवळ कठोर परिश्रमांवरच नाही तर योग्य दिशा आणि अभ्यासाच्या प्रभावी पद्धतींवरही अवलंबून असते. व्याख्यानादरम्यान त्यांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले आणि तयारीसाठी काही उपयुक्त सल्ले दिले. कार्यक्रम ासाठी संस्थेचे सचिव डॉ. आर.डी. बेंदगुडे, अध्यक्ष ॲड. विजयराव हिरवे, उपाध्यक्ष बाबा येडगे, प्राचार्या डॉ. आर. आर. बेंदगुडे, डॉ. प्रशांत मिसाळ, प्रा. नामदेव शिंदे, प्रा. शिवराज ढगे, प्रा. अक्षय भेंकी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी या व्याख्यानाला सकारात्मक प्रतिसाद दिला. हे व्याख्यान विद्यार्थ्यांना जिपॅट परीक्षेच्या तयारीसाठी मार्गदर्शक ठरले असून कार्यक्रमासाठी समन्वयक म्हणून प्रा. कोमल साळुंखे यांनी काम केले.

## विष्णुपद मंदिरात विठुरायाचा महिनाभर मुक्काम

### मार्गशिर्ष महिन्यात भाविकांची दर्शनासाठी राहणार वर्दळ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१ डिसेंबर-**

येथील गोपाळपूर रस्त्यावरील अत्यंत प्राचिन अशा विष्णूपद मंदिरावर या वर्षी देखील विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने आकर्षक अशी विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. मार्गशिर्ष महिन्यात संपुर्ण महिनाभर या मंदिरात विठ्ठलाचे वास्तव्य असल्याची अख्यायिका सांगितली जाते. मार्गशिर्ष महिना सोमवार (ता.२) पासून सुरु होणार आहे. त्यामुळे येत्या महिनाभर या मंदिरात भाविकांची दर्शनासाठी वर्दळ राहणार आहे.

येथील चंद्रभागेच्या पात्रात असलेले विष्णूपद मंदिर हे एक प्राचिन मंदिर आहे. विठ्ठलाच्या दर्शनासाठी येथे येणारा प्रत्येक भाविक विष्णूपद मंदिराला भेट देत असतो. मार्गशिर्ष शुध्द प्रतिपदा ते मार्गशिर्ष वद्य अमावस्या या काळात संपुर्ण महिनाभर विठुरायाचे वास्तव्य





**पंढरपूर येथील अतिप्राचिन अशा विष्णूपद मंदिरात दगडावर कोरलेल्या गायीच्या पावलांचे ठस्से, कृष्णाने राधा तसेच गायींसाठी वाजविलेली बासरी आणि या ठिकाणी कृष्णाने आपल्या संवगड्यासह काला करुन खाल्लेली काल्याच्या वाटीच्या खुणा.**

याच मंदिरात असल्याची अख्यायिका आहे. त्यामुळे या ठिकाणी महिनाभर दररोज पहाटे व संध्याकाळी विठुरायाची आरती होत असते. या शिवाय विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन देखील येथे करण्यात येत असते. त्यामुळे पंढरपूर शहर तसेच आसपासच्या गावातील तसेच खास परगावाहून येणाऱ्या भाविकांची देखील या मंदिरात मोठी गर्दी असते. याच काळात नाताळ सुट्या असल्याने बाहेरगावच्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सहली देखील येथे येत असतात. गेल्या चार वर्षापासून या प्राचिन मंदिरावर विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने आकर्षक अशी विद्युत रोषणाई केली जात आहे. या बरोबरच हे मंदिर नदीपात्रात असल्याने संपुर्ण मंदिराला बॅरेकेटींग करण्यात आले आहे.

#### अशी आहे विष्णूपद मंदिराची अख्यायिका

चंद्रभागा पात्रातील विष्णूपद मंदिरात गायीच्या पावलांचे ठस्से, कृष्णाने राधा तसेच गायींसाठी वाजविलेली बासरी तसेच या ठिकाणी कृष्णाने आपल्या संवगड्यासह काला करुन खाल्लेली काल्याच्या वाटीच्या खुणा दगडा मध्ये कोरलेल्या दिसून येतात. या बरोबरच या ठिकाणी भगवान विष्णूची पावले देखील उमटलेली दिसतात. त्यामुळे या ठिकाणाला विष्णूपद असे नाव पडल्याचे सांगितले जाते.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

शेकोट्या पेटल्या...




**तेर :** तेर व परिसरात कडाक्याच्या थंडी पासुन बचाव करण्यासाठी तेर येथील नागरी शेकोटी करुन तापताना ग्रामस्थ.



## संक्षिप्त वृत्त...

### तुळजाभवानी मातेस भाविकाकडून अकरा तोळे सोन्याची माळ अर्पण

**तुळजापूर, दि.१ डिसेंबर -**



तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मातेस परभणी येथील भाविक जयश्री रमेशराव देशमुख, यांनी ११ तोळे सोन्याची माळ देवी चरणी अर्पण केली. यावेळी श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानतर्फे त्यांचा देवीची प्रतिमा, शाल, श्रीफळ देऊन देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी श्री तुळजाभवानी संस्थानचे पदाधिकारी, देशमुख यांचे कुटुंब उपस्थित होते.

### क्रूझरच्या धडकेत बालकाचा मृत्यू

**परंडा, दि.१ डिसेंबर -**

रस्त्याच्या कडेला खेळत असलेल्या तेरा महिन्याच्या बालकाच्या अंगावरून क्रूझर गाडी गेल्यामुळे यामध्ये बालकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना परंडा तालुक्यातील शेळगाव या गावात घडली. मृत्युमुखी पडलेल्या बालकाचे नाव राजविर विजय धेंडे (वय १३ महिने, रा. शेळगाव ता. परंडा) असे आहे. दि.२६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता शेळगाव येथील ग्रामपंचायतच्या बाजूच्या रोडवर खेळत होता. त्यावेळी क्रुझर (क्र. एमएच २५/एएल ९२३६) चा चालक मल्हारी खटके (रा. पांढरेवाडी ता. परंडा) याने त्याच्या ताब्यातील कुझर ही हायगयी व निष्काळजीपणे चालवून राजविर धेंडे याला धडक दिली. या अपघातात राजविर धेंडे हा गंभीर जखमी होवून मृत्युमुखी पडला. फिर्यादी विजय अरुण धेंडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून अंबी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.




### आईच्या नावाने सुरु केला वाचन कट्टा

**नळदुर्ग, दि.१ डिसेंबर -**

आईच्या नावाने माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांनी सुरु केलेला वाचन कट्टा हा उपक्रम अतिशय स्तुत्य व लोप पावत चाललेल्या वाचन संस्कृतीला चालना देणारा आहे असे शिवसेनेचे माजी नगरसेवक कमलाकर चव्हाण यांनी म्हटले आहे. आपल्या मातोश्री कै. यमुनाबाई अहंकारी यांच्या स्मरणार्थ विनायक अहंकारी यांनी आम्मा वाचन कट्टा सुरु केला आहे. या वाचन कट्ट्याचा शुभारंभ दि.१ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला आहे. यामध्ये सर्व वर्तमानपत्रे व विविध पुस्तकं वाचण्यासाठी ठेवण्यात येणार आहे. या कार्यक्रमास कमलाकर चव्हाण, शरद बागल, बसवराज धरणे, विलास येडगे, शिवाजी नाईक, उत्तम बनसगोळे, भगवंत सुरवसे, रमेश जाधव, उत्तम रामदासी, वसंत रामदासी, सुधीर पुराणिक, नंदकुमार जोशी, संजय जाधव, राजकुमार वैद्य, आकाश कुलकर्णी आदी उपस्थित होते.



### श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात पोलीस व आर्मी भरतीपूर्व प्रशिक्षण

**मुरूम, दि.१ डिसेंबर -**

महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग माहिती तंत्रज्ञान साहित्या केंद्र आयोजित करेल कथेच्या वतीने कट्टाच्या वतीने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पोलीस आणि आर्मी भरती पूर्व प्रशिक्षण सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून उमरगा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय करिअर कट्टा एक्सलन्स सेंटर महाविद्यालय म्हणून निवड झालेल्या सेंटरमध्ये पोलीस व आर्मी भरती पूर्व प्रशिक्षण अकॅडमी सुरू करण्यास प्रमाणपत्र माहिती व तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांच्या हस्ते प्रा.डॉ. संजय अस्वले यांना देण्यात आले. पुणे येथील यशदा प्रशिक्षण केंद्रामध्ये युवा धोरण निश्चिती आणि पोलीस प्रशिक्षण केंद्र प्रशिक्षण दोन दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. कार्यशाळेत महाराष्ट्रातील निवडक सेंटर ऑफ एक्सलन्स महाविद्यालयामध्ये करिअर कट्ट्याच्या वतीने पोलीस प्रशिक्षण अकॅडमी सुरू करण्यात आली आहे. या कार्यशाळेसाठी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील प्रा.डॉ. अस्वले आणि समन्वयक डॉ.ए.के. कटके, डॉ.सी.डी. करे आणि पोलीस प्रशिक्षण केंद्राचे प्रशिक्षक मद्रे यांची उपस्थिती होती.

# अतिवृष्टीचे ३०८ कोटी २१ लाख रुपये अनुदान शेतकऱ्यांना तातडीने वाटप करावे

## सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांची राज्याचे मुख्य सचिव सुजाता सैनिक यांच्याकडे मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ डिसेंबर -**

सन २०२४ चे धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्याचे अतिवृष्टीचे ३०८ कोटी २१ लाख रुपये अनुदान प्रस्तावास मंजुरी देऊन शेतकऱ्यांना तातडीने वाटप करावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांनी राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सैनिक यांच्याकडे केली आहे.



धाराशिव जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्याने, जिल्हा प्रशासनाने सुरुवातीला ४ ऑक्टोबर रोजी परंडा, कळंब, धाराशिव, वाशी या तालुक्याचा अनुदान प्रस्ताव पाठवला होता. त्यानंतर सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांनी जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांच्याकडे आग्रह धरल्यानंतर १५ ऑक्टोबर रोजी जिल्हा प्रशासनाने उमरगा आणि लोहारा या दोन तालुक्याचा ८६ कोटी ४६ लाख रुपयांचा प्रस्ताव पाठवला होता; मात्र त्या पुढील कालखंडात विधानसभेची आचारसंहिता लागल्यानंतर सदरील प्रस्तावास मंजुरी मिळू शकली नाही. सध्या प्रस्ताव राज्याच्या मुख्य सचिव यांच्याकडे आहे. राज्यात सध्या काळजीवाहू मुख्यमंत्री असल्याने शेतकऱ्यांना अतिवृष्टीचे अनुदान मिळत नाही. २०१९ ला ही अशीच परिस्थिती उद्भवल्यानंतर राज्याच्या मुख्य सचिवांनी त्या निधीला मान्यता देऊन अतिवृष्टी व सततच्या पावसाचे अनुदान दिले होते. त्याच पद्धतीने याही वर्षी शेतकऱ्यांना अनुदान द्यावे, अशी आग्रही मागणी केली आहे. धाराशिव जिल्ह्यातील दोन लाख ६० हजार ६९० शेतकऱ्यांना त्यांच्या दोन लाख ३९ हजार ७६७ हेक्टर वरील नुकसानी पोटी ३०८ कोटी सत्तावीस लाख रुपये मिळणार आहेत.

सदरील अनुदान प्रस्ताव अस तातडीने मान्यता देऊन शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी, अशी विनंती मुख्य सचिव सैनिक यांना अनिल जगताप यांनी केली आहे.

### शेतकरी संख्या व मिळणारी अनुदान रक्कम...

**धाराशिव** तालुक्यातील ६५६३३ शेतकऱ्यांना ४८ कोटी ४२ लाख रुपये अनुदान मिळणार आहे. **परंडा** तालुक्यातील १४ हजार ३९५ शेतकऱ्यांना नऊ कोटी ४४ लाख रुपये अनुदान मिळणार आहे. **कळंब** तालुक्यातील ६५३३१ शेतकऱ्यांना ७३ कोटी ४५ लाख रुपये अनुदान मिळणार आहे. **वाशी** तालुक्यातील ३५ हजार ५७ शेतकऱ्यांना २२ कोटी १८ लाख अनुदान मिळणार आहे. **उमरगा** तालुक्यातील ४९ हजार २२८ शेतकऱ्यांना ५२ कोटी ७५ लाख रुपये अनुदान मिळणार आहे. तर **लोहारा** तालुक्यातील ३००६९२ शेतकऱ्यांना ३३ कोटी ७० लाख रुपये अनुदान मिळणार आहे.

# तेर शिवारात दोन गटात तुंबळ हाणामारी

## ढोकी पोलिसांत परस्परविरोधी गुन्हे दाखल...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ डिसेंबर -**

तेर शिवारात दोन गटात तुंबळ हाणामारी झाल्याची घटना घडली आहे. या घटनेत दोन्ही गटांनी एकमेकांविरुद्ध ढोकी पोलीस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे दाखल केले आहेत.

पहिल्या घटनेत सोमनाथ शेळके यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, फुलचंद पसारे, खुडू भक्ते, दादा पसारे, धनाजी भक्ते, सोमनाथ सौदागर, राजेंद्र पसारे, बाळा शिंदे, हरी भक्ते, नवनाथ पसारे आणि इतर तिघांनी त्यांना, त्यांच्या आईला आणि मेहुण्याला शिंदे यांच्या शेतात मेंढ्या चारल्याच्या कारणावरून मारहाण केली. आरोपींनी लाथाबुक्यांनी, दगड आणि काठ्यांनी मारहाण करून जखमी केले.

तसेच अनिल कुचेकर यांच्या खिशातील २५ हजार ६०० रुपये आणि विवो मोबाईल चोरून दुसऱ्या मोबाईलचा डिस्प्ले फोडला.

दुसऱ्या घटनेत, राजेंद्र पसारे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, सोमनाथ शेळके, बायडाबाई शेळके, अनिल कुचेकर, मनिषा कुचेकर आणि इतर पाच जणांनी त्यांना, त्यांच्या भावाला आणि पुतण्याला नवनाथ नाईकवाडी यांच्या कांद्याच्या रिकाम्या शेतात झालेल्या भांडणाच्या कारणावरून मारहाण केली.

आरोपींनी लाथाबुक्यांनी, काठ्या आणि लोखंडी रॉडने मारहाण करून जखमी केले. तसेच राजेंद्र पसारे यांच्या हातातील ५ ग्रॅमची अंगठी आणि दादासाहेब पसारे यांच्या खिशातील पाच हजार रुपये काढून घेतले.

दोन्ही गटांनी एकमेकांवर जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप केला आहे. ढोकी पोलिसांनी दोन्ही तक्रारींची नोंद घेत पुढील तपास सुरू केला आहे.

# मनोज जरांगे-पाटील यांचे येरमाळ्यात स्वागत



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१ डिसेंबर -**

अंतरवाली सराटी येथुन तुळजापुरकडे जाताना मनोज जरांगे-पाटील यांचे येरमाळा येथे जंगी स्वागत करण्यात आले.

आंतरवाली सराटी येथुन तुळजापुरच्या तुळजाभवानी मातेचे दर्शन घेऊन पंढरपूरच्या विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी पन्नास चारचाकी वाहनांसह निघालेल्या मनोज जरांगे-पाटील यांचे येरमाळा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे मराठा युवकांनी जेसीबीच्या साहाय्याने हार घालून स्वागत केले.

त्यावेळी येरमाळा व परिसरातील मराठा युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तेरखेडा आठवडी बाजारात मोबाईल चोरट्यांचा धुमाकूळ

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.१ डिसेंबर -**

धाराशिव जिल्ह्यातील सर्वात मोठा आठवडी बाजार समजल्या जाणाऱ्या तेरखेडा आठवडी बाजारात मोबाईल चोरट्यांनी धुमाकूळ घातला आहे. वाशी तालुक्यातील तेरखेडा गावात दर शनिवारी मोठा आठवडी बाजार भरतो. या बाजारात कळंब, भूम, वाशी, आणि बार्शी तालुक्यातील अनेक गावचे व्यापारी, नागरिक खरेदी विक्रीसाठी येत आहेत. या बाजाराचे स्वरूप मोठे असल्याने बाजारात मोठी गर्दी असते, याच गर्दीचा फायदा घेत मोबाईल चोरीच्या घटना वाढल्या आहेत. यात दि.३० शनिवार रोजी सटवाईवाडी गावचे माजी सरपंच योगीराज फरताडे हे तेरखेडा गावात बाजार करत असतात चोरट्यांनी १३ हजार रुपये किंमत असलेला विवो कंपनीचा मोबाईल लंपास केला. गेली अनेक वर्षे झाली लाखो किंमतीचे मोबाईल चोरट्यांनी बाजारातून लंपास केले आहेत. पोलिसांच्या आशिर्वादाने हे प्रकार सुरू आहेत असे स्थानिक लोकांचे म्हणणे आहे. चोरीच्या घटनांमुळे तेरखेडा आठवडी बाजारात नागरिकांमध्ये, व्यापाऱ्यांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. पोलिसांना हे प्रकार माहीत असताना देखील आठवडी बाजारात कुठलीही सुरक्षा व्यवस्था करण्यात आली नाही. तेरखेडा आठवडी बाजार येरमाळा पोलीस ठाण्याच्या हद्दीत येते आहे.



> मी तेरखेडा येथे शनिवारी दुपारी दीड च्या सुमारास बाजारात भाजीपाला खरेदी केला आणि गावाकडे वापस जात असताना घरी फोन करण्यासाठी मोबाईल खिशात बघितले तर मोबाईल नव्हता.
> - **योगीराज फरताडे**, माजी सरपंच सटवाईवाडी

# बाबुराव पाटलाने गणपतीच्या मूर्तीला अर्पण केले ४५ किलो चांदीचा मुकुट



## हनुमान गणेश मंडळासाठीचा उपक्रम...

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.१ डिसेंबर -**

शहरातील हनुमान चौक येथील हनुमान गणेश मंडळाच्या गणपती मूर्तीला ४५ किलोचा मुकुट बाबूराव पाटील या गणेश भक्ताने एक दिवसांपूर्वी अर्पण केले आहे. या गणेश भक्ताच्या धार्मिक सेवेबद्दल मंडळाने आभार मानले आहे.

मुरूम शहरातील हनुमान गणेश मंडळाच्यावतीने प्रतिवर्षी विविध सामाजिक उपक्रम अनेक कार्यक्रम यासह रक्तदान हेच श्रेष्ठदान या हेतूने रक्तदान शिबिराचे वर्षभरात अनेकवेळा उपक्रम राबवले जातात. गतवर्षी राज्यभरात एकापाठोपाठ एक होत असलेल्या अन्याय अत्याचाराच्या घटनांची पुनरावृत्ती राज्यात होऊ नये या हेतूने छत्रपती शिवरायांच्या काळातील महिलाविषयक धोरण या अनुषंगाने छत्रपती शासन या नावाने गणेश उत्सवात देखावा सादर करण्यात आला होता. या हनुमान गणेश मंडळाचे विशेष महत्त्व म्हणजे पर्यावरण पूरक असलेली सुबक व अप्रतिम गणपतीची मूर्ती आहे. या गणपतीवर हनुमान चौकातील बाबुराव गुरुलिंग पाटील व अविनाश हनुमंत पाटील यांची श्रद्धा व निस्सीम प्रेम या भक्तीमुळे त्यांनी या गणपतीच्या मूर्तीसाठी ४५ तोळे चांदीचा मुकुट हनुमान गणेश मंडळाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत अर्पण करण्यात आला.



यावेळी हनुमान गणेश मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तुळजापूर येथील जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा; दोघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१ डिसेंबर -**

तिर्थक्षेत्र तुळजापूर शहरातील नवीन बसस्थानक रोडलगत चक्री जुगार अड्यावर पोलिसांनी छापा टाकुन चक्री जुगार साहित्य व रोख रकमेसह १९,१५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई शुक्रवार (दि.२९) रोजी दुपारी तुळजापूर पोलिसांनी केली.

तिर्थक्षेत्र तुळजापूरात चक्री जुगार अड्यांचा सुळसुळाट वाढला असुन, नवेजुने बसस्थानक मंदीर परिरासरात सर्रास जुगार अड्डे गेल्या अनेक महिन्यापासुन राजरोस चालु आहेत. या चक्री जुगारास तरुण भाविक वर्ग बळी आहेत.

या जुगार विरोधी कारवाई दरम्यान तुळजापूर पोलीसांनी तुळजापूर पोलीस ठाणे हद्दीत विश्वनाथ कॉर्नरकडुन नविन बसस्थानकडे जाणाऱ्या रोडलगत छापा टाकला.

यावेळी राम बाबुराव टकले (वय ३२, रा. बसवंतवाडी), राजु उर्फ कैलास कुंडीबा मोहिते (वय ४६, रा. गावठाण भागडे स्थळ काहेचीवाडी ता. खेड जि. पुणे ह.मु. हंगरगा पाटी ता. तुळजापूर) हे दोघे विश्वनाथ कॉर्नर कडुन नविन बसस्थानककडे जाणाऱ्या रोडलगत चक्री जुगाराच्या साहित्यासह एकुण १९ हजार १५० रुपये रक्कम स्वतःच्या कब्जात बाळगलेले आढळले.



यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२ (अ) अन्वये तुळजापूर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे. याप्रकरणी अधिक तपास करीत आहेत.

# शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय व उपजिल्हा रुग्णालयाच्यावतीने एड्स दिनानिमित्त जनजागृती रॅली

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१ डिसेंबर -**

शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत गुणवत्ता कक्ष विभाग आणि उपजिल्हा रुग्णालय कळंब यांच्या संयुक्त विद्यमाने एड्स दिन साजरा करण्यात आला.

यानिमित्ताने महाविद्यालयात एड्स जनजागृती विषयी विद्यार्थ्यांकडून प्रतिज्ञा घेण्यात आली तसेच एड्स विषयीच्या माहिती पुस्तिकेचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयातून एड्स जनजागृती विषयी रॅली काढण्यात आली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य सुनील पवार, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य मिटकरी, डॉ. पुरुषोत्तम पाटील, वैद्यकीय अधिकारी उपजिल्हा रुग्णालय कळंब, समुपदेशक भंडारी प्रगती, कोळी परशुराम, ईश्वर भोसले, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, डॉ. लोंढे, आयएमए पूर्व प्रेसिडेंट ऑफ महाराष्ट्र, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. संदीप महाजन, प्रा.डॉ. राघवेंद्र विठ्ठल, प्रा. अर्चना मुखेडकर, प्रा.डॉ. हेमंत चांदोरे, प्रा. गणेश आडे, प्रा.विलास अडसूळ, प्रा.डॉ. श्रीकांत भोसले, प्रा. ओमन, प्रा. बोबडे, प्रा. प्रताप शिंदे, तसेच महाविद्यालयीन कर्मचारी विनोद खरात, अमोल सुरवसे, मारुती केचे, शफिक शेख, अधीक्षक हनुमंत जाधव व सहाय्यक ग्रंथपाल अरविंद शिंदे आणि करा सेयो व एनसीसीचे स्वयंसेवक, विद्यार्थी उपस्थित होते.

# वर्ग दोनच्या जमिनी वर्ग एकमध्ये जलदगतीने परावर्तित करा

## आमदार कैलास पाटील यांच्या सूचना... जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांच्यासमवेत बैठक...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ डिसेंबर -**

धाराशिव शहरातील वर्ग २ जमिनी वर्ग १ करण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांच्या उपस्थितीत आ. कैलास पाटील यांनी आढावा बैठक घेतली. यावेळी वर्ग दोनच्या जमिनी जलदगतीने वर्ग एकमध्ये परावर्तित कराव्यात, अशा सूचना आमदार कैलास पाटील यांनी दिल्या.

मराठवाड्यासह धाराशिव जिल्ह्यातील भोगवटदार वर्ग २ जमिनी वर्ग १ मध्ये नियमानुकुल करण्याबाबत २४ सप्टेंबर रोजी राज्य सरकारचा आदेश निर्गमित झाला आहे. शासन निर्णयाच्या अनुषंगाने धाराशिव शहरातील भोगवटदार वर्ग २ च्या जमिनी वर्ग १ मध्ये परावर्तित करण्यासाठी जिल्हा प्रशासन स्तरावर जलदगतीने पावले उचलावीत आणि शेतकरी, प्लॉटधारक नागरिक यांना न्याय मिळावा बैठकीचे आयोजन आले होते. यासाठी करण्यात आ. कैलास पाटील म्हणाले की, तहसील कार्यालयाकडे उपलब्ध असणारी सर्व माहिती ऑनलाइनवर अपलोड करावी, प्रस्ताव मंजूर करताना चेकलिस्टचा वापर करून सर्वांना एक सारख्या कागदपत्रांची मागणी करावी, गाव नमुना ९/३, ९/४ तयार करून क्लाउडर अपलोड करावे, इतर जिल्ह्यात वर्ग २ च्या जमिनीवर मध्ये परावर्तित करण्याबाबत काय कार्यवाही केली जात आहे. १ याची माहिती घ्यावी. ग्रामीण भागातील जमिनी वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये परावर्तित करताना तहसील कार्यालय स्तरावर तसेच न.प. भागातील जमिनीचे रूपांतर करताना वॉर्ड निहाय कॅम्पचे आयोजन करण्यात यावे, ज्या जमिनींचा एन.ए. फायनल असेल त्यांना इतर कागदपत्रे न मागता वर्ग दोनमधून एक वर्ग एकमध्ये ५ टक्के नजराणा भरून परावर्तित करून द्याव्यात कारण त्यांना सर्व कागदपत्राची पडताळणी करून कार्यालयाने मंजूरी दिलेली आहे.



तहसील कार्यालय स्तरावर एक खिडकी तयार करून प्रस्तावाची सर्व कागदपत्रे उपलब्ध करावीत अशा सूचना देण्यात आल्या.

# अवैध गौण खनिज पथक स्थापन : तहसीलदार हेमंत ढोकले

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.१ डिसेंबर -**

कळंब तालुक्यातील अवैद्य वाळू माती दगड, मुरूम उत्खनन वाहतुकीमध्ये खूप प्रमाण वाढले असल्याने व संबंधितअनेक तक्रारी प्राप्त झाल्याने अवैद्य गौण खनिज उत्खनन वाहतूक प्रतिबंधक करण्याच्या दृष्टीने कळंब तहसीलदार हेमंत ढोकले यांनी ग्रस्त पथक स्थापन करण्यात केले आहेत.

तालुक्यातील सात मंडळाधिकारी यांना तहसीलदार यांनी आदेशीत केले आहे.या पथकामध्ये मंडळ अधिकारी व त्या मंडळाच्या मंडळामधील सर्व तलाठी व एक सशस्त्र धारी पोलीस असणार आहे.

सह नियंत्रण अधिकारी म्हणून नाईब तहसीलदार महसूल हे या गस्त पथकाचे प्रमुख असणार आहेत. या कळंब मंडळाधिकारी व त्या मंडळातील सर्व तलाठी शस्त्रधारी पोलीस यांच्यासोबत गस्त घालणार आहे.

कळंब मंडळ अधिकारी व मंडळमधील सर्व तलाठी सोमवार आपल्या





कार्यक्षेत्रामध्ये गस्त घालणार आहेत. मंगळवार ईटकुर मंडळाधिकारी व सर्व तलाठी, बुधवार येरमाळा मंडळ अधिकारी व सर्व तलाठी, गुरुवार मंडळ अधिकारी व सर्व तलाठी, शुक्रवार मोह मंडळ अधिकारी व त्या मंडळातील सर्व तलाठी, शनिवार शिराढोण मंडळ अधिकारी व त्या मंडळामधील सर्व तलाठी, रविवार मस्सा मंडळ अधिकारी व त्या मंडळामधील सर्व तलाठी असे सप्ताहातील नियोजन असनार आहे.

या पथकांनी अवैद्य गौण खनिज व उत्खनन वाहतूक करणाऱ्याचा शोध घेऊन सदरील वाहन संबंधित पोलीस ठाणे येथे जमा करण्यात यावे अशी आदेश तहसीलदार यांनी काढले आहेत.

यामुळे संबंधित अवैद्य गौण खनिज करणाऱ्यामध्ये भीती निर्माण झाली आहे.

# उदगीर येथे माऊली ग्रुपच्यावतीने संतश्रेष्ठ माऊलीचा समाधी उत्सव साजरा



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१ डिसेंबर -**

माऊली ग्रुपच्यावतीने संतश्रेष्ठ माऊलीचा समाधी उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाची सुरुवात त्रिवार गायत्री मंत्र पठणाने होऊन संत ज्ञानेश्वर माऊलीच्या प्रतिमेचे पुजन मनोज शिवनखेडे व शीतल शिवनखेडे व माऊली ग्रुपचे अध्यक्ष चंद्रकांत डोईजोडे यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन झाले.

प्रास्ताविकात माऊली ग्रुपचे अध्यक्ष चंद्रकांत डोईजोडे यांनी एकमेकाच्या सुख आणी दु:खात सहभागी होणे हाच उद्देश असुन एकमेकाची काळजी घेणारा माऊली ग्रुप समाज व राष्ट्राप्रती काही देणे लागतो या उद्देशाने माऊली ग्रुपची स्थापना झाली आहे.

चांगले कर्म केले तर चांगले फळ मिळते यासाठी सतकर्म करा असे विचार व्यक्त केले.

यावेळी माऊली ग्रुपचे मार्गदर्शक, विलास बोके, माऊली ग्रुपचे उपाध्यक्ष मनोहर पांचाळ, सचिव मनोज शिवनखेडे, सुनिल पाटील, राम मोतीपवळे, शिवलिंग मठपती, ॲड. कपील बिरादार, ॲड. विजय दिक्षीत, शिवाजी चिल्ले, शिवशंकर जिवणे, संजय दुणगे, विजय कळसे, संतोष काळेकर, भरत कोयले, मन्मथ मुळे, मिरा डोईजोडे, शितल शिवनखेडे, सविता बोके, कमल दुनगे, रत्नमाला मठपती, संगीता मठपती, सावित्री कोयले, सोनाली काळेकर, गोदावरी जिवणे, सुवर्णा शेट्टे, किर्ती दिक्षीत, संतोषी कळसे, भाग्यश्री बिराजदार, सुनिता चिल्ले, छाया मुळे, संगीता मोतीपवळे, माधवराव शिवनखेडे, आदि उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचलन संजय दुनगे यांनी तर आभार प्रा. संजय पाटिल यांनी मानले.

# संत अधिष्ठानाशिवाय भगवान परात्माची प्राप्ती नाही : हभप. रामभाऊ महाराज निंबाळकर

## ब्रह्मांडनायक संत बाळूमामा मंदिर परंडा येथे भंडारा उत्सव संपन्न...

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१ डिसेंबर -**

परंडा शहरातील ब्रह्मांडनायक संत बाळूमामा मंदिर या ठिकाणी अमावस्या उत्सवानिमित्त सकाळी श्री बाळूमामा मूर्तीला अभिषेक करण्यात आला. त्यानंतर उपस्थित भजनी मंडळ यांचा भाजनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी सकाळी १० ते १२ वेळेत संत स्वामी रघुराज महाराज यांचे विद्यमान वंशज गुरुवर्य रामभाऊ महाराज निंबाळकर यांची कीर्तन सेवा संपन्न झाली. कीर्तनामध्ये महाराज प्रबोधन करताना म्हणाले की, आपण भाग्यवान आहोत कारण आपल्या ला मनुष्य देह प्राप्त झाला आहे. परमार्थ घडण्यासाठी खुप मोठी पुण्याई लागते.संताच्या संगतीशिवाय मानवी जिवनाची परिपुर्णता नाही. दुसऱ्याच्या सुखामध्ये संत सुख मानतात दुसऱ्याच्या दुःखा एकामध्ये संत दुःख मानतात. केवळ सर्वसामान्य जिवावर उपकार करण्याकरता या पृथ्वीतला संत अवतार घेत असतात. हे मत महाराजांनी कीर्तनामध्ये प्रतिपादन केले.



कीर्तनानंतर हभप. मुरलीधर महाराज बोराडे यांची अन्नदान सेवा संपन्न झाली. चहा व्यवस्था गणेशसिंह सद्दिवाल, कण्या अबिंल व्यवस्था अनंतसिंह सद्दीवाल, पाणी जार व्यवस्था भालचंद्र अवसरे यांच्या वतीने करण्यात आली होती.

यावेळी हभप. नवनाथ महाराज साठे, हभप. नागेश महाराज मांजरे, हभप. रामराजे महाराज भोसले, हभप. विठ्ठल महाराज पाटील, हभप. बालाजी महाराज बोराडे, हभप. सुरज महाराज रणभोर, तात्या महाराज हजारे, कृष्णा महाराज चव्हाण, परमेश्वर नेटके, बळीराम कोळी, अंकुश जमदाडे, मारूती महाराज बारस्कर हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन मंदिर समितीच्या केशरताई वैरागे मदने यांनी केले होते.

# दगडोजीराव देशमुख फार्मसीत नुतन प्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१ डिसेंबर -**

तालुक्यातील आलमला येथील ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कारासाठी शिक्षण या बिद्र वाक्यातून निर्माण झालेल्या श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित दगडोजीरावा देशमुख फार्मसी महाविद्यालयात या वर्षी डी. फार्मसीच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या नुतन विद्यार्थ्यांचे व्हाईट कोट सिरेमनी कार्यक्रमात त्यांच्या पालकांच्या उपस्थितीत संस्थेच्या वतीने पांढया रंगाचा कोट व पुष्पगुच्छ देवुन शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने करण्यात आली. शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीचे शैक्षणिक विभाग प्रमुख प्रा.एस.एस. वागदरे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलास कापसे, गापोळ माळी, पायल जाधव, बालाजी विभुते, अजहर ठेंगाडे, प्रतिक धाराशिवे, कोमल गिरी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. कैलास कापसे यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा चढता आलेख विद्यार्थी व पालकांसमोर मांडला. तसेच पांढऱ्या रंगाचा कोट सकारात्मकतेचे प्रतिक आहे. फार्मासिस्ट रूग्ण आणि डॉक्टर यांच्यामधील दुवा असल्याचे प्राचार्य कापसे यांनी सांगितले.

तसेच विद्यार्थ्यांसाठी पालक्तव योजना राबवुन त्यांच्या अडीअडचणीचे समाधान केले जाते.

महाविद्यालयातील डिजीटल लायब्ररी, राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय जर्नल्स, अत्याधुनिक प्रयोगशाळा यांचा भरपूर वापर करुन विद्यार्थ्यांनी आपली स्वत:ची ओळख निर्माण करावी, असे मत प्राचार्य कापसे यांनी यावेळी व्यक्त केले केले.

प्रा.एस.एस. वागदरे यांनी फार्मसी क्षेत्राची निवड केल्याबद्दल व या क्षेत्रात असलेल्या विविध करिअर व संधी याबाबत माहिती देवुन अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी आपला सर्वांगीण विकास व्हावा म्हणुन क्रीडा स्पर्धा, विविध शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी व्हावे.

शिक्षणाबरोबर सुसंस्कार, आदर भावना अशा या नैतिक मुल्यांचे शिक्षण विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्याचे कार्य महाविद्यालयाच्या वतीने केले जात असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. सूत्रसंचालन प्रा. पायज जाधव यांनी केले तर विभाग प्रमुख प्रा. गोपाळ माळी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या कार्यक्रमासाठी सर्व विभाग प्रमुख, विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुरुबाबा उत्सवाची गोपाळकाल्याने सांगता

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१ डिसेंबर -**

सदगुरू गुरुबाबा महाराज आणि रामकृष्ण महाराज यांच्या वार्षिक उत्सवाची निलंगा शहरातून सद्गुरूंच्या पालखीची नगर प्रदक्षिणा होऊन नंतर श्रीक्षेत्र बारवं येथे दहीहंडी गोपाळकाला फोडून उत्साहात सांगता झाली.

२५ नोव्हेंबरपासून श्रीक्षेत्र निलंगा बारवं यथे श्री गुरुबाबा महाराज व रामकृष्ण महाराज यांच्या उत्सवास स्थापनेने आरंभ होऊन आज शुक्रवार दि.२९ रोजी गोपाळकाल्याने हजारो भाविकांच्या उपस्थितीत सांगता झाली. यावेळी ज्ञानोबा तुकाराम च्या, सद्गुरूंच्या आणि विठ्ठलाच्या नाम गजराने बारवं क्षेत्र परिसर दुमदुमून गेला होता. पिठाधीपती सद्गुरु गुरुबाबा महाराज औसेकर यांच्या अधिपत्यात आणि सद्गुरु श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या मार्गदर्शनात आणि हभप. श्रीरंग महाराज व हभप. ज्ञानराज महाराज औसेकर यांच्या सहभागात मोठ्या भक्ती भावाने संपन्न झाला. या उत्सवात हभप. वीरनाथ महाराज शेडजी निटूरकर, हभप. ज्ञानराज महाराज औसेकर, हभप. श्रीरंग महाराज औसेकर. सद्गुरु श्री गुरुबाबा महाराज औसेकर व सद्गुरु गहिनीनाथ महाराज औसेकर यांची कीर्तन सेवा गुरुबाबा रामकृष्ण महाराज यांच्या समाधी समोर संपन्न झाली. निलंग्याच्या बारवं क्षेत्री दरवर्षी होणाऱ्या उत्सवात निलंगा व पंचक्रोशीतील नित्यनेमाचे सदभक्त शिष्य आपली सेवा विरनाथ महाराज चरित्र ग्रंथाचे पारायण कडाक्याच्या थंडीचे दिवस असताना मोठ्या उत्साहाने मोठ्या संख्येने उपस्थित राहून करतात.

या उत्सवात जवळपास ३० ते ४० गावातून ज्ञानोबा तुकाराम, सद्गुरु वीरनाथ मल्लनाथ महाराज आणि रामकृष्ण गुरुबाबा महाराज यांच्या नावाचा जयघोष करीत आपापल्या गावातून निलंग्यात उत्सव स्थळी येतात.

हजारो टाळकरी, भाविक भक्त, कीर्तन, चक्रीभजन, प्रवचन दर्शन व महाप्रसादाचा लाभ घेतात, सलग पाच दिवस निलंग्यात या उत्सवामुळे भक्ती उत्साहाचे वातावरण निर्माण होते.

# व्यंकटेश महाजन महाविद्यालयात एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ डिसेंबर -**

येथील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयात आर्थिक साक्षरता व संपत्तीचे व्यवस्थापन या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला प्रमुख व्याख्याते म्हणून लातूर येथील योगेश मिरजगावकर हे उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. प्रशांत चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती.



या कार्यशाळेमध्ये आर्थिक साक्षरता या विषयावर व्याख्यात्यांनी मार्गदर्शन केले. संपत्तीचे व्यवस्थापन कशा पद्धतीने केले पाहिजे तसेच गुंतवणुकीचे वेगवेगळे पर्याय यावेळी त्यांनी सांगितले. शेअर मार्केट व म्युच्युअल फंड यामध्ये केली जाणारी गुंतवणूक याविषयी देखील त्यांनी मार्गदर्शन केले .

हि कार्यशाळा महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे प्रस्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ. प्रशांत चौधरी यांनी केले. प्रास्ताविकात या कार्यशाळेच्या आयोजानामागची भूमिका विषद केली. प्रत्येकाच्या जीवनात आर्थिक नियोजन का महत्वाचे आहे. या विषयी त्यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. प्रमोद बेरळीकर यांनी केले.

या कार्यशाळेत प्राध्यापक वर्ग, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मंगरूळ येथे हजरत ख्वाजा सैपन मुल्क दर्गाहचा जिर्णोद्धार व कळसारोहन संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.१ डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ येथे हजरत गैबीर्पीर दर्गाह जवळ हजरत ख्वाजा सैपन मुल्क (र.अ) यांच्या दर्ग्याचा जीर्णोद्धार व कळसा रोहन गुरुवार २८ नोव्हेंबर रोजी संपन्न झाला असून बुधवार २७ नोव्हेंबर रोजी ऊरुसनिमित्त सायंकाळी सहा वाजता मंगरूळ येथील मुलांनी परिवाराच्या घरून संदलची पारंपरिक वाद्य व नात, मुशायरे मिलाद म्हणत वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली.

ही मिरवणूक रात्री ८ वाजता दर्ग्यावर पोहोचल्यानंतर उपस्थित मुलाणी परिवार, नातेवाईक व ग्रामस्थांच्या उपस्थितीत संदल



चढवण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. मागील सहा महिन्यापासून या दर्गाहाचे बांधकाम चालू होते.

बांधकाम पूर्ण झाल्यानंतर दि.२८ नोव्हेंबर रोजी हैद्रा (ता. अक्कलकोट) येथील हजरत ख्वाजा सैपन मुल्क (र.अ) यांचा उरुस संपन्न झाल्यानंतर मंगरूळ येथील उरूस साजरा करुन उपस्थित भाविकांच्या हस्ते कळसारोहन करण्यात आले.

उरुसानिमित्त काटगाव, मुंबई, अकलुज, कोल्हापूर, कुंभारी, वडगाव (गांजा) जळकोट, माकणी, कनगरा, होर्टी, मेंढा, तुळजापूर, मंगरूळ, खोताचीवाडी, सरडेवाडी, तीर्थ बुद्रुक, तीर्थ खुर्द, बिजनवाडी, पोहनेर, कसई, निलेगाव इत्यादी परिसरातील भाविक व नातेवाईक यांनी उपस्थित राहून दर्शनाचा लाभ घेतला.

या उरुसानिमित्त बाबालाल मुलाणी व सलीम (हज्जु) मुलाणी यांच्यावतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

# लातूरमध्ये ६ डिसेंबरपासून जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१ डिसेंबर -**

क्रीडा व युवक सेवा आयुक्त कार्यालय, क्रीडा व युवक सेवा उपसंचालक कार्यालय, लातूर जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व नेहरू युवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने ६ ते ७ डिसेंबर रोजी जिल्हास्तरीय युवा महोत्सव २०२४-२५ चे आयोजन करण्यात आले आहे. लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृह व जिल्हा क्रीडा संकुलाच्या इनडोअर हॉल येथे हा युवा महोत्सव होईल.

युवकांचा सर्वांगिण विकास करणे, संस्कृती व परंपरा जतन करणे, युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त कला गुणांना वाव देणे व त्यांना एक खुले व्यासपीठ करण्याच्या हेतूने राष्ट्रीय एकात्मता वाढीस लावणे, युवकांना विज्ञान व तंत्रज्ञानाचे महत्व पटवून देणे, शिक्षण, उद्योग-व्यवसाय यासोबतच शेती या व्यवसायासी युवकांची ओळख करुन देणे, सामाजिक विकासात विज्ञानाचे महत्व युवकांना पटवूण देणे, हा युवा महोत्सवाचा मुख्य हेतू आहे. युवा महोत्सवात सांस्कृतिक कला प्रकार : समुह लोकनृत्य (सहभाग संख्या १०), लोकगीत (सहभाग संख्या १०), कौशल्य विकास : कथा लेखन, चित्रकला स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, कविता स्पर्धा. संकल्पना आधारीत स्पर्धा : विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नवसंकल्पना आधारित विज्ञान प्रदर्शन. युथ आयकॉन : जिल्ह्यातील युवक कल्याण क्षेत्रात तसेच युवांना प्रभावित करणारे कार्य केलेले १५ ते २९ वयोगटातील ५ युवक.

जिल्हास्तर युवा महोत्सवामध्ये लातूर जिल्हयातील १५ ते २९ वयोगटातील युवक व युवती सहभाग घेवू शकतात. त्यांचे वय १२ जानेवारी २०२५ या दिनांकापर्यंत परिगणना करण्यात येईल. यात सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय, संगीत ॲकडमी, महिला मंडळ, महिला बचत गट, युवकांसाठी कार्य करणाऱ्या स्वंयसेवी संस्था, नेहरू युवा केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) इत्यादी संस्थेतील युवक व युवती यांना सहभागासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. युवा महोत्सवामध्ये प्रत्येक कलाप्रकारासाठी विजयी स्पर्धकांना आकर्षक रोख बक्षीस, स्मृतीचिन्ह देवून गौरविण्यात येणार आहे. तसेच जिल्हास्तरावर विजयी युवक-युवती स्पर्धकांना विभागीय युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्याची संधी मिळणार आहे.

जिल्ह्यातील १५ ते २९ वयोगटात असलेल्या ५ युवकांची नावे विभागस्तरावर होणाऱ्या स्पर्धेसाठी पाठविण्यात येणार आहेत. तसेच विभागस्तरावरून ५ युवकांची नावे राज्यस्तरावर होणाऱ्या स्पर्धेसाठी पाठविण्यात येणार असून राज्यस्तरावरून एकूण १० युवकांना राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी पाठविण्यात येणाऱ्या संघामध्ये प्रवेश देण्यात येणार आहे. तसेच राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये युवांच्या भारत निर्माणासाठी नवीन संकल्पना विचारात घेऊन युवांना राष्ट्र निर्माणामध्ये सहभागी करून, त्यांची दूरदृष्टी विचारात घेणे आवश्यक आहे. या अनुषंगाने राष्ट्रीय युवा महोत्सव अंतर्गत विकसित भारत यंग लिडर्स डायलॉग अंतर्गत खालील संकल्पना निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

विकसित भारत क्विझमध्ये वैयक्तिकरित्या युवांना सहभागी होता येईल. यासाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा ही सामान्यज्ञान व भारताची कामगिरी या बाबींवर होणार आहे. ‘माय भारत’ पोर्टलवर शैक्षणिक संस्था व कॉलेज यांनी सहभाग नोंदवावा ही स्पर्धा ही २५ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर २०२४ या कालावधीत होणार आहे. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवांनी सहभाग घ्यावा. यामध्ये सहभागी होणाऱ्या युवकांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. विकसित भारत यावर निबंध लेखन स्पर्धा घेतली जाईल यामध्ये शब्द मर्यादा १००० शब्दांची राहील. प्रथम टप्प्यात सहभागी होवून निवड झालेल्या युवांचा यामध्ये सहभाग राहील. वर नमूद केलेल्या विषयावर निबंध लेखन करता येईल. यामधील सहभागासाठी प्रमाणपत्र देण्यात येईल. निबंध स्पर्धा ऑनलाईन पद्धतीने ८ ते १५ डिसेंबर २०२४ या कालावधीत होणार आहे. विकसित भारत पीपीटी चॅलेंजवर नमुद केलेल्या विषयांवर राष्ट्रीय स्तरावर स्पर्धा घेण्यात येणार आहे. यामध्ये प्रत्येक राज्यातून ४ युवांची निवड करण्यात येणार आहे. राज्यस्तरावरून यासाठी राज्याचा संघ निवड करण्यात येणार आहे. निबंध माय भारत पोर्टलवर अपलोड करावयाचे आहेत. २० ते २६ डिसेंबर २०२४ या कालावधीत ही स्पर्धा होणार आहेत. राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी निवड झालेल्या युवांना प्रथम ११ जानेवारी २०२५ रोजी सादरीकरण करावे लागेल. यामधून अंतिम फेरी साठी निवड झालेल्या युवांना पंतप्रधान यांच्यासमोर संकल्पनांचे सादरीकरण करावयाचे आहे. १२ जानेवारी २०२५ रोजी सदर सादरीकरण होणार आहे.

तरी लातूर जिल्ह्यातील इच्छुक युवक व युवतींनी आपली नावे ४ डिसेंबर, २०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, लातूर येथे नोंदवावीत. अधिक माहितीसाठी क्रीडा अधिकारी कृष्णा केंद्रे (भ्रमणध्वनी क्र. ९९७५५७६६००) यांच्याशी संपर्क साधावा, असे जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी कळविले आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# चुका सुधारून यशाला गवसणी घालता येते-शिंदे

## रोलबॉलमध्ये बीड, हॉकीत छत्रपती संभाजीनगरचा दबदबा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ डिसेंबर**

खेळात खिळाडूवृत्ती हवी. जो संघ विजयी होतो, त्यांनी हुरळून जाऊ नये. कारण पराभूत संघाचा ही खेळ चांगला असतो. अनेकदा थोड्याफार चुकांमुळे अपयश येते. या चुका सुधारून यशाला गवसणी घालता येते. त्यासाठी खेळाडूंनी एकाग्रतेने खेळत रहावे, असे मार्गदर्शन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक शंकर शिंदे यांनी खेळाडूंना केले.



जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषदेच्या विद्यमाने व जिल्हा हॉकी असोसिएशन आणि रोलबॉल असोसिएशन बीड यांच्या संयुक्त विद्यमाने विभागस्तरीय शालेय हॉकी व रोलबॉल स्पर्धा नुकत्याच जिल्हा क्रीडा संकुलात घेण्यात आल्या.

स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा क्रीडा संकुलात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक शंकर शिंदे यांच्याहस्ते झाले. याप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, पत्रकार सोमनाथ खताळ, जिल्हा हॉकी संघटक प्रा. दिनकर थोरात, तालुका क्रीडा अधिकारी पंडित चव्हाण, क्रीडाधिकारी कालिदास होसुरकर, क्रीडा मार्गदर्शक अविनाश पाटील, सतीश राठोड, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे जमादार सांगळे, हॉकी प्रशिक्षक व पंच अकबर खान, संस्थापक कार्याध्यक्ष म्युझिकल चेअर इंडिया तुकाराम ठोंबरे, रोल बॉल संघटनेचे सचिव रामदास गिरी उपस्थित होते.

स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर विभागातील १० पेक्षा जास्त संघांनी सहभाग नोंदविला. रोलबॉल स्पर्धेत बीड आणि परभणीचे तर हॉकी स्पर्धेत छत्रपती संभाजीनगरच्या खेळाडूंचे वर्चस्व राहिले. हॉकी स्पर्धेकरिता पंच म्हणून अकबर खान, शेख समीर, पवन ढाकणे, मोहमद वसीम तसेच रोलबॉल स्पर्धेकरिता वैभव गिरी, सुधीर हजारे, शरद पवार यांनी पंच म्हणून काम पाहिले. स्पर्धा यशस्वीतेसाठी तालुका क्रीडा अधिकारी पंडित चव्हाण, क्रीडा अधिकारी कालिदास होसूरकर, अनिकेत काळे, क्रीडा मार्गदर्शक सतीश राठोड, अविनाश पाटील, क्रीडा संयोजक जितेंद्र आराक, वरिष्ठ लिपिक धनेश करांडे, कनिष्ठ लिपिक त्रिगुणा वाघमोडे, मंगेश वडमारे यांनी पुढाकार घेतला. प्रास्ताविक विद्यागर यांनी केले. सूत्रसंचालन जितेंद्र आराक यांनी केले.

**हॉकी निकाल**

१९ वर्षांखालील मुले : प्रथम गीता गुरुकुल विद्या मंदिर, फुलंबी जि. छत्रपती संभाजीनगर द्वितीय डॉ. सौ. इंदिराबाई भास्कराव पाठक महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

१९ वर्षांखालील मुली – प्रथम युरेका इन्फोसिस स्कूल, छत्रपती संभाजीनगर, द्वितीय डॉ. सौ. इंदिराबाई भास्कराव पाठक महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

रोलबॉल निकाल

१४ वर्षांखालील मुली – प्रथम गुरुकुल पब्लिक स्कूल, बीड

१४ वर्षांखालील मुले – प्रथम गुरुकुल इंग्लिश स्कूल, बीड, द्वितीय – स्कॉटिश अकादमी, परभणी

१७ वर्षांखालील मुले – प्रथम सेंट ऑगस्टोन इंग्लिश स्कूल, परभणी

द्वितीय – पोद्दार इंटरनॅशनल स्कूल, हिंगोली

## बालकांचे हक्क यावर जनजागृतीपर कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ डिसेंबर**

बाल हक्क सप्ताहानिमित्त 'बालकांचे हक्क' या विषयावर शहरातील तेलगाव रोड येथील राजर्षी शाहू कन्या माध्यमिक विद्यालयात प्रमुख, जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष आनंद यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवार (ता.२८) जनजागृतीपर कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव जी.जी. सोनी केले. युनिसेफच्या वतीने सोनिया हंगे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी विधीदूत मिथुन जोगदंड यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पुढाकार घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंजि. बलभीमराव जाहेर पाटील होते. सूत्रसंचालन तिडके यांनी केले. शाळेच्या मुख्याध्यापक श्रीमती कदम यांनी आभार मानले.

## पवनचक्की कंपनीविरोधात तक्रार करण्यासाठभ शेतकऱ्यांनी पुढे यावे –डॉ.योगेश क्षीरसागर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ डिसेंबर**

आमदारांच्या वरदहस्तामुळे पवनचक्की कंपन्यांकडून बीड तालुक्यातील बालाघाट परिसरातील शेकडो शेतकऱ्यांची पिळवणूक सुरू आहे. आर्थिक हितसंबंधातून पवनचक्की कंपन्यांना आमदारांचे पाठबळ मिळत आहे. परंतु बालाघाटवरील अन्यायग्रस्त शेतकऱ्यांनी पुढे येऊन तक्रारी कराव्यात, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले आहे. दरम्यान, अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.



बीड तालुक्यातील बालाघाटावरील १०-१२ गावांच्या परिसरात पवनचक्की उभारण्याचे काम सुरू आहे. हे काम करणाऱ्या कंपन्यांचे अधिकारी, कर्मचारी शेतकऱ्यांसोबत अरेरावीची भाषा करतात. कंपन्यांनी शेतीमध्ये टॉवर उभारले असून या टॉवरवरील तारा ओढताना पिकांचे नुकसान झाले. त्याची शेतकऱ्यांना कसल्याही प्रकारची भरपाई दिली मिळत नाही. तसेच, टॉवर व विद्युत तारांमुळे बाधित होणाऱ्या शेतीची नुकसान भरपाई कंपनीने निश्चित केलेली नाही. त्यामुळे ही भरपाई देण्यासंदर्भात जिल्हा प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करणे अपेक्षित होते. तसेच, कंपनीकडून यापूर्वी शेतकऱ्यांना जमिनीच्या मोबदल्यापोटी चेक दिलेले आहेत, त्यापैकी अनेक चेक बाऊन्स झालेले असून ही शेतकऱ्यांची फसवणूक आहे. अशी अनेक प्रकरणे असताना कंपन्यांचे अधिकारी, कर्मचारी शेतकऱ्यांना अरेरावीची भाषा करतात आणि आमदार बघ्याची भूमिका घेतात. यावरून कंपन्यांचे आमदारांशी आर्थिक हितसंबंध आहेत, हे स्पष्ट होते. असे असले तरी कोणत्याही शेतकऱ्याची पिळवणूक होत असल्यास माझ्याशी संपर्क करून तक्रारी द्याव्यात. आपण पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्यामार्फत योग्य ती कार्यवाही करण्यासाठी पाठपुरावा करू, असेही पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

यापूर्वीही जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार; ठोस कार्यवाहीची शेतकऱ्यांना अपेक्षा

डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळासमवेत जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची भेट घेऊन काही महिन्यांपूर्वी पवनचक्की कंपन्यांच्या गैरकारभाराबाबत तक्रार केली होती. त्याअनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले होते. परंतु आमदारांचे आर्थिक हितसंबंध असल्याने कंपन्यांविरोधात अद्याप ठोस कार्यवाही होऊ शकलेली नाही.

## बीडच्या पुरणदास मठ संस्थानात साकारणार भव्य आशापूरक शिवमंदिर मंदिराच्या बांधकामास झाली सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ डिसेंबर**

बीड शहरातील जुना मोंढा भागात स्थित असलेल्या पुरणदास मठ संस्थान आणि गोशाळाच्या भव्य परिसरात भव्यदिव्य असे आशापूरक शिवमंदिर उभारण्यात येत असून नुकतीच या मंदिराच्या बांधकामाचे भूमिपूजन झाले असून कामास प्रत्यक्षात सुरुवात झाली आहे.

बिंदुसरा नदीच्या काठावर पूर्वेस जुना मोंढा भागात पुरणदास मठ संस्थान आणि गोशाळाचा भव्य परिसर असून या निसर्गरम्य परिसरात असलेल्या गोशाळेत शहरात मोकाट फिरणार्या मुक्या जनावरांचे आणि गाईंचे संगोपन केले जाते. या ठिकाणी पुरणदास महाराजांचे मंदिर असून नवसाला पावणार्या रामभक्त हनुमानाचे तसेच नागदेवतेचे मंदिर आहे. या ठिकाणी गोशाळेबरोबरच विविध पक्षी आणि प्राण्यांचे संगोपन केले जाते. तसेच लहान मुलांना खेळण्यासाठी विविध साहित्य उपलब्ध आहे. या निसर्गरम्य परिसरात भव्य आशापूरक शिवमंदिर उभारण्याचा संकल्प पुरणदास मठ संस्थानग आणि गोशाळेचे सचिव तथा युवा शक्ती सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष रणजीत पवार यांनी केला होता. त्यांच्या या संकल्पाला पूर्णत्व देण्याचे काम प्रभू गोलक्षदास महाराज यांनी केले आहे. सदरील शिवमंदिरात उज्जैन येथून भव्य महादेवाची पिंड आणि नंदीची मूर्ती मागविण्यात आली आहे. पुरणदास मठ संस्थान आणि गोशाळेला पुरणदास महाराज, भगवान बाबा, नागनाथ महाराज, हरिदास महाराज, सिलारामजी महाराज, किसननाथजी महाराज यांचे शुभाशीर्वाद लाभलेले आहेत.



या ठिकाणी नव्यानेच उभारण्यात येणार्या आशापूरक शिवमंदिराचे भूमिपूजन प्रभू गोलक्षदास महाराज, पुरणदास महाराज मठ संस्थान आणि गोशाळेचे सचिव रणजीत पवार, दै. मराठवाडा साथीचे बीड जिल्हा प्रतिनिधी संदीप बेदरे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. याप्रसंगी राजाभाऊ चव्हाण, सुधीर चव्हाण, बाबुराव जाधव, बबलू ढाकणे, विजय रायभान, शैलेश गीते, सचिन पवार, डॉ. सिद्धांत बेदरे, अभिषेक पवार, प्रेम कोयरे, अक्षय पवार, बाळू जैन, टिंकू जैन आदींची प्रमुख उपस्थिती होती.

## बालकांच्या पालक, नातेवाईकांचा शोध घेण्याचे जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांना आदेश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ डिसेंबर**

बीडच्या बालकल्याण समितीने शासकीय मुलांचे निरीक्षण गृह, बालगृह येथील सनी गायकवाड, प्रीतम काळे या बालकांच्या पालक व नातेवाईकांचा शोध घेण्यासाठी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मंगेश जाधव यांना आदेशित केल्याचे त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

ही दोन्ही बालके शासकीय मुलांचे निरीक्षण गृह, बालगृह येथे काळजी व संरक्षणासाठी बाल कल्याण समितीच्या आदेशाने दाखल झाली आहेत. या दोन्ही बालकांना निरीक्षण गृह, बालगृह येथे दाखल झाल्यापासून कोणीही आई-वडील व इतर नातेवाईक भेटण्यास आले नाही. सदरील वृत्त प्रसारित झाल्यापासून ३० दिवसाच्या आत जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, बीड, बाल कल्याण समिती, बीड व अधीक्षक, शासकीय निरीक्षण गृह, बालगृह, बीड तसेच संस्थेच्या चाँदमारी क्वार्टर, पालवन चौक, बीड या पत्त्यावर अथवा अधीक्षक (मो. क्र.९९२२९८८८०६) यांच्याशी संपर्क करावा. अन्यथा बाल कल्याण समिती या बालकांबाबत योग्य ते कायदेशीर निर्णय घेईल. मुदत संपल्यानंतर कोणताही दावा अथवा हक्क बाल कल्याण समिती ग्राह्य धरणार नाही.

सनी राजू गायकवाड याचा जन्म १० जून २००७ रोजीचा आहे. त्यांचे वय १७ वर्ष ०४ महिने आहे. सध्याचा त्याचा पत्ता बीड येथील शासकीय निरीक्षण गृह, बालगृह आहे. बेवारस अवस्थेत ते सापडले होते. बाल कल्याण समितीच्या आदेशाने या बालकास एक ऑक्टोबर २०१३ रोजी बालगृहात दाखल केले. बालकाचा रंग सावळा असून हनुवटीवर तीळ आहे.

प्रीतम दत्तात्रय काळे याचा जन्म २६ जुलै २०१३ रोजीचा आहे. त्याचे वय ११ वर्ष ०२ महिने असून तो सध्या बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील शिराळ येथील शासकीय निरीक्षण गृह, बालगृह असा त्याचा सध्याचा पत्ता आहे. हा बालक घरातून निघून गेला होता. तो बालगृहात बाल कल्याण समिती, बीड यांच्या आदेशाने २९ डिसेंबर २०२३ रोजी दाखल झाला. हा बालक रंगाने गोरा असून मानेवर उजव्या बाजूला तीळ आहे, असेही त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात कळवले आहे.

## श्री संस्कार इंग्लिश स्कूलमध्ये महात्मा ज्योतिबा फुले पुण्यतिथी साजरी

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१ डिसेंबर**

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये सकाळी १० वाजता महात्मा ज्योतिबा फुले पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

याविषयी सविस्तर वृत्त असे की तालुक्यातील नामांकित श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये गुरुवारी सकाळी १० वाजता स्त्री शिक्षणाचे शिल्पकार महात्मा ज्योतिबा फुले यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

यावेळी सर्वप्रथम महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी श्री संस्कार इंग्लिश स्कूल चया मुख्याध्यापिका सौ. सिमा काळे यांनी बोलताना महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जिवन चरित्रावर उजाळा दिला. या कार्यक्रमाला मुख्याध्यापिका सिमा काळे, शिक्षीका देशमुख मॅडम, निलम जोगदंड, खंदारे मॅडम, गायकवाड मॅडम, शिंदे मॅडम, यांच्या सह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## ई-पीक पाहणी डीसीएस मोबाईल ॲपद्वारे होणार ई-पीक पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ डिसेंबर**

रब्बी हंगाम एक डिसेंबर २०२४ पासून राज्यात सुरू होत आहे. शेतकऱ्यांना पीक पाहणी करण्यासाठी आधी ई-पीक पाहणी मोबाईल प उपलब्ध होते. परंतु आता केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणे काही तांत्रिक दुरूस्ती करून नवीन रूपात ई-पीक पाहणी DCS मोबाईल प उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. या नंतर १०० टक्के पीक पाहणी सुधारित ई-पीक पाहणी DCS मोबाईल पद्वारे संपूर्ण राज्यात होणार आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांनी आपली पीक पाहणी ठराविक मुदतीत करून घ्यावी. जेणेकरून कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी अडचण येणार नाही, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून केले आहे.

शेतकरी स्वत: पिकांची नोंद ई-पीक पाहणी मोबाईल पद्वारे नोंदवायचे व उर्वरीत पीक पाहणी जे शेतकऱ्यांनी नोंदवलेली नाही, ते तलाठी यांच्यामार्फत होत असत. त्यामध्ये दुरूस्ती करून शेतकऱ्यांना हंगामाच्या पहिल्या दिवसापासून पीक पाहणी करण्यासाठी सहायक यांची नेमणूक करण्यात येत आहे. प्रत्येक गावासाठी सहायक उपलब्ध राहणार असून सहायकामार्फत पीक नोंदणी होणार आहे. पीक विमा, पीक कर्ज, नैसर्गिक आपत्ती, एमएसपी अंतर्गत पिकांची नोंद इत्यादी सुविधांचा लाभ घेण्यासाठी ई-पीक पाहणी ऊड मोबाईल पमध्ये पिकांची नोंद असणे आवश्यक आहे.

नवीन मोबाईल पमधील आवश्यकता

पीक पाहणीसाठी निवडलेल्या गट क्रमांकापासून ५० मीटरच्या आत फोटो घेणे अनिवार्य आहे.

पिकांचे दोन फोटो घेणे बंधनकारक.

सुधारित पमधील नवीन सुविधा

शेतकऱ्यांच्या पीक पाहणी मदतीसाठी हंगाम सुरू होण्याच्या पहिल्या दिवसापासून पीक पाहणी संबंधित समस्या सोडविण्यासाठी सहायक उपलब्ध

## जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवांनी महोत्सवात सहभाग नोंदवावा – अरविंद विद्यागर

### जिल्हास्तर युवा महोत्सव आयोजनासाठी बैठक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ डिसेंबर**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग, नेहरू युवा केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने ०४ ते ०५ डिसेंबर २०२४ या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल येथे जिल्हास्तरीय महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये १५ ते २९ वयोगटातील जास्तीत जास्त युवांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले आहे.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय युवा महोत्सव आयोजन संदर्भात समिती सदस्य, तज्ज्ञ, परीक्षक यांची बैठक शुक्रवारी (ता.२९) पार पडली. बैठकीस माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे, नेहरू युवा केंद्राच्या जिल्हा युवा अधिकारी अरुणा कोचुरे, तालुका क्रीडा अधिकारी पंडित चव्हाण, माध्यमिक विभागाचे उपशिक्षणाधिकारी मोहन काकडे, तुकाराम आदींची उपस्थिती होती. बैठकीत शिक्षणाधिकारी श्री. शिंदे, जिल्हा क्रीडा अधिकारी विद्यागर यांनी जिल्हास्तरीय युवा महोत्सव आयोजना बाबत उपस्थितांना माहिती दिली.

जिल्हास्तरीय युवा महोत्सवात विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नवसंकल्पना यावर आधारित स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, यात समूह लोकनृत्य , लोकगीत, कौशल्य विकास कार्यक्रम, या कथालेखन , चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा, कविता लेखन इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सांस्कृतिक कार्यक्रमात समूह लोकनृत्य स्पर्धेसाठी विजेत्यास प्रथम ७ हजार , द्वितीय ५ हजार, तर तृतीय ३ स्पर्धेसाठी विजेत्यास प्रथम ५ हजार, द्वितीय ३ हजार, तर तृतीय २५०० रुपये बक्षीस देण्यात येणार आहेत.

बैठकीस जिल्ह्यातील युवा क्षेत्रात काम करणारे दिनकर थोरात, प्रा. दीपक जमदाडे, प्रा. राम गव्हाणे, प्रा. सोपान सुरवसे, प्रा. केशव भागवत, प्रा.एस.एस.राऊत , प्रा .डॉ. रवींद्र काळे , श्री .व्ही. बी ठोंबरे श्री. आर. एस .इंगळे आदींची उपस्थिती होती. जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे यशस्वीतेसाठी क्रीडा अधिकारी अनिकेत काळे , कालिदास होसुरकर, क्रीडा मार्गर्शक सतीश राठोड, रेवननाथ शेलार, अविनाश पाटील, धनेश करांडे, जितेंद्र आराक, श्रीमती त्रिगुणा वाघमोडे, राजेश बागलाने, मंगेश वडमारे

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या ऑनलाईन अर्जासाठी १६ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ डिसेंबर**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील इयत्ता ११ वी व त्यापुढील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेल्या ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही, अशा विद्यार्थ्यांना घरभाडे व इतर खर्च भागविण्यासाठी अर्थसहाय्य मंजूर करण्यात येते. सन २०२४-२५ या चालू शैक्षणिक वर्षापासून ही योजना ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. त्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी https://hmas.mahait.org या पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करणे आवश्यक आहे. या योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत १६ डिसेंबरपर्यंत वाढविली आहे. या योजनेचा लाभ मिळण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रासह ऑनलाईन पद्धतीने विहित मुदतीत अर्ज करण्याचे आवाहन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सहायक आयुक्त प्रदीप भोगले यांनी केले

# एमआयडीसी परिसरातील तिरूमला ऑईल कंपनीला आग

## पाच जण गंभीर जखमी ; लाखोंचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. ०१ डिसेंबर**

एमआयडीसी परिसरातील तिरूमला आईल मिलचे तृप्ती गोल्ड रिफाईन्ड सोयाबीन ब्रँडचे तेल या कंपनीला विवारी सकाळी ११:३० ते १२ च्या दरम्यान अचानकपणे स्पोर्ट होऊन लागलेल्या आगीमुळे गोदामातील लाखो रुपयांचे तेल जळुन नुकसान झाले तर सदरील घटनेत पाच जण जखमी झाले असून यातील तिघेजण गंभीर जखमी असल्याची माहिती आहे.





नांदेड सिडको परिसरातील एमआयडीसी येथील तिरूमला ऑईल मिलचे जागेचे मालक महेश रेखावार व भास्कर कोत्तावार यांच्या सह त्यांची मुले व सहकारी यासह पाचजन सकाळी हिशोब करण्यासाठी कंपनीत आले. दरम्यान सकाळी साडे अकरा ते पावणे बाराच्या सुमारास या कंपनीत अचानक आगीचा स्पोट झाला. या आगीत वरील मालक व भागीदार सहकारी गंभीर रित्या जखमी झाले. यात तीघाजनांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळाली. तर या स्फोटात गोदामाचे काही पत्रे उडून बाजूला पडले त्याचवेळी गोदामात आग लागून लाखो रुपयांच्या तेलाचे नुकसान झाले असल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. मिलचे मालक व त्यांचे सहकारी भागीदार असे एकूण पाच जण जखमी झाले आहेत यापैकी तीन जणांचे प्रकृती गंभीर असल्याचे समजते गंभीर असलेल्या रुग्णांवर नांदेड शहरातील एका नामांकित खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असल्याचे माहिती आहे. या घटनेचे माहिती समजतात नांदेड वाघाळा मनपाचे अग्निशमन अधिकारी अनुक्रमे केरोजी दासरे व निलेश कांबळे तसेच एमआयडीसीचे अग्निशमन दलाचे प्रमुख पी.जी. भोयर, आर.के. ओलीवकर, एस बी सातवकर व त्यांचे सहकारी अग्निशमन विमचक अर्थातच अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी पोहोचले अग्निशमन दलातील जवानांनी अथक परिश्रम घेऊन ही आग दुपारी १ वाजेपर्यंत नियंत्रणात आणली.ही घटना परिसरात वाऱ्यासारखी पसरल्याने घटनास्थळी नवनिर्वाचित आमदार आनंदराव बोंढारकर यांनी ही भेट दिली.तसेच तहसीलदार प्रवीण पांडे, नायब तहसीलदार जगताप व त्यांच्या सहकारी अधिकारी कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट देवून पहाणी केली.

तरसदरील घटनास्थळी या घटनेची माहिती समजतात पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व त्यांचे सहकारी अधिकारी कर्मचारी घटनास्थळी धाव घेऊन आग नियंत्रण आणण्यासाठी अग्निशमन दलास सहकार्य केले. लागलेल्या या आगीचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

# नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्यावतीने पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०१ डिसेंबर**

राज्यातील समस्त मराठी पत्रकारांच्या स्वाभिमान आणि न्याय हक्कासाठी लढा उभारणाऱ्या मराठी पत्रकार परिषद मुंबईच्या ८६ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून राज्यभरात पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्याचे निर्देश पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी दिले आहेत. त्यानुसार नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष गोवर्धन बियाणी यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार दि.३ डिसेंबर रोजी सकाळी ८ वाजता शहरातील जंगमवाडी येथील महानगरपालिका रुग्णालयात येथे पत्रकारांच्या आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच जिल्ह्यातील प्रत्येक तालुकास्तरावर देखील अशा आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करावे,असेही सूचित करण्यात आले आहे. अशा प्रकारे मागील वर्षी देखील जंगमवाडी येथील रुग्णालयात असेच शिबीर आयोजित केले होते. त्यास पत्रकार बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता.

मंगळवारी सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत या मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार,महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे , अतिरिक्त आयुक्त गिरीष कदम, उपायुक्त तथा विधी अधिकारी अजितपालसिंघ संधू आदि मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत या शिबिराचा समारोप करण्यात येणार आहे. तरी शहरासह जिल्ह्यातील जास्तीत जास्त पत्रकार बांधवांनी या आरोग्य तपासणीसाठी सकाळी वेळेवर उपाशीपोटी उपस्थित राहून या मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष गोवर्धन बियाणी, कार्याध्यक्ष संतोष पांडागळे, सरचिटणीस राम तरटे, प्रसिध्दी प्रमुख माधव गोधणे,रविंद्र संगनवार, सुरेश काशिदे, प्रल्हाद लोहेकर, प्रशांत गवळे आदींनी केले आहे.



**नांदेड**-येथील बसस्थानक मेस्को सुरक्षा जवानांच्या कार्यतत्परतेमुळे महिला प्रवाशांचे चोरी गेलेले मंगळसूत्र परत मिळाले. बसस्थानक प्रमुख कार्यालय बसस्थानक प्रमुख यासीन खान, बसस्थानक कर्तव्यावरील सहा. पोलीस निरीक्षक संजय पवार, महिला पो.कॉन्स्टेबल मीनाक्षी बनसोडे, मेस्को सुरक्षा जवान पी.बी पाटोळे, एस. बी घुगे यांच्या उपस्थितीत महिलेला मंगळसूत्र परत देण्यात आले. छाया :के. के. वागदरीकर.

# खा.चव्हाण यांच्या सूचनेची तत्काळ दखल; उर्ध्व पेनगंगा प्रकल्पांतर्गत रब्बीमध्ये तीन तर उन्हाळ्यात चार पाणी पाळ्याचे नियोजन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०१ डिसेंबर**

रब्बी व उन्हाळी हंगामासाठी इसापूर धरणातून पाणी सोडण्यात यावे अशी मागणी प्रकल्प क्षेत्रातील लाभधारक शेतकऱ्यांनी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्याकडे केली होती. रब्बी व उन्हाळी हंगामात पिकाला पाणी कमी पडू नये याचे गांभीर्य लक्षात घेत खा. चव्हाण यांनी उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने सूचना देत उर्ध्व पेनगंगा प्रकल्पांतर्गत इसापूर कालव्याचे पाणी पाळ्याचे नियोजन करण्याचे सांगितले होते याची दखल घेत उर्ध्व पेनगंगा प्रकल्पावरील कालवा सल्लागार समितीची बैठक विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत उर्ध्व पेनगंगा प्रकल्पांतर्गत इसापूर कालव्याचे पाणी एक डिसेंबर रोजी सुरू करून रब्बीमध्ये तीन तर उन्हाळ्यात चार पाणीपाळ्या सुरू करण्याचे नियोजन केले आहे. रविवारी पाणी सोडण्यास प्रारंभ झाला आहे. कालवा सल्लागार समितीची बैठक झाली नसल्याने पाणी पाळ्याचे नियोजन झाले नव्हते परिणामी शेतकऱ्यांना रब्बी हंगामाचे नियोजन करण्यात अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर प्रकल्प क्षेत्रातील लाभधारक शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने खा.अशोकराव चव्हाण यांची भेट घेत रब्बी व उन्हाळी हंगामात पिकाला पाणी कमी पडू नये यासाठी त्वरित कारवाई करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या होत्या. याची दखल घेत उर्ध्व पेनगंगा प्रकल्पावरील कालवा सल्लागार समितीची बैठक विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये १५ ऑक्टोबर रोजीच्या धरणातील ९६४.१० दलघमी (शंभर टक्के) जिवंत पाणीसाठ्यावर आधारीत रब्बी हंगामात तीन पाणीपाळ्या व उन्हाळी हंगामात चार पाणीपाळ्या देण्याच्या नियोजनास मान्यता देण्यात आली आहे.



प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील लाभधारकांना व धरण जलाशय, अधिसूचित नदी-नाल्यावरील तसेच मुख्य कालव्यावरील प्रवाही व मंजूर उपसा सिंचन योजना धारकांनी रब्बी हंगामातील हंगामी, दुहंगामी तसेच दुहंगामातील इतर उभी पिके या पिकांसाठी कालव्याचे प्रवाही, कालव्यावरील उपसा, नदी-नाल्यावरील मंजूर उपसा सिंचन योजनेद्वारे सिंचनासाठी पाणी घ्यायचे असल्यास मागणी अर्ज भरून संबंधित शाखा कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे खा. चव्हाण यांच्या पाठपुराव्यामुळे पिकांच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागल्याने शेतकऱ्यांनी खा. चव्हाण यांचे आभार मानले आहेत.

**रब्बीसाठी तीन पाणीपाळ्याचे नियोजन**

रब्बी सिंचन कार्यक्रम २०२४-२५ चा आवर्तन कार्यक्रम-एक-इसापूर उजवा कालवा इसापूर डावा कालव्यातून १ ते २२ डिसेंबरपर्यंत २२ दिवस, आवर्तन कार्यक्रम दोन साठी कालावधी १ ते २२ जानेवारी तर आवर्तन कार्यक्रम तीनसाठी १ ते २२ फेब्रुवारीपर्यंत २२ दिवसांसाठी राहील. पाऊस किंवा आकस्मिक घटनांमुळे आवर्तनाच्या दिनांकात बदल होऊ शकतो, असे पाटबंधारे विभागाने कळविले आहे.

# आंतर विद्यापीठ ज्युडो स्पर्धेत ओम हेमगीर यांना कास्यपदक

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ३० नोव्हेंबर**



एल.एन.सी.टी विद्यापीठ भोपाळ येथे सुरू असलेल्या पश्चिम दक्षिण विभागीय आंतर विद्यापीठ ज्युडो क्रीडा स्पर्धेत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मुलांचा संघाने सहभाग झाला आहे. ६० किलो वजन गटांमध्ये ओम हेमगीर या खेळाडू विद्यार्थ्याने विद्यापीठास कास्यपदक मिळवून दिले आहे.

या खेळाडू विद्यार्थ्यांना डॉ. राहुल कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. विठ्ठल डुमनर हे सहभागी झाले होते.

या त्यांच्या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, क्रीडा संचालक डॉ. भास्कर माने, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम यांच्यासह विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांनी खेळाडू संघ, मार्गदर्शक व व्यवस्थापक यांचे हार्दिक अभिनंदन करून पुढील अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## संक्षिप्त वृत्त

### ‘गंमत असते नात्याची’ नाटकाने राज्य नाट्यस्पर्धेत प्रेक्षकांची मने जिंकली

**नांदेड**-महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेच्या ६३ व्या पर्वात गंमत असते नात्याची या नाटकाने प्राथमिक फेरीत उत्कृष्ठ सादरीकरण करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. नांदेड येथील कुसुम सभागृहात ता. २९ रोजी सायंकाळी ७ वाजता या नाटकाचे सादरीकरण झाले. विजय करभाजन यांच्या दिग्दर्शनाखाली साकारलेले हे नाटक कौटुंबिक नातेसंबंधांवर भाष्य करणारे असून, कॉर्पोरेट जीवनशैलीतील ताणतणाव व त्यातून निर्माण होणारे संघर्ष यांवर प्रकाश टाकते. या नाटकाचे निर्माते अनिल पांडे असून, राजीव गांधी युवा फोरम, परभणीच्या वतीने हे नाटक सादर करण्यात आले. रवीशंकर झिंगरे लिखित गंमत असते नात्याची हे नाटक आधुनिक जोडप्यांच्या नातेसंबंधांवर आधारित आहे. लिव्ह-इन-रिलेशनशिप, नात्यांतील उदासीनता आणि कौटुंबिक मूल्यांचा संघर्ष यावर केंद्रित असलेल्या या नाटकात करिअर व नात्यांमधील संघर्षाचे परिणाम कसे होतात, हे अत्यंत संवेदनशीलतेने मांडण्यात आले आहे. या नाटकातील भूमिका साकारणाऱ्या कलाकारांनी प्रेक्षकांची मने जिंकली. शरद पांडे यांच्या भूमिकेत किशोर पुराणिक यांनी दमदार अभिनय केला. सुलभा पांडे यांची भूमिका डॉ. सौ. अर्चना चिक्षे यांनी प्रभावीपणे साकारली. वैभव उदास यांनी सागर पांडे यांची भूमिका जिवंत केली, तर अनघा चिटणीस यांच्या भूमिकेत मोनिका गंधर्व यांनी उत्कृष्ट अभिनय केला. नाटकाच्या यशामध्ये तांत्रिक बाजूंनीही मोलाचा वाटा आहे. नेपथ्याची जबाबदारी सिद्धार्थ नागठाणकर आणि मधुकर भगत यांनी समर्थपणे सांभाळली. प्रकाशयोजनेसाठी बालाजी बाबुराव दामुके आणि दिनकर जोशी यांनी प्रभावी कामगिरी बजावली. संगीत त्र्यंबक वडसकर आणि शौनक पांडे यांनी सांभाळले. रंगभूषा प्रभाकर जोशी आणि संतोष चिक्षे यांनी केली, तर वेशभूषा सौ. निता जोशी आणि आयुषी चिक्षे यांनी अत्यंत कुशलतेने साकारली. रंगमंच व्यवस्था प्रकाश ढोले, रमाकांत कुलकर्णी, बंडू जोशी, आणि सचिन आडे यांनी उत्तम प्रकारे पार पाडली. नाटकाच्या सादरीकरणाला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद लाभला. कौटुंबिक नातेसंबंध व आधुनिक काळातील जोडप्यांचे प्रश्न यांवरील या नाटकाने प्रेक्षकांच्या मनात विचारांची खळबळ निर्माण केली. नाट्यप्रेमींनी नाटकातील सादरीकरण, विषयाची मांडणी, आणि तांत्रिक बाजूंना भरभरून दाद दिली. गंमत असते नात्याची या नाटकाला प्रेक्षकांनी प्रतिसाद दिला. या कार्यक्रमासाठी समन्वयक किरण चौधरी व त्यांची टीम परिश्रम घेत आहेत.

# मुखेड येथे दिव्यांगांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**मुखेड,दि. ०१ डिसेंबर**

मुखेड शहरातील शैक्षणिक, सामाजिक व पर्यावरण विषयक उपक्रम राबविणारे छत्रपती शिवाजी महाराज प्रतिष्ठान छत्रपती गणेश मंडळ, दिपनगर, मुखेडच्या वतीने दि.३० नोव्हेंबर रोजी दिव्यागांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज प्रतिष्ठानचे व गणेश मंडळाचे उपाध्यक्ष सचिन मेनकुदळे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मंडळाच्या शहरातील यशवंतराव चव्हाण निवासी अपंग विद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप करण्यात आला. यावेळी मंडळाचे अध्यक्ष विनोद पाटील, सचिव प्रा.डॉ.शंकर सकनुरे, संतोष पाटील, बळवंत जाधव, संतोष तळेगावे, वैभव इंगळे, विकास जाधव, अनिकेत पांचाळ, रितेश डुमणे सौरभ भिसे, विशाल जाधव, ओम गोंड, शुभम वडजे, साई जाधव, सोहम भिसे, गजानन गुंडे विद्यालयाचे मुख्याध्यापक पांचाळ सर, बसवे व सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# नांदेडमध्ये मंगेश कदम मित्रमंडळाच्या वतीने फटाक्याच्या आतिषबाजीत आ. बालाजी कल्याणकर यांचे स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०१ डिसेंबर**

नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघांचे नवनिर्वाचित आ. बालाजीराव कल्याणकर यांचे मंगेश कदम मित्रमंडळाच्या वतीने राज कॉर्नर येथे सकाळी फटाक्याच्या आतिषबाजीत भव्य स्वागत करण्यात आले.



राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाचे आमदार बालाजीराव कल्याणकर यांनी विजय मिळविला. मंगेश कदम मित्रमंडळाच्या वतीने रविवारी त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले.

या प्रसंगी बहुजन नेतृत्व मंगेशभाऊ कदम, शिवसेना मागासवर्गीय विभागाचे शहरप्रमुख अँड. धम्मपाल कदम, बिलोलीचे माजी नगरसेवक महेंद्र गायकवाड, पप्पू देशमुख तरोडेकर, अशोक देशमुख तरोडेकर, मनीष कदम, देवानंद इंगोले, आकाश कदम, गौतम सोनकांबळे, सुशील सोनवणे, विक्की गायकवाड, अमित लिंबेकर,अमित थुले, सिद्धार्थ वाठोरे, गजानन गजभारे, आशिष मस्के, सचिन वायवळ, बंटी खिल्लारे, सचिन तोटावार, मयूर बाराटे, बिचू बोरडे, राहुल बोरडे आदर्श मस्के, रवी भवरे, प्रणव सूर्यवंशी, कृष्णा कोकरे यांच्यासह मंगेश कदम मित्रमंडळाचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# ‘स्वारातीम’ विद्यापीठामध्ये बायोटेक्नॉलॉजी दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०१ डिसेंबर**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीतील जैवशास्त्र संकुलामार्फत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २९ नोव्हेंबर रोजी ‘बायोटेक्नॉलॉजी दिवस’ अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला.

शेती, मानवी आरोग्य, औषध निर्मिती, पर्यावरण-प्रदूषण व उपाय, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (कृत्रिम बुद्धिमत्ता) चा वापर, लसींचा शोध, प्राण्यांची उपयोगिता इत्यादी बद्दल चर्चा व मार्गदर्शन करण्यासाठी पुणे येथील एव्हिड डायग्नोस्टिक्स बायोइंजीनिअरिंग चे संचालक मोहन भागवत व शेगाव येथील ए.आय.सेन्स.एल.एल.पी. फाउंडर चे संतोष बोथे या दोन तज्ञांना निमंत्रित करण्यात आले होते.

स्टार्टअप सुरू करणे, प्रदेशात नोकरी, देशात व प्रदेशात उद्योग व कंपनी सुरू करणे, कन्सल्टन्सी सुरू करणे यासाठी विद्यार्थ्यांनी लक्षपूर्वक शिक्षण घ्याव व या क्षेत्रात प्रवेश करावा याबद्दल मार्गदर्शन केले.

# कारेगाव फाटा येथे सोयाबीन शासकीय हमीभाव केंद्र सुरू होणार

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. ०१ डिसेंबर**

धर्माबाद, उमरी व नायगाव तालुक्यातील शेतकरी बांधवांसाठी आनंदाची पर्वणी आहे. कारेगाव फाटा येथे दि. विदर्भ. को. प. मार्केटिंग फेडरेशन लि. नागपूर. ज्ञान सरस्वती अग्रो प्रोड्युसर कंपनी. लि. मार्फत शासकीय हमीभाव योजनेद्वारे चालणाऱ्या शासकीय सोयाबीन खरेदीस सुरुवात होत आहे. तरी सर्व शेतकरी बांधवांनी ऑनलाईन नोंदणी करून आपल्या शेतातील पीक शासकीय हमीभावात द्यावा. ऑनलाइन नोंदणीची शेवटची तारीख १५ डिसेंबर २०२४ ही आहे. सर्व शेतकरी बांधवांनी १५ डिसेंबर पर्यंत ज्ञान सरस्वती अग्रो प्रोड्युसर कंपनी लि. कारेगाव फाटा. ऑनलाइन नोंदणी करून आपले पीक हमीभावात द्यावा. असे आव्हान करण्यात आले आहे. सोयाबीन विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांनी आधार कार्ड झेरॉक्स, आधार कार्ड लिंक असलेले बँक पासबुक झेरॉक्स, सन २०२४ -२०२५ ऑनलाइन पेरा नोंद असलेला सातबारा असावा. नोंदणी ठिकाण बालाजी फर्टिलायझर्स उमरी रोड, कारेगाव फाटा. गोडाऊनच्या बाजूस बळेगाव रोड कारेगाव फाटा येथे खरेदी केंद्र सुरू आहे.



अशी माहिती केंद्र संचालक जीवन परशुराम गाडीवान चोंडीकर, बाबुराव उर्फ बबलू हणमंतराव जगदंबे कारेगावकर , अनिल शिवाजीराव सुर्यवंशी वझरगेकर. यांनी सर्व शेतकरी बांधवांना कळविले आहे.

# गुरुद्वारा बोर्डातील अनियमितता विरोधातील याचिका उच्च न्यायालयाने स्वीकारली

## तत्कालीन दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाई होणार

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०१ डिसेंबर**

सचखंड गुरुद्वारा बोर्डातील पद भरती व वेतनवृद्धीसह भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या कर्मचाऱ्यांना कारवाई न करने इतर गैरकारभाराच्या विरोधातील बोर्डाचे सेवानिवृत्त कर्मचारी भुपिंदरसिंघ गिरणीवाले यांनी याचिकेतील मुद्दे गंभीर असल्याने उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने जनहित याचिका म्हणून स्वीकारली आहे. यावर लवकरच सुनावणी होणार असल्याने संबंधितांचे धाबे दणाणले आहेत.

गुरुद्वारा बोर्डातील वरिष्ठ कारकून पदावर कार्यरत भूपेंद्रसिंग गिरणीवाले वर्ष २०२० मध्ये नियत वयोमानुसार सेवानिवृत्त झाले. महाराष्ट्र नागरी सेवा कायद्यानुसार कोणत्याही कर्मचाऱ्याला बारा वर्षानंतर पदोन्नती देणे बंधनकारक आहे. वर्ष १९९८ साली वीस वर्षे सेवा झाली तरी त्यांना नियमाप्रमाणे पदोन्नती दिल्या गेली नाही. पण बोर्डातील कनिष्ठ कर्मचाऱ्यांना नियमबाह्यरित्या पदवी अहर्ता नसताना पदोन्नती देत मुख्य लिपिक पद बहाल करण्यात आले. गुरुद्वारा बोर्डातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी राजकीय दबावापोटी अनेकांना पदोन्नती दिल्याचा आरोप याचिककर्त्यांनी केला आहे. अनेक कर्मचाऱ्यांना मनमानीपणे वेतनवृद्धी दिली आहे. तत्कालीन गुरुद्वारा बोर्ड अधीक्षक गुरविंदरसिंघ वाधवा यांना नियमांचे पालन न करता नियुक्ती देत व वीस हजार पगार असलेल्या वाधवा यांना ७८ हजार रुपये वेतनवाढ देण्यात आली. अशा प्रकारे २०१५ ते २०१९ दरम्यान अनेकांना पदोन्नती देण्यात आली. जानेवारी २०१५ ते १ २०१९ दरम्यान गुरुद्वारा बोर्डात गरज नसताना विविध विभागात सेवादारांसह ३७५ कर्मचारी नेमणूक केली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बोर्ड अध्यक्षांची दिशाभूल करीत तत्कालीन अधीक्षकांना दोनच वर्षाच्या काळात २६ हजारापासून सुमारे ७८ हजार वेतनवाढ दिल्याचा उल्लेख केला आहे.

गुरुद्वारा बोर्डातील कर्मचारी भरती व वेतन वाढीमुळे आलेल्या देणगीचा गैरवापर होत असल्याने याचिकाकर्त गिरणीवाले यांनी राज्याचे महसूल सचिव, जिल्हाधिकारी व गुरुद्वारा बोर्ड अधीक्षक यांना प्रतिवादी करीत २०१५ साली कर्मचाऱ्यांच्या पगारापोटी दीड कोटी खर्च वर्ष २०१९ मध्ये पावणेतीन कोटी तर वर्ष २०२२ मध्ये ३ कोटी ७४ लाख रुपये भविष्य निर्वाह निधीची रक्कम वगळता झाली असल्याचे निदर्शनास आणून आहे. या गंभीर बाबीची दखल घेत उच्च न्यायालयाच्या छ. संभाजीनगरचे न्या. मंगेश पाटील व न्या. संदीप मरणे यांनी मान्य केली आहे. सदर याचिका जनहित याचिका म्हणून सुनावणी घेण्यात येणार असून याचिकाकर्त्याची बाजू साहेबराव नागरसोगे यांनी मांडली त्यांना सामाजिक कार्यकर्ते जगदिपसिंघ नंबरदार यांनी सहकार्य केले.

# ग्रामीण परिसरात रब्बी पिकांसाठी ठरतेय गुलाबी थंडी पोषक

**तभा वृत्तसेवा**
**आदमपूर,दि. ०१ डिसेंबर**

गेल्या दहा पंधरा दिवसांपासून ग्रामीण परिसरात गुलाबी थंडीचा जोरकस मुक्काम वाढलेला दिसून येत आहे.शेत शिवारातील रब्बी हंगामातील गहू, हरभरा, ज्वारी, धनिया, करडी आदि पिकांना ही गर्द,कुडकुडणारी थंडी लाभदायक असल्याचे चित्र समाधानी आहे. सव्वा महिने व एक महिन्याचा गहू, हरभरा, ज्वारी अगदी हिरव्यागर्द पर्णसंभाराने लदबदून गेल्याने शेतकरी सुखावला आहे.पुढच्या मागच्या करडी, हरभऱ्यास काही प्रमाणात अळीचा, किडीचा प्रादुर्भाव उद्भवल्याने शेतकऱ्यांकडून पहिली फवारणीही फवारण्यात आली आहे. त्यानंतर शेतकऱ्यांकडून एक तुषार सिंचनाची पाणी पाळीही देण्यात आलेली आहे. परिसरात काही शेतकऱ्यांकडून उस लागवडही

करण्यात आली असल्याने उस तोडणी हंगामाही सुरू आहे. एकीकडे तुरीलाही पिवळ्या धम्मक फुलांचा डवरून बहार आल्याने शेतकरी फवारणी करण्यात मग्न आहेत. कुठे तुरीच्या शेंगा निब्बर झाल्या आहेत, तर कुठे फुल,चट्ट्या तुरीच्या शेंगा अक्षरशः लगडलेल्या आहेत. परिसरातील आडत बाजारात सोयाबीनचे भाव अजुनही जैसे थे असल्याने शेतकरी राजा पुरता विवंचनेत सापडला आहे.घरात सोयाबीन वाळवून पडून राहिल्याने बळीराजा अस्वस्थ असल्याचे चित्र मन विषण्ण करणारे आहे. हमी भाव सुग्गीत दणकून पडल्याने अन् आगामी सरकार अमक्या तमक्या मंत्रीपद लोभापायी शपथग्रहणातंच अडकल्याने बळीराजा गोचीत सापडला आहे. सरकारलाही काही शेतकऱ्यांचं सोयर सुतक नसल्याचं यावरून स्पष्ट जाणवायला लागतं. शेतकऱ्यांसांठी, सर्वसामान्य नागरिकांसाठी आगामी सरकारी धोरण खडतर असल्याची चर्चाही ग्रामीण परिसरात ऐकायला मिळते आहे. सध्यातरी वाढती थंडी पिकांसाठी पोषक ठरल्याने तूर्तास शेतकरी झाक खुशीत आहे.